



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ सोमवार ५ ऑक्टोबर २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०





# राष्ट्रपतींची निवडणूक होते, मग मुख्य निवडणूक आयुक्तांची निवडणूक का होत नाही?

## उद्धव ठाकरेंचा सवाल




**मुंबई/प्रतिनिधी** :आज मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या गर्जना मोर्चावेळी उद्धवसेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी एसआयआरच्या मुद्द्यावरून निवडणूक आयोग आणि मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधात घणाघाती टीका केली. यावेळी उद्धव ठाकरे यांनी निवडणूक आयुक्तांच्या नेमणुकीच्या प्रक्रियेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. तसेच राष्ट्रपतींची निवडणूक होते, मग निवडणूक आयुक्तांची निवडणूक का होत नाही, असा सवाल विचारला.या गर्जना मोर्चावेळी उपस्थितांना संबोधित करताना उद्धव ठाकरे म्हणाले की, थोरात साहेबांनी सांगितले की, यापूर्वी निवडणूक आयुक्त नेमले जात. माझा पहिला आक्षेप या नेमणुकीलाच आहे. जो आयुक्त संपूर्ण देशाच्या निवडणुकीवर लक्ष ठेवतो. देशाच्या राष्ट्रपतींची निवडणूक होते. मग निवडणूक आयुक्तांची निवडणूक का होत नाही. त्यांची नेमणूक कशी होते? असा सवालही उद्धव ठाकरे यांनी विचारला.एवढंच नाही तर उद्धव ठाकरे यांनी मुख्य निवडणूक आयुक्तांची नियुक्ती करणाऱ्या समितीवरही प्रश्नचिन्ह केले. ते म्हणाले की, निवडणूक आयुक्तांची नियुक्ती करणाऱ्या समितीमध्ये आधी सरन्यायाधीश होते, पंतप्रधान होते आणि विरोधी पक्षनेत्यांचाही समावेश होता. मात्र आता यांनी बरोब्बर सरन्यायाधीशांना वगळले आहे. विरोधी पक्ष नेत्याला ठेवलं आहे. तसेच सरन्यायाधीशांऐवजी पंतप्रधाना म्हणतील त्या मंत्र्याचा समावेश केला. आता हे मंत्री कोण आहेत तर ते अमित शाह. म्हणजे सध्या निवडणूक आयोगात १ विरुद्ध २ आयुक्त असं जे चित्र निर्माण झालं आहे तेच या समितीमध्येही चित्र आहे, असा टोलाही उद्धव ठाकरे यांनी लगावला. उद्धव ठाकरेंचा अंधभक्तांना कानमंत्र - ही तुमची लोकशाही? म्हणून बाळासाहेब ठाकरे म्हणायचे की अशी लोकशाही गाडायला पाहिजे. ते दळभद्री लोकशाही, हुकूमशाहीविरोधात बोलत होते. मी तमाम अंध भक्तांना सांगतो, ते चॅनलच्या माध्यमातून आले असतील. ☞(पान २ वर)

# चौथ्या दिवशीही पुण्यात विद्यार्थी आंदोलन सुरुच

## पुण्यात राजकीय वातावरण तापले



पुणे : पुण्यात एमपीएससी विद्यार्थ्यांचे आंदोलन रविवारी (दि. ०४) चौथ्या दिवशीही तीव्र स्वरूपात सुरूच राहिले. शहरात तीन वेगवेगळ्या ठिकाणी विद्यार्थ्यांची आंदोलने सुरू असून, या आंदोलनांना विविध राजकीय नेत्यांनी भेटी दिल्यामुळे पुण्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले. परीक्षा पद्धतीमधील बदल आणि एमपीएससी अध्यक्षांचा राजीनामा मागण्यांसाठी चौथ्या दिवशीही पुण्यात तीन ठिकाणी विद्यार्थी रस्त्यावर उतरल्याचे पाहायला मिळाले.

एस. एम. जोशी पूल (गरवारे कॉलेजजवळ) येथे आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वात सुरू असलेल्या या सत्याग्रह आंदोलनात एमपीएससी अध्यक्षांच्या राजीनाम्याची प्रमुख मागणी आहे. याशिवाय ऑब्जेक्टिव्ह पद्धतीने परीक्षा घेण्यात यावी, अशीही मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे. तर लाल बहादूर शास्त्री रस्ता (अहिल्या शिक्षण मंडळ) येथे दुसऱ्या गटातील विद्यार्थ्यांची मुख्य मागणी परीक्षा ऑब्जेक्टिव्ह पद्धतीने घ्यावी हीच आहे. तसेच, अलका टॉकीज चौक (टिळक चौक) येथे तिसऱ्या गटाचे आंदोलन वेगळ्या भूमिकेत असून, त्यांची मागणी परीक्षा डिस्क्रिप्टिव्ह (वर्णनात्मक) पद्धतीने घ्यावी अशी आहे.

आंदोलनाच्या चौथ्या दिवशीही राजकीय नेत्यांनी आंदोलकांची भेट घेऊन पाठिंबा दर्शवला. एस. एम. जोशी पुलाजवळील आंदोलनाला खासदार संजय राऊत आणि सीजेपीचे संस्थापक अध्यक्ष अभिजित दीपके यांनी भेट दिली. लाल बहादूर शास्त्री रस्त्यावरील आंदोलनाला मंत्री नीतेश राणे यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांच्या मागण्या जाणून घेतल्या आणि समर्थन जाहीर केले.

तिन्ही ठिकाणी रात्री उशिरापर्यंत विद्यार्थ्यांचे ठिय्या आंदोलन सुरू होते. एकीकडे एमपीएससी अध्यक्षांचा राजीनामा आणि दुसरीकडे परीक्षा पद्धतीबाबत (ऑब्जेक्टिव्ह विरुद्ध डिस्क्रिप्टिव्ह) विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या मागण्या असल्या तरी, प्रशासनाकडून ठोस निर्णय मिळेपर्यंत आंदोलन मागे न घेण्याच्या भूमिकेवर तीनही गटाचे विद्यार्थी कायम आहेत. बड्या नेत्यांच्या एंट्रीमुळे या आंदोलनाला आता राज्यव्यापी राजकीय वळण मिळाले आहे. या आंदोलनावर प्रशासनाकडून नेमकी काय भूमिका घेतली जाईल, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## अखेर भाजपचे ठरले

# नागपूर शिक्षक मतदारसंघातून सुधाकर कोहळे यांना उमेदवारी

### प्रा.सोले, सेनाड भरणार अर्ज



**नागपूर/प्रतिनिधी** : : कधीकाळी भाजपचा सहज सोपा राहिलेला नागपूर शिक्षक, पदवीधर मतदारसंघ काँग्रेसने ताब्यात घेतल्यानंतर आता सोपा राहिलेला नाही. यावेळी तर मोठी बंडखोरी दिसत आहे. वर्षभरापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणूक प्रमुख केलेले माजी आमदार सुधाकर कोहळे यांच्यावर फडणवीस आणि पक्ष नेतृत्वाने विश्वास टाकत आज उमेदवारी जाहीर केली. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे नाराज कट्टर समर्थक माजी शिक्षक आमदार प्रा अनिल सोले उद्या नामांकन दाखल करणार आहेत.

दुसरीकडे दुसरीकडे अनेक वर्षे काम करणारे लोकजागृती मोर्चाचे अध्यक्ष ॲड. रमण सेनाड हे देखील उद्याच सोमवारी उमेदवारी अर्ज सादर करणार आहें. आता भाजपसाठी सोपी वाटणारी परीक्षा यंदा पुन्हा कठीण झाली आहे. नागपूरमध्ये काँग्रेसने विद्यमान आमदार अभिजित वंजारी यांना कायम कामाला लावले आहे. शेवटच्या क्षणी नवा उमेदवार जाहीर करण्याचा फंडा यावेळी पदवीधर निवडणुकीतही भाजपकडून वापरला जाण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व भारी ठरले.

पदवीधर मतदारसंघ नागपूर विभागात नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या सहा जिल्ह्यांचा समावेश आहे. नितीन गडकरी या परंपरागत मतदारसंघातून लढत असताना ते प्रत्यक्ष ☞(पान २ वर)

# डॉ. स्मिता योगेश जाधव यांचा भाजपमध्ये पक्षप्रवेश



**पुणे/प्रतिनिधी** : राज्यातील आगामी विधान परिषद निवडणुकांसाठी भारतीय जनता पक्षाने (भाजप) आपल्या तीन उमेदवारांच्या नावांची अधिकृत घोषणा केली आहे. यामध्ये सर्वात लक्षवेधी ठरलेल्या पुणे पदवीधर मतदारसंघातून शिक्षणतज्ज्ञ डॉ. स्मिता योगेश जाधव यांना भाजपने उमेदवारी जाहीर केली आहे. दरम्यान, आज सायंकाळी भाजपच्या पुणे शहर कार्यालयात डॉ. स्मिता योगेश जाधव यांचा पक्षप्रवेश सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. महाराष्ट्र भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत हा प्रवेश झाला. यावेळी पक्षाचे नेते आणि प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. स्मिता योगेश जाधव यांनी तंत्रज्ञान, व्यवस्थापन आणि शिक्षण अशा तिन्ही प्रमुख शाखांचे उच्च शिक्षण पूर्ण केले आहे. त्यांनी बी.ई. (कॉम्प्युटर्स), एमबीए (फायनान्शियल मॅनेजमेंट), पीएच.डी. (एज्युकेशन) प्राप्त केली आहे. तंत्रज्ञान आणि अर्थशास्त्राची उत्तम जाण असण्यासोबतच त्यांनी शिक्षण विषयात डॉक्टरेट पूर्ण केल्यामुळे शैक्षणिक प्रशासनाचा त्यांना सखोल अभ्यास आहे.

शिक्षण क्षेत्रात नवकल्पना, सर्जनशीलता आणि धोरणात्मक नेतृत्वाचा मेळ घालत नवे ☞(पान २ वर)

# २ वृद्ध महिलांच्या हत्येप्रकरणी चुलत नातू ताब्यात



**मोरगाव** : बारामती तालुक्यातील बाबुर्डी परिसरातील शेरेवाडी येथे दोन वृद्ध महिलांच्या निर्घृण हत्येने खळबळ उडाली होती. सुरुवातीला हा प्रकार चोरीच्या उद्देशाने बाहेरील व्यक्तीने केला असावा, असा संशय व्यक्त केला जात होता. मात्र, पोलिसांच्या तपासात या हत्याकांडाला वेगळेच वळण मिळाले असून, मृत महिलांचा चुलत नातू विकास राजेंद्र लडकत (वय २६) याला आज रविवारी रोजी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, संशयितावर बँक तसेच फायनान्स कंपन्यांचे कर्ज असल्याची माहिती समोर आली आहे. कर्जाचे हप्ते थकल्याने निर्माण झालेल्या आर्थिक अडचणीतून पैशांची गरज भागविण्यासाठी चोरीचा प्रयत्न करण्यात आला असावा, असा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे. याच प्रयत्नातून पुढे दुहेरी हत्याकांड घडल्याचा संशय आहे.

शेरेवाडीतील दोन्ही वृद्ध महिला एकत्र राहत असल्याची माहिती संशयिताला होती, असा तपासातील प्राथमिक निष्कर्ष आहे. रात्रीच्या वेळी घरात प्रवेश केल्यानंतर ☞(पान २ वर)

# वाढदिवशीच शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या



**रेणापूर (जि. लातूर) / वृत्तसंस्था-**: ज्या दिवशी आयुष्याचा आनंदोत्सव साजरा करायचा, त्याच जन्मदिवशी एका तरुण शेतकऱ्याने मृत्यूचा मार्ग निवडल्याची हृदयद्रावक घटना रेणापूर शिवारात रविवारी सकाळी घडली. रेणापूर येथील रहिवासी विलास सुभाष कुऱ्हाडे (वय ४४) यांनी रविवारी सकाळी स्वतःच्या शेतातील आंब्याच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. ही धक्कादायक घटना सकाळी साडेआठ वाजेच्या सुमारास उघडकीस आली. याबाबत रेणापूर पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

पोलिसांनी सांगितले, विलास कुऱ्हाडे हे रविवारी सकाळी 'शेतात जाऊन येतो' असे सांगत घरातून बाहेर पडले. रेणापूरपासून दक्षिणेला जवळपास तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या स्वतःच्या ☞(पान २ वर)

# शिस्तीच्या नावाखाली विद्यार्थ्यांचे अर्धे टक्कल!

## चंद्रपूर जिल्ह्यातील आदिवासी आश्रमशाळेतील संतापजनक प्रकार!



**चंद्रपूर /वृत्तसंस्था-**: विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत सुरक्षित, सन्मानाचे आणि आनंदी वातावरण मिळावे, अशी अपेक्षा असताना चिमूर तालुक्यातील जांभूळघाट येथील शासकीय माध्यमिक आश्रमशाळेत धक्कादायक प्रकार समोर आला आहे. केस कर्तनासाठी आलेल्या नाभिकाकडून एका विद्यार्थ्याचे चक्क अर्धे टक्कल करण्यात आल्याने आश्रमशाळेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शिस्तीच्या नावाखाली अधीक्षकांनी संतापाच्या भरात हा प्रकार घडवून आणल्याचा आरोप होत असून, पालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

चिमूर आदिवासी प्रकल्पांतर्गत येणारी ही निवासी आश्रमशाळा असून येथे सुमारे साडेपाचशे विद्यार्थी व विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. निवासी व्यवस्था असल्याने विद्यार्थ्यांच्या दैनंदिन गरजा आणि शिस्तीची जबाबदारी शाळा प्रशासनावर आहे. विद्यार्थ्यांचे केस कर्तन करण्यासाठी आदिवासी विभागाकडून शासनस्तरावर नियुक्त करण्यात आलेल्या नाभिकाची व्यवस्था करण्यात आली असून, शनिवार आणि रविवार हे दोन दिवस केस कर्तनासाठी निश्चित करण्यात आले आहेत. शनिवारी दुपारी सुमारे चार वाजताच्या सुमारास आश्रमशाळेच्या परिसरात विद्यार्थ्यांचे केस कर्तन सुरू होते. काही विद्यार्थ्यांचे केस कापण्याचे काम सुरू असताना इतर काही विद्यार्थी परिसरात खेळत असल्याचे ☞(पान २ वर)




# फेसबुकवरील आक्षेपार्ह कमेंटवरून वरोऱ्यात राजकीय वातावरण तापले

## आमदार करण देवतळे यांच्या पोस्टवरील टिप्पणीप्रकरणी भाजपची पोलिसांकडे कारवाईची मागणी



**चंद्रपूर /वृत्तसंस्था-**: वरोराचे भाजप आमदार करण संजय देवतळे यांच्या अधिकृत फेसबुक पोस्टवर करण्यात आलेल्या कथित आक्षेपार्ह आणि बदनामीकारक टिप्पणीवरून वरोऱ्यातील राजकीय वातावरण तापले आहे. या प्रकरणी वरोरा भाजप शहराध्यक्ष तथा नगरसेवक संतोष सुरेश पवार यांनी पोलिसांकडे निवेदन सादर करून संबंधित व्यक्तीविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.आमदार करण देवतळे यांच्या अधिकृत फेसबुक पोस्टवर एका युजरने ☞(पान २ वर)

# एसटी बस-दुचाकीची भीषण धडक, चिमुकलीसह तिघांचा मृत्यू!



**पैठण /वृत्तसंस्था-**: पैठण शहरातील बडजाते हॉस्पिटलजवळ रविवारी दुपारी एसटी बस आणि दुचाकीची भीषण धडक होऊन झालेल्या अपघातात दोन जणांसह अवघ्या तीन वर्षांच्या चिमुकलीचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

प्राथमिक माहितीनुसार, शेवगावकडून पैठणच्या दिशेने येणारी एमएच-०६ बीडब्ल्यू-४३६९ क्रमांकाची एसटी बस बडजाते हॉस्पिटलजवळ आली असताना एमएच-२० जीए-२९७९ क्रमांकाच्या दुचाकीला धडकली. धडक एवढी भीषण होती की, दुचाकीवरील तिघांना गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी तत्काळ मदतीसाठी धाव घेतली. मात्र, या दुर्घटनेत अशोक रमेश भोसले (वय ३३, रा. अंतरवाली राठी, जि. जालना) आणि कृष्णा अशोक गायकवाड (वय २३, रा. राक्षी, ता. शेवगाव, जि. ☞(पान २ वर)

# नागरिकांना मतदानापासून वंचित ठेवणारी प्रक्रिया मनमानी : न्यायमूर्ती उज्जल भुयान

## SIR वरून सुप्रीम कोर्टाच्या न्यायमूर्तींचं महत्त्वाचं विधान

**नवी दिल्ली :** एकीकडे एसआयआर प्रक्रियेवर वाद सुरू असताना दुसरीकडे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती उज्जल भुयान यांनी मोठं विधान केलं आहे. ज्या प्रक्रियेमुळे नागरिकांना अधिकारांपासून वंचित रहावे लागत असेल तर ही ती प्रक्रिया मनमान स्वरुपाची आहे, असं न्यायमूर्ती भुयान म्हणाले आहेत. ते एका कार्यक्रमात बोलत होते. राज्यासह देशभरात सध्या एसआयआर प्रक्रियेवर वाद सुरू आहे. देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली जातेय. एकीकडे हा वाद सुरू असताना दुसरीकडे SIR संदर्भात सुप्रीम कोर्टाचे न्यायमूर्ती उज्जल भुयान यांनी हे विधान केलंय. 'एखाद्या प्रक्रियेमुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणावर मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहावे लागत असेल तर अशी प्रक्रिया ही मनमानी स्वरूपाची आहे. भारतीय नागरिकाचा मतदानाचा



अधिकार हा संविधानाच्या मूलभूत संरचनेचा अविभाज्य भाग आहे. ही प्रक्रिया संविधानातील अनुच्छेद १४ आणि ३२६ चे उल्लंघन करणारी ठरेल, असं मत न्यायमूर्तींनी व्यक्त केलंय.

तसेच, कलम ३२६ अन्वये प्राप्त असलेल्या 'सार्वत्रिक प्रौढ मताधिकारा'वर आधारित मतदानाच्या अधिकारांशी छेडछाड करणाऱ्या कोणत्याही प्राधिकरणाच्या कृतीचे समर्थन कोणतेही न्यायालय करू शकत नाही, असंही परखड मत न्यायमूर्ती उज्जल भुयान यांनी व्यक्त केलंय.

दरम्यान, सध्या दिल्लीपासून ते मुंबईपर्यंत ज्ञानेश कुमार यांचा राजीनामा मागितला जातोय. दिल्लीमध्ये विद्यार्थी रस्त्यावर उतरले आहेत. आज मुंबईतही ठाकरे बंधुंनी मोर्चाचे आयोजन करत ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली. त्यामुळे आता कुमार राजीनामा देणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# दोन वाघांच्या हिंसक झुंजीत एकाचा मृत्यू

## ब्रम्हपुरी वनक्षेत्रात वाघांमधील अंतर्गत संघर्ष तीव्र

**चंद्रपूर -** वाघांच्या वाढत्या संख्येमुळे चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी वनक्षेत्रात प्रादेशिक वर्चस्वाची लढाई कमालीची तीव्र झाली आहे. उत्तर ब्रह्मपुरी वनपरिक्षेत्रात दोन वाघांच्या अशाच हिंसक झुंजीत दीड ते दोन वर्ष वयाच्या एका तरुण नर वाघाचा मृत्यू झाल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली. दरम्यान, हल्लेखोर वाघाची ओळख पटवण्यासाठी वनविभागाने परिसरात 'कॅमेरे' लावले आहेत.

एका बलाढ्य वाघाने तरुण वाघाचा थेट जंगलातून शेतापर्यंत पाठलाग करीत ठार मारले आणि त्यानंतर अर्धवट खाल्ल्याचे वनविभागाच्या तपासात समोर आले आहे. उत्तर ब्रह्मपुरी वनपरिक्षेत्रातील बरडकिन्ही येथील शेतकरी पटवारी गेडाम हे शेतात गेले असता, त्यांना वाघाचा छिन्नविच्छिन्न अवस्थेतील मृतदेह आढळला. त्यांनी तात्काळ वनविभागाला याची माहिती दिली. उपवनसंरक्षक डॉ. कुमारस्वामी, सहायक वनसंरक्षक डॉ. महेश गायकवाड, वनपरिक्षेत्र अधिकारी अरुप कन्नमवार यांच्या पथकाने घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला. घटनास्थळावरील रक्ताचे डाग आणि फरफटत नेल्याच्या खुणांवरून, बलाढ्य वाघाने जंगलातून पाठलाग करीत या तरुण वाघाला शेतात गाठून ठार केल्याचा अंदाज वनाधिकाऱ्यांनी वर्तवला आहे. मृत वाघाचे ब्रह्मपुरी येथील पशुवैद्यकीय रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले



असून, कायदेशीर प्रक्रिया म्हणून वाघाचा 'विसरा' पुढील न्यायवैद्यक चाचणीसाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आला आहे.

दरम्यान, हल्लेखोर वाघाची ओळख पटवण्यासाठी वनविभागाने परिसरात 'कॅमेरा ट्रॅप' लावले आहेत. ब्रह्मपुरीत वाघांची संख्या मर्यादेपेक्षा जास्त झाल्याने स्वतःचे क्षेत्र तयार करण्यासाठी तरुण वाघांना जुन्या वाघांशी संघर्ष करावा लागत असल्याचे वन्यजीव तज्ज्ञांचे म्हणणे आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण असून वनविभागाने ग्रामस्थांना शेतात जाताना काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.

# १ व १० वरील उर्वरित

### राष्ट्रपतींची निवडणूक होते

अथवा इथंही कुठं तरी असतील. माझं काय जातंय असं त्यांना वाटतं असेल तर तुझंही जातंय असं मला त्यांना सांगायचंय. माझी नजर पुरत नाही तिथपर्यंतच्या या लोकांना हे कळलं आहे. जे मागे अनेकदा बोललो होतो की प्रशासन आणि भाजप या दोन विरुद्ध गोष्टी आहेत. भाजपला सरकार चालवता येत नाही. ज्या पद्धतीने तुम्ही सरकार चालवत आहात, ते सूड उगवणे आहे. काल ठाण्यात आमच्या पूर्णेकरांची हत्या झाली. पोलीस काय करतायेत, कुठे आहेत गृहमंत्री, असा सवाल उद्धव ठाकरे यांनी विचारला.

राज ठाकरे काय म्हणाले? - 'देशभरात मतचोरीमुळे वातावरण तापलंय. मी २०१७ पासून सांगतोय, की मतचोरी सुरु आहे. त्यादरम्यान, मी काँग्रेसच्या नेत्या सोनिया गांधी, तृणमृल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी यांना भेटलो होतो. मी सतत सांगत होतो. मतांमध्ये चोरी होत आहे. त्यावेळी मी निवडणुकांवर बहिष्कार टाका, असं म्हणत होतो, असं राज ठाकरे म्हणाले. ?मत अशी कमी होऊ शकत नाही. या ठिकाणी सर्व बसलेले नेते देखील त्यावेळी होते, असं राज ठाकरेंनी सांगितले. २०२४ च्या निवडणुकीत संपूर्ण बहुमत महायुतीला मिळालं, पण महाराष्ट्रात जल्लोष नाही. लोकांमध्ये उत्साह नाही, जल्लोष नाही. संपूर्ण सन्नाटा होता, मग हा कोणता विजय? ४० ते ६० लाख मतदार वाढवले गेले. लोकसभा आणि विधानसभेत १ कोटी मत वाढली. तुमची इतकी मत वाढली आता सगळ्या गोष्टी उघड झाल्या,' असं राज ठाकरे भाषणात म्हणाले.

राज ठाकरे यांच्या दोन मागण्या - विधानसभेच्या वेळेला मतदार वाढवायचे आणि त्यातून सत्ता घ्यायची आणि एईं मधून दोन कोटी मतदार वगळायचे. हे कोण लोक आहेत? कोणत्याही परिस्थितीत एईं रद्द झालं पाहीजे आणि ईव्हीएम बंद करून बॅलेट पेपरवर मतदान झालं पाहीजे. माझ्या फक्त दोनच मागण्या आहेत. त्यातील पहिली म्हणजे, महाराष्ट्रात जो एसआयआर झाला, तो रद्द करावा. तसेच दुसरी मागणी म्हणजे ,यापुढे बॅलेट पेपरवर निवडणुका झाल्या पाहिजे. यामुळे दूध का दूध आणि पानी का पानी होईल, असं राज ठाकरे म्हणाले.

### अखेर भाजपचे ठरले

निवडणुकीच्या आधीपासून नियोजन करीत होते. यंदा कोहळे यांनीही आपले होमवर्क झाल्याचा दावा केला आहे. बघूया आता काँग्रेस हा मतदारसंघ टिकवते की भाजप पुन्हा परत घेते.

असा आहे निवडूक कार्यक्रम

६ ऑक्टोबर ही उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख आहे. ७ ऑक्टोबरला अजांची छाननी होईल, तर ९ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी मागे घेता येईल. २३ ऑक्टोबरला मतदान आणि २७ ऑक्टोबरला मतमोजणी होणार आहे. अमरावतीमध्येही महायुतीत विद्यमान भाजप आमदार, शिवसेनेसाठी ही जागा सुटल्याने ते आणि प्रहार असे तीन प्रबळ तर इतर अपक्ष दावेदार आहेत. सर्वांची शक्तिप्रदर्शन सुरू आहे. अद्याप उमेदवार जाहीर झालेला नाही.

### डॉ. स्मिता योगेश जाधव

बदल घडवण्यात डॉ. स्मिता योगेश जाधव यांचे भरीव योगदान राहिले आहे. सध्या त्या महत्त्वाच्या पदांवर कार्यरत आहेत. यामध्ये प्र-कुलगुरू : पिंपरी (पुणे) येथील नामांकित डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, सचिव : डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ सोसायटी अशा पदांवर त्या कार्यरत आहेत. शैक्षणिक धोरणांची आखणी आणि संस्थात्मक प्रशासन हाताळण्याचा त्यांना दांडगा अनुभव आहे.

### २ वृद्ध महिलांच्या हत्येप्रकरणी

महिलांनी संशयिताला ओळखल्याने गुन्हा उघडकीस येण्याची भीती निर्माण झाली असावी. त्यातून दोन्ही महिलांवर प्राणघातक हल्ला करण्यात आल्याचा पोलिसांचा संशय आहे.

दोन्ही महिला झोपेत असताना त्यांच्यावर कुऱ्हाडीने हल्ला करण्यात आल्याची माहिती तपासातून पुढे आली आहे. या हल्ल्यात दोघींचा मृत्यू झाला. घटनेनंतर शेरेवाडी परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

गुन्ह्यानंतर कुऱ्हाड आणि रक्ताळलेले कपडे विहिरीत फेकल्याचा संशय

हत्येनंतर गुन्ह्यात वापरलेली कुऱ्हाड तसेच रक्ताचे डाग असलेले कपडे जवळील विहिरीत फेकण्यात आल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे. या वस्तूंचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून कारवाई सुरू आहे. या वस्तू हस्तगत झाल्यानंतर हत्याकांडाच्या तपासाला आणखी ठोस दिशा मिळण्याची शक्यता आहे. घटनास्थळाच्या परिसरात ण्ऊ कॅमेऱ्यांची उपलब्धता मर्यादित असल्याने पोलिसांसमोर तपासाचे मोठे आव्हान होते. मात्र, सुपे पोलिसांनी स्थानिक माहिती, गुप्त बातमीदारांचे नेटवर्क आणि तांत्रिक तपासाच्या माध्यमातून संशयिताच्या हालचालींचा मागोवा घेतला.

### वाढदिवशीच शेतकऱ्याची

शेतात त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलले. आंब्याच्या झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत त्यांचा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती वाऱ्यासारखी पसरताच नातेवाइक अन् ग्रामस्थांनी शेताकडे धाव घेतली. रविवार हा त्यांचा वाढदिवसाचा दिवस होता. त्यांनी याच दिवशी गळफास घेत मरणाला कवटाळल्याने खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे रेणापुरातील एकुरगे गल्ली अन् परिसरात शोककळा पसरली असून, विलास कुऱ्हाडे यांनी एवढे टोकाचे पाऊल का उचलले? याचे कारण समोर आले नाही.

### शिस्तीच्या नावाखाली विद्यार्थ्यांचे

सांगण्यात येते. यामुळे संतप्त झालेल्या अधीक्षकांनी संबंधित नाभिकाला विद्यार्थ्यांचे अर्धे टक्कल करण्याचे निर्देश दिल्याचा आरोप आहे. तब्बल ८२ विद्यार्थ्यांचे ट्रिमर च्या सहायाने केस कापण्यात आल्याने ते विचित्र अवस्थेत राहिले. या प्रकारामुळे विद्यार्थ्यांच्या मनावर काय परिणाम झाला, त्याला मानसिक त्रास झाला का आणि त्याची संमती घेण्यात आली होती का, असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

### फेसबुकवरील आक्षेपार्ह कमेंटवरून

आक्षेपार्ह स्वरूपाची टिप्पणी केल्याचा आरोप भाजपकडून करण्यात आला आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा वापर करून लोकप्रतिनिधीची बदनामी करण्याचा प्रयत्न झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

संबंधित फेसबुक अकाउंटची तांत्रिक माहिती मिळवून टिप्पणी करणाऱ्या व्यक्तीची ओळख निश्चित करावी, तसेच उपलब्ध डिजिटल पुराव्यांच्या आधारे या प्रकरणाची सखोल चौकशी करावी, अशी मागणी भाजपने केली आहे. तसेच आक्षेपार्ह मजकूर पुढे प्रसारित होऊ नये, यासाठी आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करण्याची विनंती पोलिसांकडे करण्यात आली आहे.

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तातडीने चौकशी करून दोषी आढळणाऱ्या व्यक्तीवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी भाजप पदाधिकाऱ्यांनी केली. यावेळी दिलीप घोरपडे, जगदीश तोटावार, अमित चवळे, अनिकेत नाकाडे, अजिंक्य नरडे, पंकज गाडगे, राहुल बंदूरकर, प्रशांत उलमले, सूरज केशवानी, अनिकेत मितलवार, शुभम गोल्हार यांच्यासह भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.

### एसटी बस-दुचाकीची भीषण

अहिल्यानगर) यांच्यासह अवघ्या तीन वर्षांच्या चिमुकलीचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. घटनेची माहिती मिळताच पैठण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थितीचा पंचनामा केला. अपघातग्रस्त एसटी बस पोलिसांनी ताब्यात घेतली असून ती पैठण पोलीस ठाण्याच्या आवारात लावण्यात आली आहे. मृतदेह पुढील वैद्यकीय व कायदेशीर कार्यवाहीसाठी शासकीय घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती आहे.

### बनावट कागदपत्रे तयार

व्यक्तीला विकण्यात आला. या व्यवहारातून १२ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक करण्यात आल्याचा आरोप आहे. आपल्या मालकीच्या जागेचा परस्पर व्यवहार झाल्याचे लक्षात आल्यानंतर संतोष पुसतकर यांनी नांदगावपेठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

या तक्रारीवरून पोलिसांनी प्रफुल काळे (रा. दिवानखेड, अमरावती), पवन कुमरे (वय २३, रा. घोडदेव, मोर्शी), कमलनाथ हनवते (वय ३०, मध्य प्रदेश) आणि अन्य एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. बनावट कागदपत्रे कशी तयार करण्यात आली, उपनिबंधक कार्यालयात कोणत्या पद्धतीने व्यवहार करण्यात आला आणि या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा तपास नांदगावपेठ पोलीस करीत आहेत.

### अमरावती शिक्षक मतदारसंघ

उपस्थित राहून आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन महायुतीचे उमेदवार किरण सरनाईक यांनी केले आहे.

### सातबारा बदलाच्या प्रकरणात

आधार घेतला आहे. तो आदेश नेमका कोणी दिला. त्याचा आदेश क्रमांक व प्रकरण क्रमांक काय आहे.आणि त्या आदेशाची अधिकृत नोंद महसूल अभिलेखात कुठे आहे.असा सवाल उपस्थित झाला आहे.

या प्रकरणातील सातबारा, फेरफार नोंद, संबंधित आदेश, ऑनलाइन नोंद बदलण्याची तारीख व वेळ तसेच संपूर्ण महसूल अभिलेखांची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी दिपक देशमुख यांनी केली आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी अधिकृत कागदपत्रांच्या आधारे स्पष्टीकरण द्यावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.

### शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा

डॉ. धनंजय तट्टे,डॉ.प्रदीप कुऱ्हाडे,प्रशांत डहाणे, सुहास ठाकरे, विकास ठाकरे, प्रकाश विघे,गजानन कानफाडे,वामनराव भडके,सागर ठाकरे,रवी परतेती,गोकुल राऊत,तट्टे सर,इजाज खान सर, माजी जि.प.सदस्य वृषाली विघे,माजी नगराध्यक्षा विद्या ढवळे,सविता ठाकरे, राजश्री भुयार इ. मान्यवर उपस्थित होते. सर्वप्रथम हर्षवर्धन देशमुख व अदिती पोहरे यांच्या हस्ते डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या पुतळ्याचे हार घालून पूजन करण्यात आले.यावेळी माजी मंत्री हर्षवर्धन देशमुख यांनी अदिती पोहरे या अमरावती शिक्षक मतदार संघातील निवडणुकीच्या रिंगणात असून शिक्षकांच्या प्रलंबित मागण्या सेवा सुविधा, वेतन,पदोन्नती,पेन्शन तसेच शिक्षण क्षेत्रातील प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करण्याचा त्यांचा निर्धार आहे.केंद्र व राज्य सरकारने शिक्षण क्षेत्रात कोणतीही अशी भरीव कामगिरी केली नसल्याची खंत व्यक्त करत त्यांनी प्रा.अदिती ऋषिकेश पोहरे यांना एक नंबर पसंतीचे मत देऊन तिला संधी प्राप्त करून दिल्यास शिक्षकांचे सर्व प्रलंबित प्रश्न ती सोडविल्याशिवाय राहणार नाही अशी ग्वाही त्यांनी दिली.दरम्यान उपस्थित न.प.उर्दू हायस्कूलचे मुख्याध्यापक दानिश सर, आर आर लाहोटी कॉलेजचे प्रा.कांबळे सर, डॉ.धनंजय तट्टे यांनी आपले विचार व्यक्त करतांना शिक्षकांचे कित्येक प्रश्न प्रलंबित असून ते सोडवण्यासाठी जास्तीत जास्त मताधिक्क्याने प्रा.अदिती पोहरे यांना निवडून देण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.प्रदीप कुऱ्हाडे, संचालन प्रेमा नवरे यांनी तर आभार प्रदर्शन सागर ठाकरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिवाजी हायस्कूलचे मुख्याध्यापक अजय धोटे, उपमुख्याध्यापक मिलिंद ढाकूलकर सर्व शिक्षक शिक्षिका,भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे पदाधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे पदाधिकारी कार्यकर्ते यांनी अथक परिश्रम घेतले.या मेळाव्याला मोर्शी शहरासह तालुक्यातील मोठ्या संख्येने शिक्षक शिक्षिका उपस्थित होत्या.

### शिक्षकांच्या प्रलंबित समस्या

भूमिका, टिईटी सक्ती रद्द करण्यासाठी महत्वपूर्ण भूमिका यासह अनेक शिक्षकांच्या महत्वपूर्ण प्रश्नावर सभागृहात आवाज उठवणार असून वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय नेते ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांचे मार्गदर्शनात शिक्षक बांधवांसाठी लढणार असल्याची माहिती गाजी जाहेरोश यांनी दिली.

पत्रकार परिषदेला वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हा अध्यक्ष अंकुश वाकपांजर, जिल्हा महासचिव सागर भवते, जेष्ठ नेते बाबाराव गायकवाड, रमेश आठवले, सुरेश तायडे, प्रशांत गजभिये, शैलेश बागडे, अमोल जवंजाळ, विजय डोंगरे, करण गायकवाड यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### वर्कशॉप फोडून लोखंडी साहित्य

वर्कशॉप बंद केले आणि ते घरी गेले. दुसऱ्या दिवशी दुपारी दोनच्या सुमारास ते पुन्हा वर्कशॉपवर पोहोचले असता शटर तुटलेल्या अवस्थेत दिसून आले. शटरची पाहणी केल्यानंतर खान यांनी आत प्रवेश केला. त्यावेळी वर्कशॉपमधील विविध लोखंडी वस्तू तसेच लेथ मशीनचे गिअर जागेवर नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. अज्ञात चोरट्याने रात्रीच्या वेळी शटर तोडून चोरी केल्याचे स्पष्ट झाले. चोरी झालेल्या साहित्याची किंमत ३६ हजार ६०० रुपये असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले. या प्रकरणी खान यांच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी गुन्हा दाखल केला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली डी.बी. पथकाने तपास सुरू केला. उपलब्ध माहितीच्या आधारे पोलिसांनी संशयित इमरान बेग युनुस बेग (वय ३०, रा. वलगाव रोड, धर्मकाटा) याचा शोध घेत त्याला अटक केली. त्याच्याकडून चोरीस गेलेले संपूर्ण लोखंडी साहित्य व लेथ मशीनचे गिअर जप्त करण्यात आले. पुढील तपास राजापेठ पोलीस करीत आहेत.

### दुचाकींच्या धडकेत तरुणाचा बळी

४९/एवाय १४६७ असा आहे. ते कुटांगा गावासमोरून जात असताना समोरून येणाऱ्या दुसऱ्या दुचाकीने त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली. धडक इतकी जोरदार होती की चंपालाल गंभीर जखमी होऊन रस्त्यावर कोसळले. अपघाताची माहिती मिळाल्यानंतर त्यांना तातडीने धारणी उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर त्यांना मृत घोषित केले. या घटनेनंतर मृताचे चुलतभाऊ परसराम राधेलाल धुर्वे (वय ४०, रा. हरदा) यांनी धारणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी निकेश छोटेलाल वाघमारे (वय २३, रा. मोहननगर, परतवाडा) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. तक्रारीनुसार, संबंधित दुचाकीस्वाराने वाहन निष्काळजीपणे व भरधाव वेगाने चालवून चंपालाल यांच्या दुचाकीला धडक दिल्याचा आरोप आहे. या अपघातास नेमकी परिस्थिती काय होती, वाहनाचा वेग किती होता आणि धडकेस कारणीभूत ठरलेले अन्य घटक कोणते, याचा तपास धारणी पोलीस करीत आहेत.

### काँग्रेसनगर चौकात कारची

धाव घेतली. दरम्यान, कारचालकाने वाहनावर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न केला; मात्र कारने रस्त्यावरील अन्य दोन युवकांनाही धडक दिल्याचे सांगण्यात येते. त्यानंतर कार रस्त्याच्या कडेला असलेल्या पोलवर आदळली. या प्रकारामुळे घटनास्थळी मोठी गर्दी झाली. अपघातात जखमी झालेल्या नागरिकांची अवस्था पाहून काही जण संतप्त झाले. त्यांनी कारचालकाला वाहनातून बाहेर काढून मारहाण केली. त्यामुळे काही काळ परिसरात गोंधळाची स्थिती निर्माण झाली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून परिस्थिती नियंत्रणात आणली. प्रफुल्ल यांच्या तक्रारीवरून संबंधित कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपघाताचे नेमके कारण, वाहनाचा वेग आणि जखमींची वैद्यकीय स्थिती याबाबत तपास सुरू आहे.

### लिफ्ट देण्याच्या बहाण्याने

इसमांनी त्यांना हात दाखवून मदत मागितली. राठोड यांनी दोघांना दुचाकीवर बसवून घेतले. मात्र, काही अंतर पुढे गेल्यानंतर त्यांनी राठोड यांना कच्च्या रस्त्यावर नेले. तेथे एकाने राठोड यांना पकडून ठेवले, तर दुसऱ्याने दगडाने त्यांच्या डोक्यात वार केला. त्यानंतर त्यांच्या खिशातील तीन हजार रुपये, सुमारे पाच हजार रुपये किमतीचा विवो मोबाइल आणि दीड लाख रुपये किमतीची युनिकॉर्न दुचाकी (एमएच २७ ईडी ९५६८) असा १ लाख ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल हिसकावून दोघे पसार झाले. राठोड यांच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी गुन्हा क्रमांक ८५६/२०२६ दाखल केला. तांत्रिक पुरावे उपलब्ध नसतानाही पोलिसांनी मिळालेल्या माहितीच्या आधारे तपासाला दिशा दिली. काही तासांतच आकाश गौतम तंतरपाळे (वय २६) आणि अमोल ऊर्फ बंटी रुपेश सावरकर (वय २३) यांना अटक करण्यात आली. आरोपींकडून युनिकॉर्न दुचाकी व तीन हजार रुपये रोख असा १ लाख ५३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पुढील तपास राजापेठ पोलीस करीत आहेत.

### स्वच्छता मोहिमेत नगराध्यक्षासह

मारोटकर, आरोग्य सभापती जोत्स्ना धवसे यांनी हातात झाडू घेऊन शहराची साफसफाई करत स्वच्छ शहर, सुंदर शहराचा संदेश दिला तसेच एकूण ४० सफाई कामगारांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी न.पं. सभापती वासुदेव लोखंडे, मो. रियाज, कांता लोमटे , नगरसेवक प्रकाश मारोटकर, प्रिती इखार, शिला वाडेकर, शेख हारून, स्वच्छता निरीक्षक प्रितम सोनटक्के, समन्वयक साक्षी गणोरकर, अशोक चिंडाले इत्यादी उपस्थित होते.

# छत्रीतलाव परिसरात लायन्स क्लबतर्फे प्लास्टिक कचरा संकलन




**अमरावती/प्रतिनिधीः-** लायन्स क्लब ऑफ अमरावती रियल व लायन्स क्लब ऑफ अमरावती रियल सफायर यांची संयुक्त सर्व्हिस अक्टिव्हिटी – एन्व्हायरमेंटल अंतर्गत प्लास्टिक कचरा संकलन उपक्रम रविवार, दि. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ७.३० ते ९.३० छत्रीतलाव गार्डन, अमरावती येथे घेण्यात आला.

या उपक्रमात गार्डन परिसरातील प्लास्टिकच्या बाटल्या, प्लास्टिक पिशव्या, कागद, गुटख्याचे पाऊच तसेच इतर प्रकारचा कचरा मोठ्या प्रमाणात संकलित करण्यात आला. संकलित केलेला कचरा महानगरपालिकेच्या कचरा वाहतूक वाहनाद्वारे पुढील विल्हेवाटीसाठी नेण्यात आला.

या प्रसंगी कॅबिनेट ऑफिसर लायन डॉ. निखिल जैन, लायन जय तेजवानी, लायन्स क्लब ऑफ अमरावती रियलचे अध्यक्ष डॉ. दीपक कऱ्हे, सचिव श्याम जाडीया तसेच सदस्य नितीन टवलारे, चंद्रदत्त मिश्रा, हरीश उदासी, संजीव पोटे, सुरेंद्र मावळे, मनीष गुल्हाने व त्यांची मुले पूर्वी गुल्हाने व मंथन गुल्हाने आदी उपस्थित होते. नागरिकांमधून मुकुंदराव गोटे, डॉ. किशोर ठाकरे, मंथन कडू, दीपक अलोने, चांदूरकर , ठाकरे यांचीही उपस्थिती होती.

लायन्स क्लब ऑफ अमरावती रियल सफायरच्या अध्यक्षा नेहा उदासी, उपाध्यक्षा रितू तेजवानी, गिता मिश्रा, ज्योती टवलारे व ज्योती कऱ्हे यांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला.लायन्स क्लबच्या या पर्यावरणपूरक उपक्रमाला सामान्य नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद देत स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला. परिसरातील कचरा व प्लास्टिक संकलित करून गार्डन परिसर स्वच्छ झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले तसेच लायन्स क्लबच्या कार्याचे कौतुक केले.

### लग्नाचे आमिष दाखवून महिलांचे

दाखल करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, आरोपीने पीडितेला लग्नाचे आश्वासन दिले. त्यानंतर फिरण्याच्या बहाण्याने तिला धामणगाव येथील एका हॉटेलमध्ये नेऊन तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले. आरोपीने वारंवार लग्न करण्याचे आश्वासन देत पीडितेसोबत शारीरिक संबंध ठेवल्याचा आरोप आहे. यातून पीडिता गर्भवती झाली. त्यानंतर तिने आरोपीकडे लग्नासाठी आग्रह धरला असता त्याने लग्न करण्यास नकार देत टाळाटाळ केल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी बाभुळगाव पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या ऑनलाइन झिरो एफआयआरच्या आधारे दत्तापूर पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

**इन्स्टाग्रामवरील ओळखीनंतर लग्नाचे आमिष-** दर्यापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत संजय गमे (वय ४०, रा. नेवरे, ता.माळशिरस, जि. सोलापूर) याच्याविरुद्ध दुसरा गुन्हा दाखल झाला आहे. तक्रारीनुसार, आरोपीची पीडितेशी इन्स्टाग्रामच्या माध्यमातून ओळख झाली. मे २०२५ पासून दोघांमध्ये मैत्रीचे संबंध निर्माण झाल्यानंतर आरोपीने तिला लग्नाचे आश्वासन दिले. यानंतर आरोपीने पीडितेला दर्यापूर येथे आणून तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याचा आरोप आहे. पीडितेने दिलेल्या जबानीच्या आधारे दर्यापूर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. दोन्ही प्रकरणांमध्ये संबंधित पोलीस ठाण्यांकडून आरोपींच्या भूमिकेसह घटनेतील अन्य बाबींची चौकशी केली जात आहे.

### निजामपूर-बोपापूर शिवारात

हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी ड्रोन कॅमेरा , सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा माध्यमातून लक्ष ठेवले जात आहे .मात्र या कॅमेरामध्ये बिबट्याची हालचाली कैद झाली नसल्याची माहिती परतवाडा वनपरिक्षेत्र अधिकारी निशा मोकाशे यांनी प्रतिनिधीशी बोलताना दिली .ग्रामस्थानी अफवांवर विश्वास न ठेवता आवश्यक काळजी घेण्याचे वनपरिक्षेत्र विभागाकडून करण्यात आले आहे .

### सुवर्णकन्या कुमकुम मोहोड,

नाव उज्ज्वल करणाऱ्या खेळाडूंचे स्वागत, जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती, क्रीडा व युवक संचानाय महाराष्ट्र राज्य पुणे, उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा अमरावती विभाग अमरावती, जिल्हा क्रीडा अधिकारी अमरावती महाराष्ट्र धनुर्विद्या संघटना अमरावती जिल्हयातील खेळ संघटना, शाळा, महाविद्यालय, यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यता येणार आहे.

**फ्लॅट विकणे आहे**

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.

**संपर्क : ९४२२८५७१६९
९४२२१२०४०६**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ सोमवार, ५ ऑक्टोबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# अमरावती शिक्षक मतदारसंघात आरोपांची धग!

## किरण सरनाईकांवरील आरोपांवर मुख्यमंत्री गंभीर

■ प्रतिनिधी | रिसोड ■

अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. भाजप शिक्षक आघाडीचे संयोजक चंद्रशेखर भोयर यांनी विद्यमान आमदार किरणराव सरनाईक यांच्यावर गंभीर आरोप करत या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली होती. या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रकरणाच्या चौकशीसाठी SIT (विशेष तपास पथक) स्थापन करण्याचे निर्देश दिल्याची माहिती समोर आली आहे.

भोयर यांनी शिक्षक मतदारसंघातील निवडणूक प्रक्रियेबाबत अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. शिक्षक मतदारांना आकर्षित करण्यासाठी कथित भेटवस्तू व आर्थिक प्रलोभने दिल्याचा आरोप त्यांनी केला आहे. तसेच काही शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा राजकीय कामासाठी वापर होत असल्याचा दावाही त्यांनी केला आहे.

### एसआयटी चौकशीचे आदेश



### निवडणुकीच्या तोंडावर आरोपांची तोफ

शिक्षक मतदारसंघाची निवडणूक जवळ येत असताना विद्यमान आमदारांवर करण्यात आलेल्या या आरोपांमुळे राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. आरोपांमध्ये तथ्य आहे का? निवडणूक प्रक्रियेत नियमांचे उल्लंघन झाले का? शिक्षक मतदारांवर कोणत्याही प्रकारचा दबाव किंवा प्रलोभन आणले गेले का? या प्रश्नांची उत्तरे आता चौकशीमधून समोर येण्याची अपेक्षा आहे.

मुख्यमंत्र्यांनी SIT चौकशीला हिरवा कंदील दिल्याने या प्रकरणाचे गांभीर्य वाढले आहे. त्यामुळे आता चौकशी यंत्रणा नेमकी कोणती कागदपत्रे, व्यवहार, कथित वाटप आणि निवडणूक प्रक्रियेतील बाबी तपासणार, याकडे शिक्षक वर्गासह राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### आरोप सिद्ध होणार की राजकीय वाद ठरणार?

चंद्रशेखर भोयर यांनी केलेले आरोप सध्या आरोपांच्या स्वरूपात आहेत. त्यांची सत्यता अधिकृत चौकशीतूनच स्पष्ट होणार आहे. दुसरीकडे, आमदार किरणराव सरनाईक यांची या आरोपांवरील भूमिका आणि स्पष्टीकरणही महत्त्वाचे ठरणार आहे.

आता प्रश्न एवढाच — SIT चौकशीतून नेमके काय समोर येणार? आरोपांना पुराव्याची जोड मिळणार की हे केवळ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरील राजकीय आरोप ठरणार? याकडे अमरावती विभागातील शिक्षक मतदारांचे लक्ष लागले आहे.

# शहरातील पाणीपुरवठा व रस्त्यांच्या समस्यांचा जिल्हाधिका–यांनी घेतला आढावा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम शहरातील विविध नागरी समस्या तसेच पाणीपुरवठ्याच्या अनुषंगाने सुरू असलेल्या कामांवर संबंधित विभागांनी समन्वयाने लक्ष देऊन आवश्यक उपाययोजना कराव्यात. नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणींचे तातडीने निराकरण करण्यासाठी प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक कार्यवाही करावी, असे जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी सांगितले.



शहरातील विविध ठिकाणी सुरू असलेल्या कामांची जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष पाहणी करून आढावा घेतला. यावेळी वाशिम नगराध्यक्ष अनिल केंदळे, नगरपालिका सहआयुक्त डॉ. बाबुराव बिक्कड, मुख्याधिकारी अरविंद मुंढे, उपअभियंता चव्हाण, नगरपालिका सदस्य बापू भैय्या ठाकूर तसेच भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अभियंता उपस्थित होते.

महामार्ग प्राधिकरणाच्या सुरू असलेल्या कामामुळे निर्माण झालेल्या अडचणींची पाहणी करताना टेम्पल गार्डन परिसरातील सेवा रस्त्यालगत साचणारे पाणी तसेच मणिप्रभा हॉटेलसमोरील सेवा रस्त्याखालील पाणीवाहिनीची गळती तातडीने दुरुस्त करून घेण्याचे निर्देश जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना दिले. तसेच पाणी साचण्यासह इतर अडचणीही तातडीने दूर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. जलशुद्धीकरण केंद्राच्या पाहणीदरम्यान गाळणी तळ बसविण्याच्या कामाचा आढावा घेण्यात आला.

# डॉ. विशाल सोमटकर यांची विधानसभा समन्वयकपदी नियुक्ती



■ प्रतिनिधी | वाशिम ■

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने विधानसभा मतदारसंघनिहाय समन्वयकांची नियुक्त्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांनी २ ऑक्टोबर २०२६ रोजी जाहीर केल्या आहेत. त्यानुसार वाशीम-मंगरूळपीर विधानसभा मतदारसंघाच्या समन्वयकपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेतृत्व डॉ. विशाल सोमटकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण हा निवडणूक प्रक्रियेच्या दृष्टीने महत्त्वाचा उपक्रम असून, मतदार यादीतील पात्र मतदारांची नावे कायम राहणे, अपात्र अथवा दुबार नोंदींची पडताळणी होणे तसेच नागरिकांना मतदार यादीशी संबंधित आवश्यक माहिती व मार्गदर्शन मिळणे, या दृष्टीने समन्वयकांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. वाशीम-मंगरूळपीर विधानसभा मतदारसंघात या कार्यक्रमाच्या अनुषंगाने पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये समन्वय साधण्याची जबाबदारी डॉ. सोमटकर यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

डॉ. विशाल सोमटकर यांच्या नियुक्तीमुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. पक्षाच्या संघटनात्मक कामकाजात सक्रिय असलेल्या डॉ. सोमटकर यांच्यावर सोपविण्यात आलेली ही जबाबदारी ते प्रभावीपणे पार पाडतील, असा विश्वास पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. तर निवडी संदर्भात बोलताना डॉ. विशाल सोमटकर यांनी या निवडीचे श्रेय आदरणीय चंद्रकांतदादा ठाकरे साहेब यांना दिल्याचे सांगितले.

# कृष्णा येथे बंजारा लेंगी नृत्याने रंगला गणेशोत्सव

■ प्रतिनिधी | वाशिम ■

श्री गणेशोत्सवानिमित्त कृष्णा येथे बंजारा समाजाच्या समृद्ध लोकपरंपरेचे दर्शन घडविणाऱ्या पारंपरिक लेंगी नृत्य व गायनाचा सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात पार पडला. सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त महात्मा ज्योतिबा फुले शिक्षण, कला, क्रीडा व आरोग्य बहुउद्देशीय संस्था, उमरा शम, ता. जि. वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने हा विनामूल्य लोककला सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

- पारंपरिक लोककलेच्या जतन-संवर्धनाचा संदेश
- महिला कलावंतांच्या सादरीकरणाला उत्स्फूर्त प्रतिसाद



कार्यक्रमात बंजारा लेंगी नृत्य, पारंपरिक गायन आणि हलगी वादनाने वातावरणात उत्साह निर्माण केला. पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या महिला कलावंतांनी सादर केलेल्या लेंगी नृत्याला उपस्थित नागरिक व महिलांनी उत्स्फूर्त दाद दिली. लोककलेच्या माध्यमातून बंजारा समाजाची संस्कृती, परंपरा आणि कलावैभव उपस्थितांसमोर प्रभावीपणे उभे राहिले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात शाहीर संतोष खडसे यांनी बंजारा लेंगी ही केवळ मनोरंजनाची कला नसून समाजाच्या सांस्कृतिक परंपरेचा महत्त्वपूर्ण ठेवा असल्याचे सांगितले. बदलत्या काळात पारंपरिक लोककला लोप पावू नयेत यासाठी त्यांचे जतन व संवर्धन करणे आवश्यक आहे. आपल्या कला, संस्कृती आणि लोकपरंपरांचा वारसा जतन केला.

या कार्यक्रमात रेणुकाबाई चव्हाण, गंगाबाई चव्हाण, शांतीबाई राठोड, गोदीबाई चव्हाण, भिवरीबाई चव्हाण, चंदाबाई राठोड, बालाबाई राठोड, अनुसयाबाई राठोड, बेबीबाई राठोड, सुलाबाई राठोड, कमलाबाई राठोड, धम्मीबाई राठोड, नंदाबाई राठोड, जयवंती चव्हाण व कलाबाई चव्हाण यांनी लेंगी नृत्य व गायन सादर केले. हलगी वादनाची साथ अंकुश राठोड व अश्विन चव्हाण यांनी केली. ज्येष्ठ कलावंत विठ्ठल राठोड, कैलास चव्हाण (कारभारी), उत्तम राठोड व राजू चव्हाण यांनीही साथसंगत केली. कार्यक्रमास ज्योतीराम राठोड, कीसन चव्हाण, दगडू राठोड, शालीकराम राठोड, संपत इंगोले, विश्वनाथ इंगोले, राजाराम इंगोले, विश्वजीत खडसे, अमोल इंगोले, दगडू इंगोले यांच्यासह बहुसंख्य नागरिक व महिला उपस्थित होत्या. या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन शाहीर संतोष खडसे, अध्यक्ष, महात्मा ज्योतिबा फुले शिक्षण, कला, क्रीडा व आरोग्य बहुउद्देशीय संस्था, उमरा शम तथा मा. राजर्षी शाहू महाराज साहित्यिक कलावंत मानधन समिती सदस्य, जिल्हा वाशिम यांनी केले.

# ॲड. आप्पासाहेब सरनाईक यांची आज जयंती



**वाशिम :** तळागाळातील गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या ध्येयाने श्री शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना करणारे संस्थापक सचिव, शिक्षणमहर्षी स्वर्गीय ॲड. आप्पासाहेब सरनाईक यांची जयंती सोमवार, दि. ५ ऑक्टोबर रोजी विविध उपक्रमांनी साजरी करण्यात येणार आहे.

ॲड. आप्पासाहेब सरनाईक यांनी १९६१ मध्ये श्री शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना करून वाशिम जिल्ह्यात शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने त्यांनी लावलेल्या या छोट्याशा रोपट्याचे आज विस्तारलेल्या शैक्षणिक वटवृक्षात रूपांतर झाले आहे.

# बालविकास मंदिर प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा कार्यक्रमातील सहभाग कौतुकास्पद -संदीप पोफळे



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मालेगाव येथील तहसील कार्यालयाजवळ बोरगाव रोडवरील श्री व्यंकटेश सेवा समिती द्वारा संचालित बालविकास मंदिर प्राथमिक शाळा मालेगाव येथे राष्ट्रपिता माहत्मा गांधी व लाल बहादुर शास्त्री जयंती साजरी करण्यात आली .सदर कार्यक्रमाचे अध्यक्षा सुषमा इंगळे,प्रमुख अतिथी संतोष हिवराळे व संदीप पोफळे, मेहकरकर उपस्थितीत होते. उपस्थित मान्यवरांनी यानंतर राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन व हार अर्पण केले.यावेळी उपस्थित मान्यवरांचे शाळेच्या वतीने पुष्पगुच्छ व पुस्तक देउन सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रमानिमित्त शाळेमध्ये भाषण स्पर्धा,वेशभूषा स्पर्धा व गीत गायन स्पर्धा आयोजित करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी संतोष हिवराळे यांनी महात्मा गांधी यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील कार्याची माहिती दिली. स्पर्धेमध्ये प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले.सदर कार्यक्रमाचं सूत्रसंचालन वर्ग ७ वीच्या श्रावणी वंजारी व दिपाली खुळे यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन वंदना गवई व अमोल बोडखे यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल भिसडे व सर्व शिक्षक यांनी सहकार्य करून कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

# स्व. गंगाबाई सवाई यांच्या १६ व्या स्मृतिदिनी पर्यावरण संवर्धनाचा संकल्प



■ प्रतिनिधी | कारंजा ■

मृत्यूनंतरही समाजासाठी काहीतरी देण्याची प्रेरणा देणाऱ्या, कारंजा परिसरातील प्रथम नेत्रदात्या स्वर्गीय सौ. गंगाबाई रामदास सवाई यांच्या १६ व्या स्मृतिदिनानिमित्त सर्वधर्म मित्र मंडळ तथा स्व. गंगाबाई रामदास सवाई नेत्रदान-देहदान जनजागृती समितीच्या वतीने उपजिल्हा रुग्णालय, कारंजा लाड येथील शवविच्छेदन गृह परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा सामूहिक संकल्प करण्यात आला.

१६ वर्षांपूर्वी नेत्रदानातून समाजाला दृष्टीचा संदेश देणाऱ्या गंगाबाई सवाई यांच्या स्मृतींना यंदा वृक्षारोपणातून पर्यावरणाचा श्वास देण्यात आला. त्यांच्या सामाजिक बांधिलकीचा वारसा पुढे नेत समाजसेवा ही पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी चळवळ बनावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.

वृक्ष लावण्यापेक्षा वृक्ष जगविणे महत्त्वाचे

बदलते हवामान, वाढते तापमान, पर्यावरणाचा ऱ्हास आणि दिवसेंदिवस कमी होत चाललेली हिरवाई लक्षात घेता केवळ वृक्षारोपण करून थांबणे पुरेसे नाही. लावलेल्या प्रत्येक रोपट्याचे संगोपन करून त्याचे रूपांतर मोठ्या वृक्षात करणे हीच खरी पर्यावरणसेवा आहे, असा संदेश यावेळी देण्यात आला.

वृक्षांच्या संगोपनासाठी आवश्यक कुदळ, फावडे तसेच इतर साहित्य रुग्णालयाला सदिच्छा भेट देण्यात आले. रुग्णालय परिसर अधिक स्वच्छ, हिरवागार आणि पर्यावरणपूरक करण्यासाठी भविष्यातही सातत्याने उपक्रम राबविण्याचा संकल्प करण्यात आला.

# वन्यजीव सप्ताहानिमित्त साळुंकाबाई राऊत महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धा



■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

तालुक्यातील वनोजा येथिल ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्था, वनोजा संचालित श्रीमती साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालय, वनोजा येथे राष्ट्रीय सेवा योजना (NSS), राष्ट्रीय छात्र सेना (NCC) आणि काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्य, वनविभाग अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने वन्यजीव सप्ताहानिमित्त दि. ३ ऑक्टोबर रोजी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला वनरक्षक अमोल पोटे व ज्ञानेश्वर सुरणे यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. ममता पाथ्रीकर होत्या. कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांनी 'मानव व वन्यजीव संघर्ष' या विषयावर आपले विचार मांडले. मानवाने विकास साधताना पर्यावरण आणि वन्यजीव संवर्धनाचा समतोल राखणे गरजेचे आहे. विकास आवश्यक असला, तरी वन्यजीव आणि पर्यावरणाचेही तितकेच महत्त्व आहे, हा संदेश विद्यार्थ्यांनी आपल्या प्रभावी वक्तृत्वातून दिला.

# मानव आणि जंगलाचे नाते जपण्याचा संदेश

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

### काळाकामठा येथे वन्यजीव सप्ताहानिमित्त निबंध स्पर्धा; विद्यार्थ्यांना वनसंवर्धनाचे महत्त्व पटवून दिले



वन्यजीव सप्ताहानिमित्त मालेगाव वनपरिक्षेत्रांतर्गत मेडशी वनवर्तुळाच्या वतीने काळाकामठा येथील स्व. सुशीलाबाई देशमुख माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात ३ ऑक्टोबर रोजी 'मानव आणि जंगल' या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत जंगल आणि मानव यांच्यातील परस्पर संबंध, वनसंवर्धनाची गरज तसेच पर्यावरण रक्षणाबाबत आपले विचार मांडले.

यावेळी मालेगाव वनपरिक्षेत्र अधिकारी सतीश काळे, क्षेत्र अधिकारी आर. यू. राठोड, एस. जी. वानखडे, आर. आर. राठोड, एस. जी. पोपलवर, गणेश जामकर यांच्यासह वनविभागातील कर्मचारी, आत्माराम पवार, विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

कार्यक्रमात एस. जी. वानखडे यांनी 'मानव आणि जंगल' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. जंगल हे केवळ वन्यजीवांचे अधिवास नसून मानवाच्या जीवनासाठीही अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी जंगलांचे संवर्धन करणे आवश्यक असून, प्रत्येकाने आपल्या जीवनात वृक्ष व वनसंवर्धनाला महत्त्व दिले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

वन्यजीव सप्ताहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वन्यजीव, जंगल आणि पर्यावरणाच्या संरक्षणाबाबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

# नदी जोड प्रकल्पाबाबत खासदार वडकुते यांच्याशी चर्चा



■ प्रतिनिधी | वाशिम ■

वैनगंगा पैनगंगा नदी जोड प्रकल्पामध्ये वाशिम जिल्ह्याच्या संपूर्ण तालुक्याचा समावेश व्हावा याकरिता सामाजिक कार्यकर्ते तसेच वैनगंगा पैनगंगा नदीजोड प्रकल्प संघर्ष समितीचे अध्यक्ष हरीश सारडा यांनीराज्यसभा खासदार रामाराव वडकुते सदर प्रकल्पाबाबत व

काही राजकीय विषय आणि सामजिक विषयावर चर्चा केली. सामाजिक कार्यकर्ता हरीश सारडा यांच्या निवासस्थानी खासदार वडकुते यांचे ३० सप्टेंबर रोजी आगमन झाले त्याप्रसंगी त्यांच्याशी विविध विषयावर चर्चा करण्यात आली.ष्नदीजोड़ प्रकल्पावर चर्चा झाली त्यानी मदत साठी आश्वस्त केले.

लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट होन्याची शक्यता असल्याची माहिती हरीश सारडा यांनी दिली आहे. सदर चर्चेसोबत कंत्राटदार संघटनेचे अध्यक्ष राजुभाऊ अग्रवाल, विजुभाऊ इंगोले,अजय इंगोले,आनंद खेरड़े, बालासाहेब राउत होते . अत्यंत घरगुती वातावरणात विविध विषयांतर चर्चा झाली.

# 'वावर' या चित्रपटाचे ऑडिशन यशस्वीरित्या संपन्न

■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्थानिक कलाकारांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी आणि आगामी चित्रपट ' वावर ' या प्रकल्पासाठी आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय ऑडिशनला नवोदित कलाकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.युनिव्हर्सल मीडिया ग्रुप तर्फे या ऑडिशनचे आयोजन रविवार दि . २७ सप्टेंबर रोजी श्रीमती मालतीबाई सरनाईक विद्यालय व इंग्लिश स्कूल बस स्टँड समोर वाशिम येथे आयोजित करण्यात आले होते.या ऑडिशनसाठी वाशिम , अकोला ,अमरावती, पुसद ,यवतमाळ, नागपूर,छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर मुंबई ,पुणे तसेच महाराष्ट्रातील विविध भागातून एक हजार पेक्षा जास्त नवोदित कलाकारांनी हजेरी लावली होती. यामध्ये बालकलाकारांपासून ते ज्येष्ठ कलाकारांपर्यंत सर्वांचा समावेश होता.चित्रपटाचे दिग्दर्शक प्रफुल

उकंडराव इंगोले ,निर्माते बंटीभाऊ



मर्डे,सुनील विठ्ठल जाधव , सहनिर्माते निलेश हारदे,रवी इंगोले, उपस्थित होते तर प्रमुख उपस्थिती शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अरुणराव सरनाईक यांची उपस्थिती लाभली तर विशेष उपस्थिती सिने - अभिनेते राधाकृष्ण कराळे, अभिनेत्री ॲड पूजा देडे व मिना इंगळे,शेख अय्याज शेख मोहसीन मनसे अध्यक्ष दत्तारावजी देशमुख तर सहायक दिग्दर्शक बालाजी ऐवळे प्रोडक्शन मॅनेजर अतुल उमाळे , प्रवीण चव्हाण,दीपक कोठारी, दर्शना राठोड विजयकुमार होळकर (सिनेमॅटोग्राफर व एडिटर) पंचरत्ना पन्हाड यांनी उपस्थित राहून कलाकारांच्या अभिनयाचे, संवादाचे आणि सादरीकरणाचे परीक्षण केले.चित्रपटाच्या कार्यकारी निर्मात्या श्रद्धा गजभार यांनी सांगितले की, 'या भागातील कलाकारांमध्ये प्रचंड टॅलेंट आहे आणि त्यांना योग्य व्यासपीठ मिळवून देणे हाच या ऑडिशनचा मुख्य उद्देश होता. लवकरच निवडक कलाकारांची अंतिम यादी जाहीर केली जाईल.' हे ऑडिशन यशस्वी करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजक हिराकांत अंभोरे, अरविंद उचित , विशाल बुलबुले,शेख मोबीन,संजय खंडारे, ?ड सेवेंद्र सोनोने यांनी विशेष परिश्रम घेतले.तर सूत्रसंचालन अरविंद उचित यांनी केले.तसेच सृष्टी पवन काळे या बाल कलाकारांच्या उत्कृष्ट अभिनयाबद्दल निर्माते व दिग्दर्शकांनी तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कॅमेरामॅन विलास गायकवाड,नेहा शुंगारे, रंजित गायकवाड व बरेच रिलस्टार ,युट्युबर यांची उपस्थिती होती.एकंदरीत कार्यक्रम उत्साहात पार पडला.

# अजितदादांचे नाव वापरू नका; स्वतःच्या कर्तृत्वावर लढा- सुनेत्रा पवार



**बारामती :** हजारो शेतकऱ्यांच्या संसाराचा आधार असलेल्या श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुका ला राजकीय रंग चढत असताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी विरोधकांना थेट इशारा दिला आहे. 'ज्यांना स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास आहे, त्यांनी अजितदादांचे नाव वापरणे बंद करावे. दादांच्या कुटुंबावर नाराज होऊन बाहेर पडले असतील, तर स्वतःच्या नावावर, कामावर आणि कर्तृत्वावर निवडणूक लढवावी', असे त्यांनी स्पष्ट केले. सोमेश्वर विकासपुरुष अजितदादा पॅनलचा प्रचार शुभारंभ प्रसंगी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार बोलत होत्या.

सुनेत्रा पवार पुढे म्हणाल्या, 'सोमेश्वर कारखाना हा हजारो शेतकरी सभासदांच्या संसाराचा आधार आहे. त्यामुळे या निवडणुकीत राजकारण करण्याची गरज नव्हती. मात्र, सध्या अनेक गोष्टी ऐकायला येत आहेत', असे सांगत सुनेत्रा पवार यांनी निवडणुकीच्या वातावरणावर भाष्य केले.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाचा आधार घेत राजकारण करत निवडणुकीत उतरणाऱ्या घटकांना लक्ष्य करताना सुनेत्रा पवार यांनी स्वतःच्या कामाच्या आधारावर जनतेसमोर जाण्याचे आवाहन केले. स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास असेल, तर दादांचे नाव वापरण्याची गरज नाही. स्वतःच्या नावावर, कामावर आणि कर्तृत्वावर निवडणूक लढवावी, असा त्यांचा स्पष्ट सूर व्यक्त केला. कारखान्याच्या आगामी नेतृत्वाबाबतही सुनेत्रा पवार यांनी सूचक भाष्य केले. सर्वांना विश्वासात घेऊन आगामी चेअरमन हा नाव गाजवणारा नसेल, तर भाव गाजवणारा असेल,' असे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्रातून मान्सूनचा परतीचा प्रवास सुरु, कोणत्या जिल्ह्यात किती टक्के पावसाची तूट? चिंता वाढवणारी आकडे वारी'सोमेश्वर साखर कारखाना हा केवळ एक कारखाना नाही, तर हजारो शेतकरी सभासदांचा विश्वास आहे. अनेक पिढ्यांपासून शेतकऱ्यांनी ही संस्था जपली आहे. बळीराजा आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी काम करणारी ही संस्था आहे,' असे सुनेत्रा पवार यांनी सांगितले.

अजित पवारांच्या कार्याची आठवण करून देताना त्या म्हणाल्या, 'दादांच्या जाण्याने इथला बांध, न बांध, शेती आणि परिसर सुना झाला आहे. इथल्या प्रत्येक गोष्टीत दादांचा श्वास होता. दादा स्वतः शेतकरी असल्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी आणि त्यांच्यासाठी काय केले पाहिजे, याची त्यांना जाणीव होती.'

एकनाथ शिंदेंच्या मंगेश चिवटे यांना सूचना, पुणे शिक्षक मतदारसंघासाठी अर्ज भरणार'१९९२ मध्ये अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत दादांनी कारखान्याची जबाबदारी स्वीकारली. सर्व सहकाऱ्यांना सोबत घेत त्यांनी कारखाना उभा केला.

## त्या पती-पत्नीवर विश्वास ठेवला अन् पुण्यातील व्यावसायिकासोबत नको ते घडले

**पुणे :** कमी वेळात मोठा परतावा आणि भरपूर पैसे कमवण्याचे आमिष कोणी दाखवले, तर त्यावर विश्वास ठेवण्याआधी खात्री करून घेणे अतिशय गरजेचे आहे.

कारण, मोठ्या परताव्याचे आमिष दाखवून फसणूक केल्याच्या अनेक घटना समोर येत आहेत. आता अशीच आणखी एक घटना पुण्यातून समोर आली आहे. यात एका व्यावसायिकाची चक्क पावणेदोन कोटी रूपयांची मोठी फसवणूक करण्यात आली. पोलिसांनी याप्रकरणी प्रवीण दत्तू शेळके (वय ४०, रा. गणेश व्हिला सोसायटी, धायरी) याला अटक केली आहे.

**पत्नीनेही दिली साथ**

या कामात प्रवीण एकटा नव्हता. तर त्याची पत्नी नीता प्रवीण शेळके आणि रिचर्ड पात्रिदगे यांनीही त्याची साथ दिली. या दोघांविरूद्धही गुन्हा




दाखल करण्यात आला आहे. तुषार तेजराम घडाळे (वय ४६, रा. सेलेस्टियल सिटी, रावेत) यांनी याप्रकरणी पोलिसांत फिर्याद दिली.

पुण्यात उच्चशिक्षित तरुणी 'एड्स'ग्रस्त तरुणाच्या प्रेमात पडली; कॉलेजला गेली अन् गायबच झाली, सगळीकडे शोधले, शेवटी तो मेल पाहून घरचे हादरले.

### टकमक टोकावरून तरुणाची दरीत उडी

**रायगड:** किल्ले रायगडावरील अत्यंत धोकादायक मानल्या जाणाऱ्या टकमक टोकावरून उडी घेऊन जीवन संपवलेल्या युवकाचा मृतदेह शोधण्यात अखेर बचाव पथकाला यश आलं आहे. टकमक टोकाखालील निजामपूरच्या बाजूला असलेल्या सुमारे ८०० फूट खोल दरीत हा मृतदेह आढळून आला आहे. प्रतिकूल वातावरण आणि भौगोलिक आव्हानांचा सामना करत शोध पथकाने ही अवघड मोहीम फत्ते केली.

## ज्ञानेश कुमार यांच्या केरळमधील जुन्या प्रकरणाची 'व्हिजिलन्स' चौकशी होणार

**नवी दिल्ली -** भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याशी संबंधित तब्बल दोन दशके जुन्या एका संवेदनशील प्रकरणात केरळ सरकारने अत्यंत मोठे पाऊल उचलले आहे. केरळचे गृहमंत्री रमेश चेन्निथला यांनी २००६ मधील एका मलेशियन सिव्हिल इंजिनिअरच्या कथित आत्महत्या प्रकरणात थेट लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (व्हिजिलन्स) सखोल चौकशीचे अधिकृत आदेश जारी केले आहेत. या जुन्या प्रकरणात तपास यंत्रणेवर बाहेरून राजकीय अथवा प्रशासकीय दबाव टाकून मूळ तपास दडपल्याचे गंभीर आरोप समोर आल्यानंतर सरकारने ही फेरचौकशी सुरू केली आहे.

हे संपूर्ण प्रकरण २००६ मधील आहे, जेव्हा ज्ञानेश कुमार हे केरळ सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव म्हणून कार्यरत होते.'केरळ स्टेट



ट्रान्सपोर्ट प्रोजेक्ट' अंतर्गत एमसी रोडच्या रुंदीकरण आणि आधुनिकीकरणाचे काम सुरू होते. या प्रकल्पाचे कंत्राट कन्सोर्टियमकडे होते. या कन्सोर्टियमशी संबंधित मलेशियन सिव्हिल इंजिनिअर ली सी बीन यांनी त्या वेळी आत्महत्या केली होती. त्यावेळी समोर आलेल्या कथित सुसाईड नोटमध्ये पीडब्ल्यूडी सचिव म्हणून ज्ञानेश कुमार यांच्या नावाचा उल्लेख असल्याचा दावा करण्यात आला होता, ज्यामुळे तत्कालीन प्रशासकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली होती.

या जुन्या प्रकरणाची फाईल पुन्हा उघडण्यामागे तपासातील त्रुटी आणि हस्तक्षेपाचे आरोप कारणीभूत ठरले आहेत. मूळ तपासादरम्यान निष्पक्ष कारवाई होऊ दिली नाही आणि उच्च स्तरावरून तपास यंत्रणेवर बाहेरून दबाव आणून संपूर्ण चौकशी अर्ध्यातच थांबवण्यात आली, असा नवा आरोप करण्यात आला आहे. गृहमंत्री रमेश चेन्निथला यांनी व्हिजिलन्स संचालकांना या प्रकरणाच्या मुळाशी जाऊन तपास करण्याचे आदेश दिले आहेत. तत्कालीन चौकशीत कोणाचा हस्तक्षेप होता का, तपासाची दिशा जाणीवपूर्वक बदलण्यात आली होती का, आणि कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेकडून अनुचित दबाव आणला गेला होता का, याची सूक्ष्म तपासणी आता लाचलुचपत विभाग करणार आहे.

या चौकशीत जे काही नवे पुरावे आणि सत्य समोर येईल,

## 'सीजेपी' संस्थापक अभिजित दीपके यांच्यासह ५०० जणांवर कारवाई

**मुंबई:** 'सीजेपी' ने २ ऑक्टोबर (गांधी जयंती) रोजी आयोजित केलेले विनापरवाना 'जेल भरो' आंदोलन 'सीजेपी' च्या सर्व वरिष्ठ पदाधिकाऱ्यांना चांगलेच भोवले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या २०१३ मधील आदेशाचे उल्लंघन, तसेच पोलिसांचा अधिकृत मनाई हुकूम डावलून बेकायदेशीरपणे जमाव जमवणे, सभा घेणे आणि निदर्शने केल्याप्रकरणी शिवाजी पार्क पोलिसांनी सीजेपीचे संस्थापक अभिजित दीपके, मुख्य राष्ट्रीय प्रवक्ते सौरव दास, आयोजक अजिंक्य शिंदे आणि ४०० ते ५०० अनोळखी कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल केले आहेत. 'कॉक्रोच जनता पार्टी'च्या आवाहनानुसार उत्तर प्रदेश, बिहार, दिल्ली, राजस्थान आणि महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून कार्यकर्ते आणि नागरिक सकाळी ११ वाजल्यापासूनच दादर येथील शिवाजी पार्क परिसरात जमू लागले होते. दुपारी ३ ते रात्री ८ या वेळेत मैदानावर भाषण सत्र आणि निदर्शने पार पडली. पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते सौरव दास, सह-संयोजक आशुतोष रांका आणि संस्थापक अभिजित दीपके यांनी व्यासपीठावरून उपस्थितांना संबोधित करत निवडणूक आयोगाच्या कारभारावर जोरदार टीका केली.तथापि, मुंबई उच्च न्यायालयाच्या जनहित याचिकेवरील २०१३ च्या आदेशानुसार शिवाजी पार्क मैदानाला 'क्रीडांगण' आणि 'शांतता क्षेत्र' म्हणून घोषित करण्यात आले आहे.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडक्या भुजबळांसाठी लंडनहून आणली अनोखी भेटवस्तू

**मुंबईः** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अन्न व नागरी पुरवठामंत्री तथा राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांच्यातील मैत्री आणि राजकीय सबंधाचा प्रवास नेहमीच रंजक आणि आदरयुक्त राहिलेला आहे. आरक्षणाच्या मुद्यावरुन सुरु झालेल्या मराठा आंदोलनाविरोधात वेळोवेळी आक्रमक भूमिका घेणाऱ्या भुजबळ यांना मुख्यमंत्री असतानाही शिंदे यांनी भुजबळ साहेब आमचे ज्येष्ठ सहकारी आहेत असे सांगत संयमाची भूमिका घेतल्याचे चित्र अनेकदा दिसून आले आहे. याच आपल्या लाडक्या सहकारी- मित्रासाठी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी थेट लंडनहून आणलेल्या अनोख्या



भेटीची सध्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा रंगलेली आहे.

भुजबळ आणि शिंदे यांची राजकीय कारकीर्द शिवसेनेतच घडली. भुजबळ हे शिंदे यांच्यासाठी ज्येष्ठ नेते असले तरी १९८६ मध्ये बेळगावमधील मराठी भाषिकांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात शिवसेनेने केलेल्या तीव्र आंदोलनात हे दोन्ही नेते सहभागी झाले होते. त्यावेळी भुजबळ यांनी कर्नाटक पोलिसांना चकवा देण्यासाठी वेशांतर करून बेळगावात प्रवेश केला होता आणि आंदोलन यशस्वी केले होते. भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात एकनाथ शिंदे यांच्यासह जवळपास १०० शिवसैनिक महाराष्ट्रातून बेळगावला गेले होते. तिथे झालेल्या लाठीमारात ते जखमी झाले आणि त्यानंतर त्यांना तब्बल ४० दिवस बेल्लारी (कर्नाटक) येथील मध्यवर्ती कारागृहात काढावे लागले होते. मात्र भुजबळ यांनी शिवसेना सोडल्यानंतर शिंदे आणि भुजबळ यांच्यात कटुता निर्माण झाली होती. कालांतराने महाविकास आघाडी सरकारच्या काळात शिंदे याणि भुजबळ पुन्हा एकदा मांडीला मांडी लावून एकाच सरकारमध्ये काम करताना दिसले.

## संक्षिप्त

### अंधाराचा फायदा घेत बिबट्याची चिमुकल्यावर झेप

**सातारा :** बिबट्याच्या हल्ल्यात दोन वर्षांच्या चिमुकल्याचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना सातारा तालुक्यातील न्हाळेवाडी (पुनर्वसित) गावात घडली आहे. जय संदीप खंडागळे (२ वर्षे), असे मृत चिमुकल्याचे नाव आहे. निष्पाप चिमुकल्याच्या दुर्दैवी मृत्यूने सातारा तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे. तसेच



वन खात्याच्या विरोधात संताप व्यक्त होत आहे. सातारा तालुक्यातील पुनर्वसित न्हाळेवाडी गावातील बौद्ध वस्तीच्या पाठीमागील ओढ्याच्या परिसरात शनिवारी रात्री सायंकाळी साडेसातच्या सुमारास ही घटना घडली. गावातील वीज पुरवठा खंडित झाला होता. यावेळी दबा धरून बसलेल्या बिबट्याने अंधाराचा फायदा घेत अवघ्या २ वर्षांच्या जयवर झेप घेतली आणि त्याला शेताच्या अन् ओढ्याच्या दिशेने ओढत नेले. मुलाला बिबट्याने पळवून नेल्याचे समजताच गावातील तरुणांनी शोधाशोध सुरू केली. बौद्ध वस्तीच्या पाठीमागील ओढ्यामध्ये बिबट्या मुलाला घेऊन बसलेला दिसताच तरुणांनी मोठा गोंधळ घालून बिबट्याला पळवून लावले. मात्र चिमुरड्याचा जीव वाचू शकला नाही.

### शहीद जवानाचे पार्थिव घेऊन जाणाऱ्या रुग्णवाहिकेचा अपघात

**चंदीगड -** चंदीगडहून शहीद सुभेदार मेजर सत्यवान यांचे पार्थिव मूळ गावी देवरिया येथे घेऊन जाणाऱ्या रुग्णवाहिकेचा पूर्वांचल एक्स्प्रेसवेवर भीषण अपघात झाला आहे. हलियापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत किलोमीटर ७९.६ जवळ एका अज्ञात वाहनाने रुग्णवाहिकेला जोरदार धडक दिली. या हृदयद्रावक अपघातात शहीद जवानाचा मुलगा, चालक आणि दोन नातेवाइकांसह



चार जणांचा मृत्यू झाला आहे. शहीद जवानाच्या अंत्यदर्शनापूर्वीच कुटुंबातील मुलासह अन्य सदस्यांवर काळाने घाला घातल्याने संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी सकाळी सुमारे ८:१५ वाजता रुग्णवाहिका शहीद सुभेदार मेजर सत्यवान (रा. गैला दुधिला, ता. रुद्रपूर, जि. देवरिया) यांचे पार्थिव घेऊन चंदीगडहून गावाकडे निघाली होती. पूर्वांचल एक्स्प्रेसवेवरील किमी ७९.६ जवळ एका भरधाव अज्ञात वाहनाने रुग्णवाहिकेला जोरदार धडक दिली. या धडकेत शहिदांचा मुलगा गौरव सिंह आणि रुग्णवाहिका चालक जसपाल यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

### 'त्यांनी माझं घर जाळलं, मी फूलनदेवी बनून बदला घेईन'

**उत्तर प्रदेश -** जळत असलेल्या झोपडीसमोर उभी राहून रडत असलेल्या आणि त्यांनी माझं घर जाळलं आता मी फूलन देवी बनून याचा बदला घेईन, अशी प्रतिज्ञा करत असलेल्या एका तरुणीचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत असल्याने खळबळ उडाली आहे. हा व्हिडीओ उत्तर प्रदेशमधील बदायूं येथील



असल्याची माहिती समोर आली आहे. याबाबत मिळालेल्या अधिक माहितीनुसार या व्हिडीओत दिसत असलेल्या तरुणीचं नाव शिवानी कश्यप आहे. पोलीस आणि लेखापालांच्या एका टिमने आपल्या घरता जबरदस्तीने घुसून आपल्या झोपडीला आग लावली, असा आरोप तिने केला आहे. मात्र पोलिसांनी हे आरोप फेटाळून लावले आहेत. आपण झोपडीमध्ये आग लावलेली नाही. या तरुणीने स्वत:च झोपडीला आग लावली आणि नंतर व्हिडीओमधून ती चुकीच्या पद्धतीने मांडली, असा दावा पोलिसांनी केला आहे.

### चंद्रशेखर बावनकुळेंच्या दुष्काळ दौऱ्यात चोरट्यांचा सुळसुळाट

**नागपूर -** महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळ सध्या दुष्काळ दौऱ्यावर आहेत. शेतकऱ्याला कसलाही त्रास देऊ नका अशा सूचना करताना ते दिसतायत. पण त्यांच्याच दौऱ्यात शुक्रवारी चोरांचा सुळसुळाट पाहायला मिळाला. काल मंत्री बावनकुळे भोकरदन तालुक्यातील दगडवाडी गावात दुष्काळ पाहणी करण्यासाठी आले होते. दौरा आटोपून ते निघाले, इकडे शेतकरी ही आपापल्या घरी परतू



लागले. तेवढ्यात एका टोळीने शेतकऱ्याला चाकूचा धाक दाखवत १२ हजार रुपये काढून घेतल्याचा प्रकार समोर आलेला. पोलिसांच्या तपासात त्यांच्या हाती लूटमार आणि चोरी करणारी एक आंतरजिल्हा टोळीच लागली आहे. मराठा आरक्षण आंदोलन मनोज जरांगे यांच्या दौऱ्यातही या टोळीने लूटमार केल्याची माहिती पोलिसांनी दिली. दरम्यान, पोलिसांनी या चोरट्याकडून एक कार आणि शेतकऱ्याकडून लुटलेले १२ हजार रुपये जप्त केले आहेत.

## बाईकवर आले, रस्त्यातच गाठले, प्रसिद्ध सोशल मीडिया इन्फ्ल्युएन्सरला भरदिवसा संपवले

**अमृतसर :** प्रसिद्ध सोशल मीडिया इन्फ्लुएन्सरची भर रस्त्यात गोळ्या घालून हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. 'मॅड संधू' असे हत्या झालेल्या इन्फ्ल्यएन्सरचे नाव आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. या हत्याकांडाची जबाबदारी कुख्यात गँगस्टर गोल्डी ढिल्लो आणि जग्गा तरनतारन यांनी घेतली असल्याची माहिती समोर आली आहे. त्यांनी सोशल मीडिया पोस्टद्वारे हत्येची जबाबदारी स्वीकारली आहे.

पोलीस अधिकारी एडीसीपी वेनिला यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना काल शनिवारी संध्याकाळी ६



वाजण्याच्या सुमारास पंजाबच्या अमृतसर येथील लोहारका रोडवर घडली. दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात हल्लेखोरांनी संधू यांच्यावर अंदाधुंद गोळीबार केला. गोळीबारानंतर हल्लेखोर घटनास्थळावरून पसार झाले. ही घटना घडताच रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या आणि गंभीर जखमी झालेल्या मॅड संधू याला तत्काळ नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं, परंतु डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केलं. ही हत्या नेमकी कोणत्या कारणातून केली गेली? हे अद्याप समोर आलेलं नाहीय. पोलिसांची अनेक पथकं या प्रकरणाचा तपास करत असून आरोपींसंदर्भात काही महत्त्वाचा सुगावा हाती लागल्याचं अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

पंजाब पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, हत्येची जबाबदारी घेणारा मुख्य आरोपी गोल्डी ढिल्लो हा सध्या ब्रिटनमध्ये लपून बसल्याची माहिती आहे. त्याचे पूर्ण नाव गुरप्रीत सिंग उर्फ गोल्डी ढिल्लो असून तो कुख्यात गँगस्टर गोल्डी ब्रारचा जवळचा साथीदार मानला जातो. गोल्डी ढिल्लोवर पंजाब, चंदीगड आणि कॅनडामधील व्यावसायिकांना लक्ष्य करून खंडणी रॅकेट चालवणे, हत्या, तस्करी आणि गोळीबाराचे गंभीर गुन्हे नोंद आहेत.

या घटनेनंतर राज्यातील राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते डॉ. राजकुमार वेरका यांनी या हत्येवर तीव्र संताप व्यक्त करत आम आदमी पार्टी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. अमृतसर मध्ये भरदिवसा गोळीबार होत असून सामान्य नागरिक प्राण गमावत आहेत. संपूर्ण पंजाबमध्ये भीती आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले असल्याचे सांगत त्यांनी कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

## मुंबईतून पावसाची वेळेआधीच माघार, राज्यातून मान्सूनच्या परतीला सुरुवात

**मुंबई :** बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे मान्सूनचा माघारीचा प्रवास काही काळ रेंगाळला. मात्र त्यानंतर मान्सूनने वेगाने माघार घेतली असून शनिवारी महाराष्ट्रातूनही परतीचा प्रवास सुरू झाला.

मुंबईतूनही मान्सूनने शनिवारी माघार घेतली. मान्सूनची परतीची रेषा हर्णै, बारामती, परभणीपर्यंत पोहोचली आहे.

मान्सूनचा माघारीचा प्रवास यंदा वेगाने होईल, असा अंदाज वर्तवला जात होता. साधारणपणे पाच ऑक्टोबरपर्यंत मान्सूनचा माघारीचा प्रवास सुरू होतो. ऑक्टोबरमध्येही काही वेळा मुंबईकर पाऊस अनुभवतात.



मात्र यंदाची स्थिती या सरासरी चित्रापेक्षा वेगळी असल्याचे दिसत आहे.

यंदा २१ सप्टेंबरपर्यंत राजस्थान, उत्तर प्रदेशपर्यंत मान्सूनच्या परतीची रेषा खाली होती. त्यानंतर हा प्रवास दोन ऑक्टोबरपर्यंत रखडला. मात्र त्यानंतर तीन ऑक्टोबरला उत्तर भारत, गुजरात, मध्य प्रदेशाच्या सगळ्या भागातून, बिहार, झारखंड, छत्तीसगड असा मोठा प्रवास करत मान्सूनची परतीची रेषा महाराष्ट्रापर्यंत खाली आली.

महाराष्ट्रामध्येही मान्सूनने मोठ्या पट्ट्यातून माघार घेतली असून पुढील दोन ते तीन दिवसांत मराठवाडा, विदर्भाचा बहुतांश भाग आणि मध्य महाराष्ट्रातील आणखी काही भागांतून मान्सून माघार घेण्याची शक्यता भारतीय हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) व्यक्त केली आहे. मुंबईमध्ये प्रत्यावर्ती चक्रीय वातस्थिती निर्माण झाल्याने उष्णतेची तीव्रता वाढली आहे. तसेच शुक्रवारपासून हळूहळू आर्द्रतेतही घट झाल्याचे मुंबईकरांना जाणवत आहे.

गुरुवारपर्यंत उष्णता आणि आर्द्रतेमुळे उकाड्याचे, घामाचे प्रमाण अधिक जाणवत होते. तर शुक्रवारी आर्द्रता कमी जाणवली. शनिवारीही कोरड्या झळांचे प्रमाण अधिक जाणवल्याचे मुंबईकरांनी सांगितले. दक्षिण कोकणात मात्र पुढील काही दिवस उष्ण व दमट वातावरण राहण्याचा अंदाज आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३०८ ■ सोमवार, ५ ऑक्टोबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## समृद्धीवरील सात मृत्यूंचा हिशेब द्या - खा.अमर काळे

### थातूरमातूर चौकशी करून निष्पाप कर्मचाऱ्यांचा बळी देऊ नका

#### ‘दबाव यंत्रणा’ चालविणाऱ्यांना शोधा

**वर्धा जनमाध्यम :** समृद्धी महामार्गावरील भीषण अपघातात सात निष्पापांचा बळी गेल्यानंतर आता केवळ थातूरमातूर चौकशी करून प्रकरण मिटवण्याचा प्रयत्न होता कामा नये. वाहनाला समृद्धी महामार्गावर प्रवेश मिळाला कसा, कुणाच्या निर्णयामुळे मिळाला आणि त्यासाठी कुणाचा दबाव होता, याच्या मुळाशी जाऊन तपास झाला पाहिजे, अशी आक्रमक भूमिका खासदार अमर काळे यांनी घेतली.

सावंगी रुग्णालयात जखमींची भेट घेतल्यानंतर काळे यांनी या दुर्घटनेच्या तपासाची दिशा स्पष्ट केली. चौकशीच्या नावाखाली एखाद्या निष्पाप कर्मचाऱ्याला जबाबदार धरून त्याला पदावरून हटविले आणि ज्यांनी दबाव टाकून वाहनाला समृद्धीवर जाण्यास भाग पाडले ते मात्र मोकाट राहिले, तर असा तपास आम्हाला मान्य नाही, असा थेट इशारा त्यांनी दिला.



नेमकी चूक कुठे झाली, कुणी केली आणि कोणाच्या निर्णयामुळे नियमबाह्य पद्धतीने वाहन समृद्धी महामार्गावर आले, याचा सखोल तपास पोलिसांनी केला पाहिजे. केवळ खालच्या स्तरावरील कर्मचाऱ्यावर कारवाई करून तपासाची इतिश्री करणे म्हणजे खऱ्या सूत्रधारांना अभय देण्यासारखे ठरेल, असे काळे यांनी स्पष्ट केले.

‘दबाव टाकणारी व्यक्ती कोण होती, हा तपासाचा केंद्रबिंदू असला पाहिजे. त्या व्यक्तीचा शोध लागेपर्यंत मी गप्प बसणार नाही,’ अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली.

नागरिकांनी उपस्थित केलेले प्रश्न आणि केलेल्या मागण्या योग्य की अयोग्य, याची प्रशासनाने तातडीने पडताळणी करून संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधला पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

सात जणांच्या मृत्यूची जबाबदारी केवळ एका कर्मचाऱ्यावर ढकलून भागणार नाही. समृद्धीवर प्रवेश देण्यापासून अपघातापर्यंतची संपूर्ण साखळी तपासा आणि पडद्यामागील दबाव कुणाचा होता, ते बाहेर काढा, अशी मागणी काळे यांनी केली.

अंत्यविधीच्या वेळीही याच प्रश्नांची चर्चा होत होती. सात कुटुंबांवर कोसळलेल्या या संकटाची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी चौकशीचा देखावा नको, तर सत्य बाहेर आले पाहिजे आणि जबाबदार व्यक्तींवर कारवाई झाली पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

## पाऊस गायब, संकट दारात

## वर्धा जिल्ह्यावर जलसंकटाची टांगती तलवार; चार महिन्यांत ३६.९२ टक्के पावसाची तूट

### मोठे-मध्यम जलाशयही तहानलेले, पिकांनी टाकल्या माना



**वर्धा जनमाध्यम :** वरुणराजाने यंदा वर्धा जिल्ह्याकडे पाठ फिरवल्याने पावसाची तुट दिवसेंदिवस गंभीर होत आहे. जूनपासून सुरू झालेला पावसाचा लपंडाव सप्टेंबरअखेरही कायम राहिला असून पर्जन्यमानाच्या तुटीत आणखी ४.९५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. चार महिन्यांत अपेक्षित ८७४.०५ मिलिमीटर पावसाच्या तुलनेत प्रत्यक्षात केवळ ५५८.०३ मिलिमीटर पाऊस झाल्याने जिल्ह्यात सरासरीपेक्षा तब्बल ३६.९२ टक्के पाऊस कमी झाला आहे. त्यामुळे आगामी काळात पिण्याच्या पाण्यासह शेती आणि जलसाठ्यांवर मोठे संकट ओढवण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मान्सून सुरू झाल्यानंतर यंदा जिल्ह्यात दमदार पाऊस होईल आणि मोठे तसेच मध्यम जलाशय तुडुंब भरतील, अशी अपेक्षा होती. शेतकऱ्यांनाही पिकांना वेळेवर पाऊस मिळून उत्पादन समाधानकारक होईल, अशी आशा होती. मात्र, जून महिन्यातच पावसाने दगा दिला. त्यानंतर काही प्रमाणात झालेल्या पावसाच्या भरवशावर शेतकऱ्यांनी पेरणीची कामे पूर्ण केली. पुढील काळात पावसाची साथ मिळेल, अशी अपेक्षा असतानाच वरुणराजाने पुन्हा पाठ फिरवली.

जिल्ह्यात जून, जुलै आणि ऑगस्ट या तीन महिन्यांत सरासरी ७१९.०३ मिलिमीटर पाऊस अपेक्षित असतो. यंदा या कालावधीत केवळ ४९१.०२ मिलिमीटर पाऊस झाला. म्हणजेच सरासरीच्या तुलनेत केवळ ६८.०३ टक्के पाऊस नोंदविला गेला. ऑगस्टअखेर निर्माण झालेली पावसाची तुट सप्टेंबरमध्ये भरून निघेल, अशी आशा होती. मात्र, सप्टेंबरनेही जिल्ह्याची निराशाच केली. परिणामी पावसाची तुट आणखी वाढली.

सप्टेंबरअखेरची आकडेवारी पाहता जिल्ह्याची पाणीस्थिती चिंताजनक बनली आहे. मोठे आणि मध्यम जलाशय अपेक्षेप्रमाणे भरलेले नाहीत. शेतीला आवश्यक असलेल्या ओलाव्याची कमतरता जाणवत असून अनेक भागांत पिके पाण्याअभावी माना टाकत आहेत. ऑक्टोबरमध्ये पाऊस किती साथ देईल, याची शाश्वती नसल्याने पुढील काळात पिण्याचे पाणी, शेती आणि जलसाठ्यांचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे.

पावसाची ही तूट केवळ आकडेवारीपुरती मर्यादित नसून तिचा थेट परिणाम शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनावर होणार आहे. त्यामुळे उपलब्ध पाणीसाठ्याचे नियोजन आणि काटकसरीने वापर करणे आता काळाची गरज बनली आहे. जिल्हा प्रशासनानेही निर्माण होत असलेल्या पाणीस्थितीची नोंद घेतली असून आगामी काळातील संभाव्य जलसंकटाचा सामना करण्यासाठी आतापासूनच उपाययोजना करणे आवश्यक ठरणार आहे.

#### तालुकानिहाय पर्जन्यमान

- आर्वी : ६९.०६ टक्के
- कारंजा : ८२.०३ टक्के
- आष्टी : ७६.०६ टक्के
- वर्धा : ७५.०१ टक्के
- सेलू : ६३.०८ टक्के
- देवळी : ७०.०५ टक्के
- हिंगणघाट : ४७.०० टक्के
- समुद्रपूर : ६३.०३ टक्के

#### सप्टेंबरअखेरची स्थिती

८७४.०५ मिमी — जिल्ह्यात अपेक्षित सरासरी पाऊस
५५८.०३ मिमी — प्रत्यक्ष झालेला पाऊस
३६.९२ टक्के — सरासरीपेक्षा पावसाची तूट
४.९५ टक्के — सप्टेंबरमध्ये तुटीत झालेली वाढ

## शिकारीचा पाठलाग ठरला जीवघेणा; विहिरीत पडलेल्या बिबट्याला जीवनदान

### सेलगाव उमाटे शिवारातील थरारक घटना

#### वनविभाग, पोलिसांच्या संयुक्त मोहिमेला यश

**कारंजा (घा.) जनमाध्यम :** शिकारीचा पाठलाग करताना ४० फूट खोल विहिरीत पडलेल्या बिबट्याला वनविभाग आणि पोलिसांच्या संयुक्त प्रयत्नांतून सुखरूप बाहेर काढण्यात आले. सेलगाव उमाटे शिवारातील शेतकरी रघुनाथ हिंगवे यांच्या शेतात ही घटना घडली. सुमारे एक तास चाललेल्या शर्थीच्या प्रयत्नांनंतर बिबट्याला जीवनदान मिळाले.

मध्यरात्रीच्या सुमारास शिकारीचा पाठलाग करत असताना बिबट्या विहिरीत पडला. विहिरीत पाणी असल्याने तो त्यातच तग धरून होता. मात्र, ४० फूट खोल विहिरीतून स्वतःहून बाहेर पडणे त्याला शक्य नव्हते. सकाळी काही नागरिकांच्या निदर्शनास हा प्रकार आल्यानंतर त्यांनी तातडीने वनविभागाला माहिती दिली.



माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी विनोद कोहळे यांच्या मार्गदर्शनाखाली वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी, आरआरटीचे पथक तसेच कारंजा पोलिस ठाण्यातील कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. विहिरीभोवती नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. बचाव पथकाने प्रथम गर्दी हटवून परिसर सुरक्षित केला. त्यानंतर नियोजनबद्ध पद्धतीने रेस्क्यू मोहीम सुरू करण्यात आली.

सुमारे एक तासाच्या अथक प्रयत्नांनंतर बिबट्याला सुरक्षितपणे विहिरीबाहेर काढण्यात आले. त्याची तपासणी करून त्याला नैसर्गिक अधिवासात निसर्गमुक्त करण्यात आले. या मोहिमेत केकान, गडे, व्ही. एस. आंबोलकर, के. एस. कांबळे, अक्षय जाधव, अर्जुन कोरडे, कृष्ण कांबळे, प्रतीक कांबळे, सागर ठुट्टे, ए. डी. वेले, अडसळ, आयुष सातपुरे, गणेश काळे, स्वप्निल कौरती, गौरव कौरती आदींनी सहभाग घेतला.

## मेडिकल व्यवसायासोबत शेतीचा गाडा हाकणाऱ्या तरुण शेतकऱ्याची आत्महत्या

### दोन चिमुकल्यांचे पितृछत्र हरपले

**आष्टी (शहीद) जनमाध्यम :** कर्जाचा वाढता बोजा, सततची नापिकी, कपाशी पिकाला बसलेला फटका आणि शेतीसाठी अपुरा वीजपुरवठा अशा संकटांच्या कात्रीत सापडलेल्या अंतोरा येथील प्रकाश ऊर्फ पिंटू माणिकराव भोरे (४५) यांनी ४ ऑक्टोबर रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेने अंतोरा गावावर शोककळा पसरली असून त्यांच्या पश्चात पत्नी, दोन चिमुकली मुले, आई-वडील आणि मोठा भाऊ असा परिवार आहे. पिंटू हे गावात मेडिकल दुकान चालविण्यासोबतच शेतीही करीत होते. शेतीसाठी बँक तसेच खासगी कर्ज घेतले होते. मात्र, सततच्या नापिकीमुळे शेतीचे आर्थिक गणित बिघडले. यंदाही पावसाने अपेक्षित साथ न दिल्याने कपाशीचे पीक उन्हाच्या झळांनी कोमेजले. त्यातच वीजपुरवठ्यातील अडथळ्यांमुळे पिकांना पाणी देणे कठीण झाले. कर्जाची परतफेड आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह यामुळे ते आर्थिक विवंचनेत असल्याची चर्चा होती. आत्महत्येचे नेमके कारण तपासानंतर स्पष्ट होणार आहे. ४ ऑक्टोबर रोजी सकाळी शेतात जात असल्याचे सांगून पिंटू घराबाहेर पडले. दुपारपर्यंत ते परत न आल्याने कुटुंबीयांनी शोध घेतला असता करंजीच्या झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत त्यांचा मृतदेह आढळला. आष्टी पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविला. पोलिस उपनिरीक्षक भिलावे आणि कॉन्स्टेबल अतुल गोटफोडे यांनी घटनास्थळी कारवाई केली. पुढील तपास आष्टी पोलिस करीत आहेत.



## देवळीत रेतीमाफियांना पोलिसांचा दणका

### दोन ट्रॅक्टर ट्रॉलींसह १४.१४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**देवळी जनमाध्यम :** शासनाचा महसूल बुडवून विनापरवाना रेतीची वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध देवळी पोलिसांनी धडक कारवाई केली. दिघी ते देवळी मार्गावर ४ ऑक्टोबर रोजी केलेल्या दोन स्वतंत्र कारवायांमध्ये दोन ट्रॅक्टर ट्रॉली आणि रेती असा एकूण १४ लाख १४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी दोन आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



पहिल्या कारवाईत मयूर भास्करराव मोहेकर वय २७ रा. देवळी याला विनापरवाना रेती वाहतूक करताना पकडण्यात आले. त्याच्याकडून एक ब्रास काळी ओलसर रेती, महिंद्रा कंपनीचा ट्रॅक्टर आणि ट्रॉली असा ७ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी देवळी पोलिस ठाण्यात अप.क्र. ७५८/२०२६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

दुसऱ्या कारवाईत मंगेश विजयराव तायवाडे वय ३३ रा. देवळी याला विनापरवाना रेती वाहतूक करताना पकडण्यात आले. त्याच्याकडूनही एक ब्रास रेती, ट्रॅक्टर व ट्रॉली असा ७ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी अप.क्र. ७५९/२०२६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दोन्ही प्रकरणांत बीएनएस कलम ३०३(२), महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील कलम ४८ व ८ तसेच मोटार वाहन कायद्यातील संबंधित कलमांनुसार कारवाई करण्यात आली असून तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. वंदना कारखिले यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार संदीप कापडे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. पोलिस हवालदार अमोल आलवाळकर, श्याम गावनेर, पोलिस अंमलदार संतोष गिते आणि आकाश कसार यांनी कारवाईत सहभाग घेतला.

## दुर्गामातेच्या भक्तीला माणुसकीची जोड

### सराफा लाईन मंडळाचा पीडित कुटुंबांना मदतीचा हात

**वर्धा जनमाध्यम :** शेगाव येथून दुर्गामूर्ती घेऊन वर्ध्याकडे परतणाऱ्या भाविकांच्या वाहनाला समृद्धी महामार्गावर भरधाव ट्रकने धडक दिल्याने सात जणांचा मृत्यू झाला, तर १५ जण जखमी झाले. या काळजाला चटका लावणाऱ्या दुर्घटनेने जिल्ह्यात शोककळा पसरली आहे. या दुर्दैवी प्रसंगी सराफा लाईन येथील दुर्गा उत्सव मंडळाने धार्मिक उत्सवाला सामाजिक बांधिलकीची जोड देत पीडित कुटुंबीयांना सव्वा लाख रुपयांची आर्थिक मदत केली.

सिंदी मेघे येथील सोमनाथे लेआऊट भागातील दुर्गा पूजा उत्सव समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते शेगावहून दुर्गामूर्ती घेऊन वर्ध्याकडे येत असताना हा भीषण अपघात झाला. दुर्घटनेत सात जणांचा जीव गेला असून १५ जण जखमी झाले. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या घटनेनंतर पालकमंत्री, खासदार आणि जिल्हाधिकाऱ्यांनी रुग्णालयात जाऊन जखमींची भेट घेत विचारपूस केली. मात्र, या वृत्तानुसार शासकीय आर्थिक मदतीची घोषणा अद्याप झालेली नाही. अशा कठीण प्रसंगी सराफा लाईन दुर्गा उत्सव मंडळाने पुढे येत सव्वा लाख रुपयांची मदत देऊन पीडित कुटुंबांच्या दुःखात सहभाग नोंदविला.

## आश्वासन हवेतच

## एफआयआर मागे नाही, प्रवेशबंदी कायम

### हिंदी विद्यापीठ प्रशासनाविरोधात विद्यार्थ्यांचा संताप

**वर्धा जनमाध्यम :** महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्व विद्यापीठातील विद्यार्थी आंदोलनाचा तिढा कायम असून प्रशासनाच्या आश्वासनानंतरही मागण्या पूर्ण न झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये नाराजी पसरली आहे. एफआयआर मागे घेणे आणि विद्यार्थ्यांवरील विद्यापीठ परिसर व वसतिगृहातील प्रवेशबंदी उठविण्याबाबत ४ ऑक्टोबरपर्यंत कोणताही लेखी आदेश न निघाल्याने आंदोलनकर्त्यांनी प्रशासनावर आश्वासनभंगाचा आरोप केला आहे.

८ जुलैपासून सुरू असलेल्या आंदोलनाच्या समर्थनार्थ २८ सप्टेंबर रोजी ‘चलो हिंदी विश्वविद्यालय वर्धा’ अंतर्गत देशव्यापी आंदोलन करण्यात आले. आर्वी नाका ते विद्यापीठ असा मोर्चा काढून निदर्शने करण्यात आली. वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने प्रशासनाशी चर्चा केली. आंदोलनकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, चर्चेत राजेश कुमार यादव, निरंजन कुमार, रामचंद्र, राहुल कुमार, राकेश अहिरवार आणि शिवपूजन या सहा विद्यार्थ्यांविरोधातील एफआयआर मागे घेण्यास तसेच प्रवेशबंदी उठविण्यास सहमती दर्शविण्यात आली होती. मात्र, प्रत्यक्षात लेखी आदेश निघालेला नसल्याने विद्यार्थ्यांनी संताप व्यक्त केला आहे. कादर नवाज खान यांना महत्त्वाच्या प्रशासकीय पदावरून हटवून त्यांच्यावरील आरोपांची निष्पक्ष चौकशी करावी आणि विद्यापीठात कायमस्वरूपी कुलसचिव नियुक्त करावा, हीही विद्यार्थ्यांची मागणी आहे. आंदोलनादरम्यान पोलिसांनी तीन नोटिसा दिल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. ३ ऑक्टोबरला गांधी पुतळा परिसरातील आंदोलनाचा शामियानाही हटविण्यात आला. एफआयआर मागे घेईपर्यंत आणि प्रवेशबंदी उठेपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार विद्यार्थ्यांनी व्यक्त केला आहे.

## आशा-गटप्रवर्तकांच्या मागण्यांसाठी गडकरींची भेट; मोर्चा तात्पुरता स्थगित

### दहा हजार आशा-गटप्रवर्तकांचा नियोजित मोर्चा चर्चेनंतर थांबविला

**वर्धा जनमाध्यम :** आरोग्य व्यवस्थेचा तळागाळातील भार आपल्या खांद्यावर वाहणाऱ्या आशा व गटप्रवर्तकांच्या प्रलंबित मागण्यांना केंद्र सरकारच्या पातळीवर मांडण्याची ग्वाही केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी दिल्याने ६ ऑक्टोबर रोजी त्यांच्या निवासस्थानावर काढण्यात येणारा विदर्भातील दहा हजार आशा-गटप्रवर्तकांचा मोर्चा तात्पुरता स्थगित करण्यात आला.



महाराष्ट्र राज्य आशा वर्कर गटप्रवर्तक कर्मचारी संघटना सिटूच्या वतीने या मोर्चाची तयारी करण्यात आली होती. याबाबत पोलिसांची परवानगीही घेण्यात आली होती. मात्र, संघटनेच्या निवेदनाची दखल घेत गडकरी यांनी ३ ऑक्टोबर रोजी आपल्या निवासस्थानी प्रतिनिधींची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.

केंद्र सरकारने २०१८ पासून आशांच्या मानधनात वाढ केलेली नसल्याने ते दरमहा ३० हजार रुपये करावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. तसेच आशा-गटप्रवर्तकांना पीएफ, ईएसआय, विमा, ग्रॅच्युईटी व पेन्शन लागू करावी, सेवानिवृत्तीचे वय ६० वरून ६५ वर्षे करावे, गटप्रवर्तकांना पर्यवेक्षक दर्जा देऊन किमान ४० हजार रुपये वेतन द्यावे, प्रसूतीसाठी सहा महिन्यांची पगारी रजा द्यावी, अशी मागणी करण्यात आली.

केंद्र व राज्य सरकारकडून मिळणारे वेतन एकत्रित करून दर महिन्याला १० तारखेपूर्वी देण्याची मागणीही करण्यात आली. प्रत्येक मागणी केंद्र सरकार व केंद्रीय आरोग्यमंत्र्यांकडे मांडण्याची ग्वाही गडकरी यांनी दिल्याचे संघटनेने सांगितले. यानंतर सिटूने गडकरींचे आभार मानत मोर्चा तात्पुरता स्थगित केला.

## सुनीता सयाम यांचे निधन

**वर्धा जनमाध्यम :** येथील सुनीता अवचितराव सयाम (५८) यांचे रविवारी सायंकाळी ६ वाजता सावंगी मेघे येथील रुग्णालयात उपचारादरम्यान ब्रेन हॅमरेजमुळे निधन झाले.



सुनीता सयाम या आदिवासी समाजाचे नेते अवचितराव सयाम यांच्या पत्नी होत. त्यांच्या पश्चात पुत्र ॲड. चेतन सयाम, कन्या ॲड. किशोरी सेडमाके यांच्यासह मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन सोमवार, ५ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत नालवाडी, वर्धा येथील त्यांच्या राहत्या घरी घेता येणार आहे. त्यानंतर पार्थिव त्यांच्या मूळ गावी कानशिवनी, ता. जि. अकोला येथे नेण्यात येणार आहे. तेथे दुपारी ४ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## दोघांकडून चाकू जप्त; गुन्हा दाखल

**वर्धा :** शहरातील गौरक्षण वॉर्ड परिसरात दोन जणांकडून पोलिसांनी दोन चाकू जप्त केले. या कारवाईनंतर दोघांविरुद्ध रामनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुर्गेश विनोद पचेरवार (रा. हिंदनगर) याच्याकडे चाकू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार कारवाई करीत पोलिसांनी त्याच्याकडून चाकू जप्त केला. त्याचप्रमाणे शंतनू रामटेके (वय २३, रा. सिंदी मेघे) याच्याकडूनही पोलिसांनी चाकू जप्त केला. गौरक्षण वॉर्ड परिसरात करण्यात आलेल्या या कारवाईत दोघांकडील शस्त्रे पोलिसांनी ताब्यात घेतली. जप्त करण्यात आलेल्या चाकूंबाबत तसेच घटनेचा पुढील तपास पोलिस करीत आहेत.

## युवकास मारहाण; गुन्हा दाखल

**वर्धा :** क्षुल्लक कारणातून झालेल्या वादात युवकास मारहाण केल्याची घटना छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात घडली. या मारहाणीत युवक जखमी झाला. याप्रकरणी शहर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

प्रथमेश बोबडे (वय २०, रा. आष्टी, ह.मु. वर्धा) याचा अर्पित पांधरे (रा. इंदिरानगर) याच्यासोबत क्षुल्लक कारणावरून वाद झाला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. यावेळी अर्पित पांधरे याने प्रथमेश बोबडे यास मारहाण केली.

## ‘मुझ में भारत बसता है’ स्पर्धेत व्हिएतनामच्या विद्यार्थिनीचे यश

**वर्धा जनमाध्यम :** हिंदी दिनानिमित्त भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेतर्फे आयोजित ‘मुझ में भारत बसता है’ या ऑनलाइन स्पर्धेत महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठातील व्हिएतनामच्या विद्यार्थिनीने उल्लेखनीय यश मिळविले आहे. विद्यापीठात बी.ए. हिंदीचे शिक्षण घेणाऱ्या होआंग हुओंग क्विन्ह अर्थात चांदणी हिने व्हिडिओ निर्मिती विभागात पाचवा क्रमांक पटकावला.



भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेकडून ICCR शिष्यवृत्ती कार्यक्रमांतर्गत भारतातील विविध शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. लेखन आणि व्हिडिओ निर्मिती अशा दोन विभागांत ही स्पर्धा घेण्यात आली. भारतातील विविध विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

श्रीलंका, नेपाळ, उझबेकिस्तान, बांग्लादेश यांसह विविध देशांतील विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घेतला. त्यातून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुरस्कार देण्यात आले. होआंग हुओंग क्विन्ह हिच्या यशामुळे महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. हिंदी भाषा आणि भारतीय संस्कृतीविषयी आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होत असलेले आकर्षण या यशातून अधोरेखित झाले आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## लोकसेवेच्या विश्वासार्हतेची कसोटी

सुस्पष्ट नियमांच्या आधाराने कामे होत राहिल्यास व्यक्तीपेक्षा व्यवस्था महत्त्वाची ठरते. अशी 'बिनचेहऱ्या'ची, आपापल्या कामात प्रवीण असणारी आणि हेच काम आपल्याला नियमांनुसार करायचे आहे याची जाणीव असलेली नोकरशाही व्यवस्था हे प्रगत, औद्योगिक समाजांचे आद्यलक्षण- असा सिद्धान्तच मॅक्स वेबर या जर्मन समाजशास्त्रज्ञाने १९२१ पासून मांडला. हा काही नवा शोध नव्हता. सामाजिक निरीक्षणेच तो नोंदवत होता आणि अशा प्रकारच्या नोकरशाहीची गरज तोवर अन्य देशांतही जाणवत होतीच. भारतापुरते पाहायचे तर, मेकॉलेने १८३५ मध्ये इंग्रजी शिक्षणाचा पुरस्कार केला तो 'ब्रिटिश विचार पटणारी भारतीय प्रजा' घडवण्यासाठी. पण अनेक भारतीय इंग्रजी शिक्षणाचे 'वाघिणीचे दूध' पिऊन इंग्रजांवरच गुरकावू लागले, तेव्हा भारतीयांना स्वतःच्या देशावर स्वतः राज्य करू दिल्यासारखे दाखवण्याचा पहिला प्रयोग १९१९ च्या सुधारणांतून झाला. त्याही अपुऱ्याच, हे १९२० नंतर गांधीजींना मिळणाऱ्या प्रतिसादातून दिसू लागले तेव्हा, केवळ कायदेमंडळात भारतीय चेहरे असून चालणार नाही- बिनचेहऱ्याची नोकरशाहीसुद्धा भारतीयच हवी, हा धडा लंडनने घेतला आणि फेअरहॅमचे उमराव लॉर्ड ली यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमला. त्यांनी खणखणीत शिफारस केली- भारतातील नोकरशाहीत ६० टक्के भारतीय उच्चपदांवर हवेत, उरलेले ४० टक्केच ब्रिटिश. त्यातही ६० पैकी २० टक्के भारतीय हे 'प्रमोटी'- म्हणजे दीर्घ अनुभवानंतर उच्चपदी बढती मिळालेले, तर ४० टक्के सरळसेवा भरती परीक्षेद्वारे आलेले असावेत. या ली आयोगाच्या अहवालानुसार १ ऑक्टोबर १९२६ रोजी ब्रिटिशांनी भारतात उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना परीक्षा-मुलाखतींतून पारखून घेण्यासाठी वेगळा लोकसेवा आयोग स्थापन केला. त्याची शंभरी परवा दिल्लीच्या भारत मंडपममध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत साजरी झाली. हा आयोग देशातील लाखो तरुणांचे श्रद्धास्थान असल्याचे विधान पंतप्रधानांनी केले. त्या 'श्रद्धे'चा ऊहापोह करण्यापूर्वी 'संघ लोकसेवा आयोग' अर्थात 'युनियन पब्लिक स्व्हिहस कमिशन'च्या वाटचालीबद्दल. त्यासाठी या आयोगाच्या आधी काय व्यवस्था होती, हेही पाहायला हवे. मुळात ब्रिटनमध्ये पहिल्यांदा 'सिव्हिल स्व्हिहस कमिशन'स्थापन झाले ते १८५४ मध्ये. ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता १८५७ च्या बंडाने संपवली आणि ब्रिटिश सरकारकडे भारताचे प्रशासन आले, तेव्हापासून 'सिव्हिल स्व्हिहस कमिशन'ने निवडलेले अधिकारी भारतात धाडले जाऊ लागले. तोंडदेखली ही परीक्षा भारतीयांसाठीही खुली होती, पण १८६४ पर्यंत एकही भारतीय उच्चपदस्थ या सेवेत नव्हता. रवींद्रनाथ टागोर यांचे ज्येष्ठ बंधू सत्येंद्रनाथ टागोर हे भारतीय नागरी सेवेत प्रवेश करणारे पहिले भारतीय. पुढल्या ५० वर्षांत अवघे ७८ भारतीय या सेवेत दाखल झाले. मग १९२२ मध्ये भारतात प्रथमच नागरी परीक्षा पार पडली. पण स्वतंत्र आयोग स्थापण्यासाठी 'लोकसेवा आयोग नियमावली' येण्यासाठी- आणि भारतापुरता निराळा आयोग स्थापन होण्यासाठी- १९२६ उजाडले. याचे नामकरण १९३७ मध्ये 'फेडरल पब्लिक स्व्हिहस कमिशन' असे करण्यात आले. केवळ 'आयसीएस' म्हणजे इंडियन सिव्हिल स्व्हिहस या एकाच सेवेपुरत्या असलेल्या या आयोगाने १९३९ पासून भारतीय पोलीस सेवेलाही कवेत घेतले. स्वातंत्र्याच्या उषःकाली, या केंद्रीय लोकसेवा आयोगाला स्वायत्तता देण्यावर घटना समितीत चर्चा झाली होती. वशिलेबाजी, राजकीय हस्तक्षेपापासून दूर ठेवण्यासाठी लोकसेवा आयोगाला घटनात्मक स्वायत्तता देण्यात आली. यासाठी घटनेच्या ३१५ ते ३२३ या अनुच्छेदांत केंद्रीय लोकसेवा आयोग, त्याची कर्तव्ये, अध्यक्ष व सदस्यांची निवड अशा तरतुदींचे घटनात्मक अधिष्ठान देण्यात आले. राज्यघटनेला अभिप्रेत असलेल्या आयोगाला प्रत्यक्ष आकार देण्यात आणि त्याची स्वायत्तता राखण्यात भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांचे योगदान मोठे आहे. स्वातंत्र्यानंतर परराष्ट्र सेवेसह अनेक सेवांची निवड याच आयोगातर्फे होते. भारतीय वन सेवा ही १९६६ पासून 'यूपीएससी'तर्फे निवड होणारी सेवा. त्यानंतरच्या ६० वर्षांत 'यूपीएससी'ची व्याप्ती कायम राहिली आहे. डॉ. मनमोहन सिंग यांच्या अर्थमंत्रीपदाच्या कार्यकाळात १९९१ मध्ये उदारीकरणाच्या धोरणाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर ३५ वर्षांत खासगी क्षेत्रांत रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाल्या. बँका, वित्तीय सेवा, पायाभूत सुविधा, विमान सेवा अशा विविध क्षेत्रांमध्ये चांगल्या वेतनाच्या नोकऱ्या तरुणांनी पटकावल्या. तरीही आजही सरकारी नोकऱ्यांचे आकर्षण कमी झालेले नाही. ही समाधानाची बाब मानायची की चिंतेची? सरकारी नोकरीत येऊ पाहणाऱ्यांना आकर्षण 'लोकसेवे'चे असते की वरकमाईचे? सन्माननीय अपवाद वगळूनही हा प्रश्न रास्त ठरतो याचे कारण आयोगापर्यंत पोहोचलेला भ्रष्टाचार.शतक वर्ष पूर्ण करणाऱ्या केंद्रीय लोकसेवा आयोग किंवा महाराष्ट्रासह विविध राज्यांच्या लोकसेवा आयोगांची विश्वासार्हता धोक्यात आली आहे. महाराष्ट्र, कर्नाटकसह विविध राज्य लोकसेवा आयोग हे भ्रष्टाचार आणि गैरव्यवहारांचे अड्डे बनले आहेत. दोनच दिवसांपूर्वी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या आजी-माजी अध्यक्ष तसेच सदस्यांची चौकशी करण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांना करावी लागली. म्हणजेच अध्यक्षांपासून सारेच सुपात आहेत. नोकर भरतीतील गैरव्यवहारावरून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माजी अध्यक्षांची तुरुंगवारी झाली. कर्नाटकमध्ये गेल्याच महिन्यात लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांना पदावरून हटवण्याचा आदेश मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने राज्यपालांनी प्रसृत केला. या तुलनेत केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या कारभाराचे तेवढे वाभाडे निघालेले नाहीत ही त्यातल्या त्यात समाधानाची बाब. तरीही दरवर्षी होणाऱ्या काही नियुक्त्यांवर आक्षेप घेतला जातो. आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांची लबाडी उघड होऊनही 'यूपीएससी'ची कारवाई धिम्या गतीने झाल्याचे उदाहरणही आहे. खेडकर यांनी जात व अपंगत्वाची बनावट कागदपत्रे सादर केल्याचे चौकशीत निष्पन्न झाले. खेडकर यांच्या दालनाच्या वादातून झालेल्या चौकशीत त्यांनी बनावट कागदपत्रे सादर केल्याचे उघड झाले. त्या स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण झाल्या तेव्हा केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या ही बाब कशी निदर्शनास आली नाही? हे एक प्रकरण उघड झाले. अशी किती असतील याची काही गणती नाही. 'यूपीएससी'च्या अध्यक्षपदी मनोज सोनी यांची निवडच वादग्रस्त ठरली होती. त्यावरून टीकाही झाली होती. पूजा खेडकर प्रकरण समोर येताच सोनी यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. या थराचे प्रवाद असल्यास आयोगाच्या विश्वासाऱ्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणारच.केंद्रीय लोकसेवा आयोगाला १०० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुभेच्छा देताना आयोग म्हणजे देशातील लाखो तरुणांचे श्रद्धास्थान असल्याचे विधान केले, ते या पार्श्वभूमीवर. याच स्पर्धा परीक्षा पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यावर पंतप्रधानांनी खरे तर भर द्यायला हवा. तरुणांमध्ये स्पर्धा परीक्षांचे किती आकर्षण आहे हे दिसतेच. त्यात सत्ताधाऱ्यांचे काही कर्तृत्व नाही. उलट लोककल्याणाच्या नावाखाली दौलतजादा करताना सरकारी खर्चात झालेली वाढ हे कारण देऊन सेवांचे खासगीकरण सुरू झाल्याने आपोआपच सरकारी नोकऱ्यांचे प्रमाणही घटू लागले आहे. देशपातळीवरील वरिष्ठ पदांसाठी स्पर्धा परीक्षा घेणाऱ्या संघ लोकसेवा आयोगासह विविध राज्यांमधील लोकसेवा आयोगांच्या कारभारात सुधारणा कशी होईल आणि त्यात पारदर्शकता कशी आणता येईल यावर सत्ताधाऱ्यांनी विचार करण्याची वेळ आली आहे.

# पाणीटंचाई वर एआयच्या उपाययोजना...

संभाव्य पाणी टंचाई बाबत AI ला विचारणा केली असता त्याने पुढील उपयुक्त उपाययोजना सुचविल्या आहेत. कृपया सर्व लोक प्रतिनिधी, समाजसेवी संस्था, राजकीय नेते व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी या उपाययोजनांची व्यवहार्यता तपासून योग्य ती कार्यवाही करावी.

४ ऑक्टोबर २०२६ रोजी Upper Wardha मध्ये सुमारे ५८.४२% उपयुक्त साठा असून मागील वर्षी याच दिवशी तो ९९.३४% होता, ही तुलना लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

**अमरावती शहर जलसंवर्धन व जल-बचत कृती आराखडा**
**कालावधी : ऑक्टोबर २०२६ ते जून २०२७**

**प्रस्तावित संस्थात्मक भागीदारीः** अमरावती महानगरपालिका, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा आणि जलसंपदा विभाग.

**१. पार्श्वभूमी**

२०२६ च्या नैऋत्य मोसमी पावसाने महाराष्ट्रात सरासरीपेक्षा सुमारे १९% कमी पाऊस दिला. विदर्भात तूट आणखी मोठी असून अमरावती जिल्ह्यात ३० सप्टेंबरपर्यंतचा पाऊस सामान्याच्या तुलनेत सुमारे **४३%**कमी असल्याचे अहवालात नमूद आहे.

४ ऑक्टोबरच्या उपलब्ध आकडेवारीनुसार अमरावती विभागातील प्रमुख, मध्यम व लघु प्रकल्पांचा एकत्रित उपयुक्त साठा सुमारे **६२.०७%** आहे; Upper Wardha मध्ये सुमारे **५८.४२%** साठा आहे.

त्यामुळे **तातडीची पाणीटंचाई जाहीर करण्याऐवजी एप्रिल-मे २०२७ लक्षात घेऊन पूर्वतयारी करणे** हा या आराखड्याचा मुख्य उद्देश असावा.

**२. मुख्य उद्दिष्टे**

१. शहराचा पिण्याच्या पाण्याचा अनावश्यक वापर **किमान १०% कमी करणे.**

२. जलवाहिन्यांमधील गळती आणि अनधिकृत वापर कमी करून उपलब्ध पाण्याचा प्रत्यक्ष उपयोग वाढवणे.

३. Upper Wardha मधील साठ्यातून **एप्रिल-मे महिन्यासाठी आवश्यक राखीव साठा सुरक्षित ठेवणे.**

४. भूजलावरचा अनावश्यक दबाव कमी करणे.

५. पुढील पावसाळ्यातील प्रत्येक पावसाचा अधिकाधिक भाग **भूजल पुनर्भरणासाठी वापरण्याची व्यवस्था करणे.**

**३. महिनानिहाय कृती Action Plan**

| कालावधी | प्रमुख काम | जबाबदार यंत्रणा |
|---|---|---|
| ऑक्टोबर २०२६ | शहराचा Water Audit | AMC+MJP |
| | मुख्य जलवाहिन्यांची leakage survey Upper Wardha साठ्याचे साप्ताहिक परीक्षण | AMC+MJP जलसंपदा विभाग |
| नोव्हेंबर | १०% बचत अभियान सार्वजनिक | amc |
| | नळांची गळती बंद शासकीय इमारतींचे water audit Rain | AMC+नागरिक |
| | water-recharge स्थळांची निवड | A M C जिल्हाधिकारी |
| डिसेंबर | मोठ्या ग्राहकांचे स्वतंत्र audit उद्योग/हॉटेल/मंगल कार्यालयांसाठी | AMC+GSDA |
| | पुनर्वापराचे पाणी बांधकामासाठी | amc |
| | potable water वापरावर नियंत्रण | amc |
| जानेवारी २०२७ | पहिला जलस्थिती अहवाल | amc |

| कालावधी | प्रमुख काम | जबाबदार यंत्रणा |
|---|---|---|
| | Upper Wardha साठ्याचा पुनर्विचार एप्रिल-जूनचा water budget | AMC+ जिल्हाधिकारी |
| फेब्रुवारी | उन्हाळी contingency plan टँकर भरण्याची/वितरणाची ठिकाणे निश्चित केली संवेदनशील विभाग निश्चित केले | जलसंपदा AMC+MJP |
| मार्च | १५% बचतीची गरज आहे का याचा निर्णय सार्वजनिक जनजागृतीचा दुसरा टप्पा भूजल पातळी तपासणी | जिल्हाधिकारी + AMC<br>AMC जिल्हाधिकारी |
| एप्रिल-मे | संरक्षित पाणी वापर योजना आवश्यक असल्यास वेळापत्रकानुसार पुरवठा tanker व्यवस्था फक्त आवश्यक भागात | AMC + जिल्हाधिकारी |
| जून | पहिल्या पावसाचे recharge नवीन जलवर्षाचे पुनर्मूल्यांकन | AMC + नागरिक सर्व यंत्रणा |

भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा अमरावती जिल्ह्यात **१५० निरीक्षण विहिरींच्या** माध्यमातून ऑक्टोबर, जानेवारी, मार्च आणि मेमध्ये भूजल पातळी मोजते. त्यामुळे वरील जल-बजेटमध्ये ही अधिकृत निरीक्षणे समाविष्ट करणे अत्यंत उपयुक्त ठरेल.

**४. सर्वांत महत्त्वाचे - १०% बचत कशी साधायची?**

समजा शहराचा प्रत्यक्ष वापर **८० MLD** असेल, तरः
**१०% बचत ८० MLD**
म्हणजे दररोज सुमारे **८० लाख लिटर** पाणी वाचवणे.
यासाठी नागरिकांकडूनच सर्व बचत अपेक्षित ठेवू नये.

**बचतीचे लक्ष्य असे असावेः**

| स्त्रोत | एकूण बचतीतील लक्ष्य |
|---|---|
| जलवाहिनी leakage कमी करणे | ४०% |
| घरगुती वापर | ३०% |
| commercial वापर | १५% |
| शासकीय/सार्वजनिक वापर | १०% |
| इतर | ५% |

यामुळे नागरिकांवर अवाजवी निर्बंध न आणता बचत साधता येईल.

**५. प्रत्येक प्रभागासाठी 'जलस्थिती पत्रक'**महानगरपालिकेने प्रत्येक प्रभागासाठी दर महिन्याला फक्त एका पानाचे पत्रक प्रसिद्ध करावे:

**प्रभाग क्रमांकः**
लोकसंख्या :-
घरांची संख्या :-
सरासरी पाणीपुरवठा : MLD
प्रतिव्यक्ती उपलब्धता : LPD
मागील महिन्याच्या तुलनेत वापर : ? / ?
मुख्य गळती:
दुरुस्त केलेल्या leakage:
पाण्याची बचत : लाख लिटर
उपलब्ध बोअरवेल:
रिचार्ज संरचना:

यामुळे 'पाणी कमी आहे' किंवा 'पाणी भरपूर आहे' अशा अंदाजांऐवजी **प्रभागनिहाय वस्तुनिष्ठ माहिती** मिळेल.

**६. जानेवारीत एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय१ जानेवारी २०२७ रोजी Upper Wardha चा साठा पाहून एप्रिल-जूनचा निर्णय घ्यावा.**

**साठा समाधानकारक असल्यास**
सध्याचा पुरवठा कायम + १०% बचत.
**साठा चिंताजनक असल्यास**
१५% बचत + non-essential वापरावर निर्बंध.
**साठा गंभीरपणे कमी असल्यास**
पूर्वनियोजित rationing + tanker contingency plan.
**पाणी कपात अचानक जाहीर करण्यापेक्षा जानेवारीतच नागरिकांना संभाव्य तीन परिस्थिती सांगणे अधिक योग्य.**

**७. Tanker हा पहिला नव्हे, शेवटचा उपाय**

अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयाने २०२६ मध्ये पाणीटंचाईग्रस्त गावांसाठी private tanker supply संदर्भात निविदा काढलेली आहे. शहरासाठी मात्र धोरण असे असावेः

**पहिली उपायः** गळती नियंत्रण
**दुसराः** consumption reduction
**तिसरेः** पर्यायी/पुनर्वापर केलेले पाणी
**चौथेः** स्थानिक भूजल/पुनर्भरण
**शेवटीः** tanker.

**८. एक दीर्घकालीन निर्णय - अमरावतीला 'Water Sensitive City' बनवणे** हा केवळ २०२६-२७ चा आराखडा न राहता कायमस्वरूपी धोरण व्हावे.

नवीन:
अपार्टमेंट
सरकारी इमारत
शाळा
विद्यापीठ
रुग्णालय
हॉटेल
मंगल कार्यालय
मोठे commercial complexes
यांच्यासाठी:

**पावसाचे पाणी साठवण + भूजल पुनर्भरण + सांडपाण्याचा पुनर्वापर**
ही त्रिसूत्री बंधनकारक करणे विचारात घ्यावे.



**९. नागरिकांसाठी १० नियम**

**अमरावतीकरांनी पुढील ९ महिन्यांसाठी हे दहा नियम स्वीकारावेतः**

१. नळ उघडा ठेवू नये.
२. गळणारा नळ २४ तासांत दुरुस्त करावा.
३. गाडी पाइपने धुवू नये.
४. बागेला सकाळी किंवा संध्याकाळी पाणी द्यावे.
५. RO मधून निघणारे reject water वाया घालवू नये.
६. कपडे/भांडी धुतलेले योग्य पाणी पुनर्वापरावे.
७. घराच्या छताचे पाणी recharge pit कडे वळवावे.
८. ̇orewell चा अनावश्यक वापर टाळावा.
९. सोसायटीने स्वतंत्र water meter बसवावा.
१०. **दर कुटुंबाने दररोज किमान ५० लिटर बचतीचे लक्ष्य ठेवावे.**

**१०. सर्वांत महत्त्वाची शिफारस**

अमरावती महानगरपालिकेने **'अमरावती जलस्थिती २०२७'** नावाचे सार्वजनिक
dashboard सुरू करावे.
दर रविवारी केवळ पाच आकडेः

**Upper Wardha साठा : %**
**शहराचा दैनिक वापर : MLD**
**या आठवड्यातील बचत : MLD**
**गळतीमुळे गमावलेले पाणीः _ MLD N**
**एप्रिल-जूनसाठी राखीव : MLD**

हे पाच आकडे नागरिकांना कळले तर **पाणीबचत ही केवळ आवाहनाची गोष्ट न राहता सामूहिक जबाबदारी बनेल.**

**अंतिम निष्कर्ष**

४ ऑक्टोबरची स्थिती पाहता **अमरावतीसाठी तातडीची घबराट करण्याची गरज नाही; परंतु परिस्थिती गंभीरपणे घेण्यास पुरेसे कारण आहे.** Upper Wardha चा साठा मागील वर्षाच्या तुलनेत खूपच कमी आहे आणि अमरावती जिल्ह्याची पावसाची तूट मोठी आहे.

**आत्ताच १०% बचत सुरू करून जानेवारीत पुनर्मूल्यांकन करणे** हा सर्वांत संतुलित मार्ग आहे. एप्रिल-मेपर्यंत वाट पाहणे उशीर ठरू शकते.

**किशोर देशपांडे.**

# नेतान्याहूंची झोप उडवणारी डॉक्युमेंटरी

नॅझा ही डॉक्यूमेंटरी गाजते आहे, इस्रायलमधे या माहितीपटाने धमाल उडवलीय.युवाल अब्राहम आणि रेचल सोर या इस्रायली तरूणांनी हा माहितीपट केलाय. या पटाला व्हेनिस महोत्सवात ज्यूरींचे विशेष पारितोषिक मिळाले, प्रेक्षकांनी वीस मिनिटे टाळ्यांचा कडकडाट केला.

तेल अविवमधे चित्रपटाच्या दिक्दर्शकांच्या घरासमोर निदर्शने झाली. नेतान्याहू या मुलांचे नागरीकत्व काढून घेणार म्हणतातेत. कोण म्हणतात मुलांना फाशी द्या, कोण म्हणतात जन्मठेप द्या.असे काय आहे त्या माहितीपटात?इस्रायलने गाझात माणसं कशी मारली याची माहिती या माहितीपटात आहे. इस्रायलच्या लष्करातल्या २४ अधिकाऱ्यांच्या मुलाखती पटात आहेत. तेल अवीवमधे एका घराच्या गच्चीवर या मुलाखती घेतल्या आहेत. मुलाखत देणाऱ्याचे चेहरे लपवले आहेत, त्यांचा आवाज बदलण्यात आला आहे. मुलाखत देणारा अधिकारी सर्वस्वी गुप्त रहातो.मुलाखत पहाताना चारही बाजूला रात्रीचे लकलकतं शहर दिसतं. मुलाखत स्टुडियोत झालेली नाही, आसपास माणसांचा वावर आहे, वास्तवाच्या नेपथ्थ्यावर मुलाखत झालीय हे कळते, एक सूक्ष्म थरार त्यात लपलेला असतो.

नेझा हा शब्द दोन हिब्रू शब्दांची संक्षिप्त रूपे एकत्र करून तयार केलेला आहे. इस्रायलच्या लष्करात हा शब्द वापरला जातो. त्याचा अर्थ कोलॅटरल डॅमेज. निरपराध माणसे मारली जाणे. हमासचा कार्यकर्ता, नेता, हेरलेला असतो. तो आपल्या कुटुंबासमवेत असतो. ऑफिसात असतो, कॅफेमधे असतो, हॉस्पिटलात असतो. किती तरी माणसे सभोवताली असतात. बाँब किंवा तोफेचा गोळा हमासीवर आदळतो तेव्हां आसपासची माणसंही मरतात. त्यांचा युद्धाशी,हमासशी संबंध नसतो. हमास कार्यकर्ता मारायचा म्हटले की हे 'सोबत मृत्यू' अटळ असतात. आसपासच्या माणसांना वाचवायचे असेल तर हमासच्या कार्यकर्त्याला मारता येत नाही. असा लष्कराचा पेच.

निष्पाप माणसे मरू नयेत, कमीत कमी मरावेत असा प्रयत्न अपेक्षित असतो. (हिरोशिमात किती निष्पाप मारले?)इस्रायलने ठरवलेय की एका हमासीमागे २० निष्पाप मारायला हरकत नाही. ही माहिती एक अधिकारी देत होता. मुलाखतकाराने त्याला थांबवले, विचारले. 'एका सामान्य हमासीला मारण्यासाठी वीस निष्पाप नागरीक मारायचे म्हणता, जर हज्जारो हमासी कार्यकर्ते असतील तर?' कारण इस्रायली सैन्याने केलेल्या अभ्यासानुसार हमासच्या कार्यकर्त्यांची संख्या ७ हजार होती.

अधिकाऱ्यानें उत्तर दिले 'तर पूर्ण गाझा मारून टाकायचे.'गाझात एक लाखापेक्षा जास्त माणसे कशी मेली या प्रश्नाचे उत्तर वरील अधिकाऱ्याच्या उत्तरात मिळते. इस्रायली लष्कर आणि सरकारची लाजच व्हेनीस चित्रपट महोत्सवात गेली, साऱ्या जगाला सारा मामला कळला. माणसे किती निष्ठूर, क्रूर होऊ शकतात ते या माहितीपटातून जगाच्या लक्षात आले.

इस्रायल सॅटेलाईटचा वापर करते. माणसे, इमारती अचूक हेरतें माणसांच्या हालचाली नोंदतें, माणसांचे चेहरेही सॅटेलाईट नोंदवते. लोकांचे टेलेफोन, सेलफोन, कंप्यूटर, लॅपटॉप इत्यादी टॅप केले जातात. संभाषणे आणि ईमेल, व्हॉट्सॅपवरचे मेसेजेस हॅक केले जातात. या साठी पेगॅसस हे अमोध तंत्रज्ञान वापरले जाते. इमारतींची माहिती 'गॉस्पेल' हा प्रोग्राम वापरते. माणसांची माहिती 'लवेंडर' वापरतो. हमासचा तळातला, मध्यम पातळीवरचा, पहिल्या थरातला आणि मुख्य म्होरक्या नेमका ठरतो. गॉस्पेल आणि लवेंडवरची माहिती एका कार्यक्रमात टाकली जाते. अल्गोरिदम दिला जातो. झाले काम. एक कमांड द्यायची, एकच बटन दाबायचे. बाँब, गोळी, तोफेचा गोळा लक्ष्याच्या दिशेने झेपावतो. वैमानिक, तोफेचा चालक, रणगाडा चालकाने विचार करण्याचा प्रश्नच येत नाही.

एक इमारत उडवून झाली की रणगाडा विचारायचा,आता काय करू, कोणाला उडवू. हा प्रश्न अधिकाऱ्याकडे नव्हे कंप्यूटरकडे पोचत असे. उत्तर तयार. निघाला रणगाड्या नव्या इमारतीकडे. खरे म्हणजे माहितीपटात जे सांगितलेय ते नवे नाही. इस्रायलमधले पेपर आणि अमेरिकेतले पेपर यामधे ही माहिती अनेक वेळा प्रसिद्ध झाली आहे. माणसे मारण्यासाठी लष्कराच्या कोणत्या युनिटने वरील संहारक कार्यक्रम सिद्ध केला आहे त्याची नावानिशी माहिती न्यू यॉर्क टाईम्स आणि वॉशिंग्टन पोस्टने प्रसिद्ध केली आहे.

इस्रायलवर युद्ध गुन्हेगारीचा आरोप आंतरराष्ट्रीय न्यायालयाने ठेवला, जे पुरावे हाताशी लागले त्या नुसार इस्रायल सरकारला आणि नेतान्याहू यांना युद्ध गुन्हेगार ठरवण्यात आले. इस्रायल सरकारने आंतरराष्ट्रीय कोर्टच आपण मानत नाही असे जाहीर करून टाकले. ट्रंप यांनी तर सिक्सरच ठोकली. त्यांनी आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या न्यायाधिशांनाच क्रिमिनल ठरवले आणि त्यांना अमेरिकेत यायची बंदी घातली. अमेरिकेत आलात तर अटक होईल, तुरुंगात जावे लागेल असे ट्रंपनी जाहीर केले.

नॅझा माहितीपटाला येवढी पार्श्वभूमी आहे.युवाल अब्राहम आणि रेचल सोर यांनी इस्रायल सरकारला उघडे पाडले, इस्रायली सैन्याला उघडे पाडले. सरकारला उघडे पाडणे हा गुन्हा आहे काय? खरे म्हणजे हे प्रश्न इस्रायलच्या लोकसभेत विरोधी पक्षानं उपस्थित करायला हवेत.गाझा युद्ध हे इस्रायलच्या सुखासाठी नसून नेतान्याहूंची सत्तेत रहाण्याची धडपड आहे हे इस्रायलला समजले आहे. परंतू ७ ऑक्टोबर २०२३ ला हमासने इस्रायलवर केलेला हल्लाही अमानुष असल्याने हमासच्या विरोधात काहीही केले तरी चालेल असा समज नेतान्याहूनी पसरवला आहे. त्यामुळंच विरोधी पक्षही गप्प रहातात.

विरोधी पक्षांनी आणि जागरूक मतदारांनी जे करायला हवे ते तरूणांनी करून दाखवलेय.अमेरिकेने वियेतनाममधे केलेले अनन्वीत अत्याचार माध्यमांनी उघड केले तेव्हां त्यांच्यावर अमेरिकेत देशद्रोहाचा आरोप झाला होता. युवाल आणि सोर यांनी या आधी नो अदर लँड नावाचा माहितीपट केला आहे. त्यात इस्रायलने वेस्ट बँकमधे चालवलेली अमानुष दादागिरी चित्रीत केली आहे. नो अदर लँड या माहिती पटाला ऑस्कर मिळाले होते.नेतान्याहू खवळणे स्वाभाविक आहे.

-निळू दामले

सोमवार, दि. ५ ऑक्टोबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# ब्राह्मणगावात पाण्यासाठी टँकरचा आधार!

## आठ दिवसांपासून पाणीपुरवठा ठप्प, भारनियमनाच्या कचाट्यात ग्रामस्थांची तहान

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**उमरखेड, दि. ४ :** उमरखेड तालुक्यातील ब्राह्मणगाव येथे ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीलाच भीषण पाणीटंचाई निर्माण झाली आहे. गावाला मागील सुमारे ५० वर्षांपासून सोईट (म) शिवारातील विहिरीतून पाणीपुरवठा केला जातो. मात्र, विहिरी वरील विद्युत जोडणी ढाणकी सब स्टेशन अंतर्गत केल्याने आठ-आठ तासांच्या भारनियमनाचा फटका पाणीपुरवठ्याला बसत आहे.

परिणामी गेल्या आठ दिवसांपासून गावातील पाणीपुरवठा विस्कळीत झाला असून, ग्रामस्थांना चक्क खासगी टँकरचे पाणी विकत घेऊन तहान भागवावी लागत आहे. सोईट (म) शिवारातील विहिरीवरील विद्युत यंत्रणेत वारंवार तांत्रिक बिघाड होत असल्याने यापूर्वीही ग्रामस्थांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत होता. त्यातच विद्युत जोडणी ढाणकी अंतर्गत गेल्याने भारनियमनामुळे पाणी उपसा करण्यावर मर्यादा आल्या आहेत. यंदा अत्यल्प पावसामुळे आधीच जलस्रोतांवर ताण निर्माण झाला असताना विद्युत समस्येने परिस्थिती अधिकच बिकट केली आहे. पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना खासगी टँकर वर अवलंबून राहावे लागत असून, दैनंदिन गरजेपुरते पाणीही विकत घेण्याची वेळ आली आहे. विशेषतः उन्हाची तीव्रता वाढत असताना महिलांसह वृद्ध आणि लहान मुलांना पाण्यासाठी धावपळ करावी लागत आहे. गावातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी ग्रामपंचायत व संबंधित प्रशासनाने पर्यायी व्यवस्था उभी करणे गरजेचे आहे. मात्र, उपाययोजनांबाबत अपेक्षित गतीने हालचाली होत नसल्याची ग्रामस्थांची तक्रार आहे. पाणीटंचाई आणखी तीव्र होण्यापूर्वी प्रशासनाने कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी होत आहे.

### विहिरीत पाणी, पण गावाच्या नशिबी टंचाई!

**ब्राह्मणगावला पाणीपुरवठा करणाऱ्या सोईट (म) शिवारातील विहिरीत सध्या सुमारे दोन महिने पुरेल एवढा पाणीसाठा असल्याचे पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांकडून सांगण्यात येते. पूर्वी या विहिरीजवळून वाहणाऱ्या एसकेएफ गायपांदण नाल्यात इसापूर धरणाच्या डाव्या कालव्याच्या मायनरमधून पाणी सोडले जात असल्याने विहिरीतील पाणीसाठा टिकून राहत होता. मात्र, मागील वर्षी नाल्याचे खोलीकरण झाल्याने पाणी विहिरीजवळ न थांबता वाहून जात असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे टंचाईच्या काळात नाल्यात मायनरचे पाणी सोडले तरी त्याचा विहिरीच्या पाणीसाठ्यावर अपेक्षित परिणाम होणार नाही, अशी परिस्थिती आहे. त्यामुळे केवळ तात्पुरत्या उपायांवर अवलंबून न राहता ग्रामपंचायतीने पर्यायी जलस्रोत व पाणीपुरवठ्याचे ठोस नियोजन करावे, अशी ग्रामस्थांची मागणी आहे.**

# अवैध रेती-मुरूमासह दोन ट्रॅक्टर-ट्रॉली जप्त..!

## १३.६२ लाखांचा मुद्देमाल ताब्यात, अवैध गौण खनिज वाहतुकीवर एलसीबीची कारवाई

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ४ :** जिल्ह्यात अवैधरित्या गौण खनिजाचे उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखेने कारवाईचा धडाका सुरू ठेवला आहे. ३ ऑक्टोबर रोजी नेर पोलिस ठाण्याच्या हद्दीत केलेल्या दोन स्वतंत्र कारवायांत पिवळी रेती व मुरूमाची विनापरवाना वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर-ट्रॉली पकडून तब्बल १३ लाख ६२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पहिल्या कारवाईत नेर-यवतमाळ मार्गावरील उद्धवबाबा रेस्टॉरंटसमोर विनानंबर निळ्या रंगाचा पॉवरट्रॅक ट्रॅक्टर व ट्रॉली आढळून आली. तपासणीदरम्यान ट्रॉलीमध्ये अंदाजे एक ब्रास पिवळी रेती होती. चालक राजू किसनराव मडावी (४१), रा. अशोकनगर, नेर याच्याकडे रेती वाहतुकीचा आवश्यक परवाना व कागदपत्रे नसल्याचे समोर आले. या कारवाईत ६ लाख ८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दुसऱ्या कारवाईत दारव्हा रोडवरील कृषी उत्पन्न बाजार समितीसमोर मुरूमाची वाहतूक करणारा सोनालिका कंपनीचा ट्रॅक्टर पकडण्यात आला. ट्रॉलीमध्ये अंदाजे एक ब्रास मुरूम आढळला. चालक प्रदीप गोविंदराव जाधव (३२), रा. येळोंडा याच्याकडे आवश्यक रॉयल्टी व परवाना कागदपत्रे नसल्याने ट्रॅक्टर-ट्रॉलीसह ७ लाख ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दोन्ही प्रकरणांत भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील कलम ४८(७)(८) अन्वये नेर पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ही कारवाई एसपी कुमार चिंता, अपर एसपी अशोक थोरात व एलसीबीचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली कुणाल मुंडोकार, सचिन मलाये, पवन ढवळे व चालक अमित कुमरे यांच्या पथकाने केली.

## थोडक्यात



### हिरापूरमध्ये श्रमदानातून स्वच्छतेचा जागर

**RCCPL,'आम्ही आमच्या आरोग्यासाठी' संस्थेसह ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग**

**झरी-जामणी :** स्वच्छ गावाचा संदेश केवळ घोषणांपुरता न ठेवता प्रत्यक्ष श्रमदानातून देत हिरापूर येथे गावस्तरीय स्वच्छता मोहीम उत्साहात राबविण्यात आली. बिरला कॉर्पोरेशन लिमिटेड (RCCPL), युनिट मुकुटबन आणि सहयोगी संस्था 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी' यांच्या संयुक्त विद्यमाने १ ऑक्टोबर रोजी हा उपक्रम पार पडला.

RCCPLचे युनिट हेड सुनील सूद यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या मोहिमेत वरिष्ठ अधिकारी मुकेश तिवारी, विजय चौहान, सुदीप द्विवेदी, शोभा श्रीवास, धर्मेंद्र पात्रा, संतोष पाईलवार यांच्यासह 'आरोग्य ताई' टीम, VGSS टीम आणि हिरापूर ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग घेतला.

यावेळी गावातील विविध परिसरात श्रमदान करून स्वच्छता करण्यात आली. स्वच्छतेबाबत जनजागृती, निरोगी वातावरण निर्मिती आणि ग्रामस्थांमध्ये नियमित स्वच्छतेची सवय रुजविणे, हा मोहिमेचा प्रमुख उद्देश होता. या उपक्रमातून 'स्वच्छ गावासाठी प्रशासनासोबत नागरिकांचाही सहभाग तितकाच महत्त्वाचा' असल्याचा संदेश देण्यात आला.



### विभागीय तायक्वांदो मध्ये आमणीच्या खेळाडूंची दमदार झेप!

**प्रियदर्शनी कॉन्व्हेंटच्या शिवम व शरयूला रौप्यपदक.**

**महागाव :** महागाव तालुक्यातील आमणी येथील प्रियदर्शनी कॉन्व्हेंट स्कूलच्या विद्यार्थ्यांनी विभागीय शालेय तायक्वांदो स्पर्धेत दमदार कामगिरी करत क्रीडा क्षेत्रात आपली छाप उमटवली. अकोला येथे ३० सप्टेंबर व १ ऑक्टोबर रोजी झालेल्या या स्पर्धेत १४ वर्षे वयोगटातील ३८ ते ४१ किलो वजन गटात शिवम किशोर जाधव याने अंतिम फेरी गाठत रौप्यपदक पटकावले. याच वयोगटात शरयू किशोर जाधव हिनेही उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत अंतिम फेरीत धडक मारली आणि रौप्यपदकावर नाव कोरले. क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या स्पर्धेतील यशामुळे आमणीच्या शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. नियमित सराव, जिद्द आणि कठोर मेहनतीच्या जोरावर दोन्ही खेळाडूंनी हे यश संपादन केले.संस्थेच्या सचिव वनमाला राठोड, मुख्याध्यापक अभिषेक राठोड, समन्वयक वैष्णवी अभिषेक राठोड, क्रीडा शिक्षक व प्रशिक्षक मारुती बाभळे यांच्यासह शिक्षक व पालकांनी विजेत्यांचे अभिनंदन केले.




### द युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या जिल्हा कार्यकारिणीची घोषणा..!

**गणेश एकंडवार यांच्याकडे जिल्हाध्यक्षपद**

**यवतमाळ :** ग्रामीण भागातील पत्रकारांच्या न्याय्य हक्कांसाठी आणि त्यांच्या विविध प्रश्नांना शासन दरबारी वाचा फोडण्यासाठी कार्यरत असलेल्या द युवा ग्रामीण पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्याच्या यवतमाळ जिल्हा कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली आहे. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा संस्थापक शेख अन्सार बाबासाहेब यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. गणेश श्रीराम एकंडवार यांची जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. उपाध्यक्षपदी हर्षनंदा पुरुषोत्तम वाकोडे, सचिव सचिन रमेश चहांदे, कोषाध्यक्ष मनोज राऊत, समन्वयक पुरुषोत्तम वाकोडे, संघटक दत्ता इंगोले, संपर्क प्रमुख प्रवीण राठोड, खजिनदार गणेश धनोडे आणि सहसचिव बंडू हलबी यांची नियुक्ती करण्यात आली.

ग्रामीण पत्रकारांच्या समस्या, पत्रकारांचे हक्क आणि पत्रकारिता क्षेत्रातील अडचणी यासाठी संघटितपणे आवाज उठविण्याचा निर्धार नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. कार्यकारिणीच्या निवडीबद्दल राष्ट्रीय अध्यक्ष शेख अन्सार बाबासाहेब यांच्यासह विविध मान्यवरांनी पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

# जातनिहाय जनगणनेसाठी वणीत ओबीसींचा एल्गार!

## शिवतीर्थावर सत्याग्रह..! स्वतंत्र कॉलमसह डिजिटल जात नोंदणीची जोरदार मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**वणी, दि. ४ :** ओबीसीची जातनिहाय जनगणनेसाठी सत्याग्रह व ओबीसी समाजाची अचूक लोकसंख्या समोर आली तरच सामाजिक न्याय, आरक्षण आणि प्रतिनिधित्वाची खरी मोजदाद होऊ शकते, अशी ठाम भूमिका घेत ओबीसी समाज बांधवांनी वणीतील शिवतीर्थावर एल्गार पुकारला. OBC (VJ, NT, SBC) जातनिहाय जनगणना समिती, वणी-मारेगाव-झरीजामणीच्या वतीने २ ऑक्टोबर रोजी गांधी जयंतीनिमित्त शांततापूर्ण सत्याग्रह करण्यात आला.

आगामी जनगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम ठेवावा, तसेच केंद्र व राज्य शासनाच्या अधिकृत जात यादीवर आधारित डिजिटल अर्जामध्ये स्वतंत्र ड्रॉप-डाऊन मेन्यू उपलब्ध करून प्रमाणित जात नोंदणी करावी, या प्रमुख मागण्या यावेळी करण्यात आल्या. २०११च्या सामाजिक, आर्थिक व जात जनगणनेत जात नोंदणीतील स्पेलिंगच्या चुका, विविध नोंदी आणि पोटजातींमुळे विसंगती निर्माण झाल्याचा मुद्दा समितीने उपस्थित केला. त्यामुळे भविष्यात अशा त्रुटी टाळण्यासाठी डिजिटल पद्धतीने अचूक नोंदणी करण्याची मागणी करण्यात आली. शिवतीर्थावर दुपारी १२ ते ४ वाजेपर्यंत झालेल्या आंदोलनात शिक्षक, महिला, युवक-युवती, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध समाजघटकांतील नागरिक सहभागी झाले. गांधीजींच्या अहिंसेचा आणि लालबहादूर शास्त्री यांच्या कर्तव्यनिष्ठेचा आदर्श समोर ठेवत संविधानिक मार्गाने लढा सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. प्रदीप बोरकुटे यांनी संचालन, रघुनाथ कांडारकर यांनी प्रास्ताविक, तर गोविंद थेरे, मोरेश्वर वासेकर, नितीन मोहितकर, निलिमा काळे व मायाताई आसूटकर यांनी मार्गदर्शन केले. नारायण मांडवकर यांनी आभार मानले. यावेळी मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

# हिवऱ्यात 'प्रशासक राज' ग्रामस्थांच्या मूलभूत प्रश्नांना वाली कोण?

## ग्राम सेवकाच्या कथित निष्काळजी कारभाराचा फटका

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**महागाव, दि. ४ :** हिवरा (संगम) ग्रामपंचायतीची मुदत संपल्यानंतर प्रशासकाची नियुक्ती झाली.मात्र प्रशासकीय राजवट सुरू झाल्यापासून गावातील मूलभूत प्रश्न अधिकच ऐरणीवर आल्याची तक्रार ग्रामस्थांकडून होत आहे.

प्रशासक तालुक्याच्या ठिकाणाहून कारभार पाहत असल्याने ग्रामपंचायतीचा दैनंदिन कारभार ग्रामसेवकाच्या हाती असून, त्यांच्या कथित निष्काळजीपणाचा फटका जनतेला बसत असल्याचा आरोप होत आहे. हिवरा ही महागाव तालुक्यातील मोठ्या ग्रामपंचायतींपैकी एक आहे. मागील कार्यकाळात सरपंच मेघाताई बोरुळकर, उपसरपंच शरद पाटील कदम यांच्या नेतृत्वाखाली १३ सदस्यांची ग्रामपंचायत कार्यरत होती. न्यू परिवर्तन पॅनलची सत्ता, तर एकता पॅनल विरोधी बाकावर होते. मात्र, विरोधकांनीही प्रभावी भूमिका न बजावल्याची चर्चा आहे. मुदत संपल्यानंतर प्रशासक नियुक्त झाला असला तरी पाणीपुरवठा, अंतर्गत रस्ते, स्वच्छता आणि पथदिवे यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर नागरिकांच्या तक्रारी कायम आहेत. समस्या मांडण्यासाठी ग्रामस्थांना ग्रामपंचायत कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे प्रशासकीय व्यवस्था असूनही जनतेच्या प्रश्नांना वाली कोण, असा सवाल उपस्थित होत आहे. दरम्यान, प्रशासक सुरेश चव्हाण यांनी प्रशासकीय काळात धोरणात्मक निर्णयांना मर्यादा असल्याचे स्पष्ट करत मूलभूत सुविधांच्या प्रश्नांकडे स्वतः लक्ष देऊन कार्यवाही केली जात असल्याचे सांगितले. नागरिकांनी थेट संपर्क साधावा, असेही त्यांनी आवाहन केले. माजी उपसरपंच शरद पाटील कदम यांनी ग्रामपंचायत आर्थिकदृष्ट्या सक्षम केल्याचा दावा करत, ग्रामसेवकाच्या निष्काळजीपणाचा फटका जनतेला बसत असल्याचा आरोप केला. प्रशासकांनी प्रत्यक्ष गावात भेट देऊन कारभाराची पाहणी करण्याची मागणीही त्यांनी केली.

# गांधीनगर व कवडीपूर परीसरात खुलेआम जुगार अड्डे सुरू,परिसरातील नागरिक त्रस्त

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. ४ :** वसंतनगर पोलिस स्टेशन हद्दीतील हाकेच्या अंतरावर असलेल्या गांधीनगर व कवडीपुर परिसरातील गंगानगर च्या बाजूला सुरू असलेल्या अवैध जुगार गेल्या अनेक दिवसापासून सुरू असून यावर कोणत्याही प्रकारची पोलीस प्रशासनाकडून कारवाई होत नसल्याची परिसरातील नागरिकाकडून आरोप करण्यात येत आहे.

याबाबत पोलिसांनी नुकतेच मटका,जुगार अड्ड्यांवर ता.०१ ऑक्टोबर २०२६ रोजी धडक कारवाई करुन या कारवाईत मामा चौक व वसंतनगर येथिल दोन वेगवेगळ्या ठिकाणावरुन ९ जुगाऱ्यांना ताब्यात घेऊन ४० हजार २००/ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. परंतु गांधीनगर मधील मोठ्या बिल्डिंगमध्ये लाखोचा जुगार सुरू असून तसेच कवडीपुर शिवारातील गंगानगर च्या बाजूला मोठ्या प्रमाणात शेजारच्या तालुक्यातून जुगार खेळण्यासाठी जुगार प्रेमी येत असल्याचे परिसरातील नागरिकाकडून सांगण्यात येत आहे, मात्र याकडे पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष कसे तसेच एलसीबी पुसद शाखा हे अनभिज्ञ कसे हा नागरिकाकडून प्रश्न उपस्थित केला जात आहे. वसंतनगर पोलीस स्टेशनला नुकत्याच आयपीएस अधिकारी राठोड मॅडम रूजू झाल्या आणि कारवाईचा धडाका सुरू केला आहे परंतु गांधी नगर व कवडीपूर परिसरातील जुगार अड्ड्यावर कारवाई कधी होणार? याकडे मात्र नागरिकाचे लक्ष लागले आहे.

# 'जलसेवा संकल्प'चा नारा प्रत्येक थेंब जपण्याची खरी कसोटी!

## कमी पावसाच्या पार्श्वभूमीवर यवतमाळात जलस्रोत संवर्धन व काटकसरीच्या वापराचे आवाहन



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ४ :** कमी पर्जन्यमानाच्या पार्श्वभूमीवर यवतमाळ जिल्ह्यात पाणी व्यवस्थापनाचा प्रश्न ऐरणीवर आला असताना 'जलसेवा संकल्प अभियान-२०२६'चा शुभारंभ गुरुवारी (२ ऑक्टोबर) बचत भवन येथे करण्यात आला.

महाराष्ट्र शासनाचा जलसंपदा विभाग, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आणि जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने २ ते १७ ऑक्टोबर दरम्यान हे अभियान राबविण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यक्रमाला जलसंपदा विभागाचे सेवानिवृत्त कार्यकारी संचालक रा. अ. काटपल्लीवार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी अनिकेत गाडेकर, प्रमोद यादविरकर आणि राहुल चव्हाण यांनी जलव्यवस्थापन, भूजल संवर्धन व शेतीतील पाण्याच्या कार्यक्षम वापराबाबत मार्गदर्शन केले. पाणी अडविणे, जलस्रोतांचे संवर्धन, भूजलपातळी टिकविणे आणि उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर यासाठी जनसहभाग वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे. 'पाणी वाचवा'चा संदेश केवळ अभियानापुरता न राहता प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याचे आव्हान आता प्रशासनासमोर आहे.

# लोक सहभागातून मांडवा येथे बांधण्यात आला वनराई बंधारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. ४ :** पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या मांडवा ग्रामपंचायत ही गेल्या अनेक दिवसांपासून मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अभियान, सेवा संकल्प अभियान अशा विविध अभियानच्या माध्यमातून लोकसहभाग व लोक चळवळीमधून मांडवा ग्रामपंचायतीने विविध उपक्रम राबविले सध्या दुष्काळ सदृश्य स्थिती लक्षात घेता.शिवारातील ओढ्यावरील डहो येथे वनराई बंधारा टाकला.

संततधार वाहणाऱ्या ओढ्यावरील डोहावर बंधारा टाकल्यामुळे भुजल पातळी वाढण्यास मदत होईल,गुराढोरांना तसेच इतर प्राण्यांना पाणी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ग्रामपंचायत प्रशासक तथा विस्तार अधिकारी संतोष डाखोरे,ग्रामपंचायत सचिव एस. टी.तडसे,पोलीस पाटील दत्तराव पुलाते, माजी सरपंच अल्का ढोले, माजी उपसरपंच विजय राठोड, तंटामुक्ती अध्यक्ष सुधाकर चव्हाण, सोसायटीचे उपाध्यक्ष वसंता आडे,बी. काळे वनरक्षक फुलवाडी बिट, एस.एस. देशमुख जवळा बिट,ए.व्ही. सोनुने वनरक्षक बिट सांडवा,कृषी सहाय्यक संगीता जाधव, डॉ. संदीप चव्हाण,रमेश ढोले, कैलास राठोड, विठ्ठल आडे, ग्रामपंचायत कर्मचारी प्रदुम्न आबाळे तथा इतर ग्रामस्थ मोठ्या संख्येने श्रमदानासाठी उपस्थित होते. या श्रमदानासाठी माजी उपसरपंच विजय राठोड व श्री सत्यसाई सेवा समिती पुसद यांनी प्रत्येकी दहा मिटर प्लॅस्टिक कापड दिले.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या बोअरबंदीला 'गायत्री'चा ठेंगा!

## बांगर नगर येथे बोरवेल खोदकाम,प्रशासनाच्या आदेशाची अंमलबजावणी कुठे?

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ४ :** यवतमाळ जिल्ह्यात भूजलपातळी झपाट्याने खालावत असल्याने आगामी उन्हाळ्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी जिल्हाधिकारी विकास मीना यांनी १ ऑक्टोबरपासून नवीन विहिरी व बोअरवेल खोदण्यावर निर्बंध लागू केले आहेत.

सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतापासून ५०० मीटरच्या परिसरात नवीन विहीर अथवा बोअरवेल खोदण्यास बंदी असताना यवतमाळ शहरातील नगर परिसरात गायत्री बोरवेलच्या माध्यमातून बांगर नगर येथे झांबड यांच्या घरी घरगुती वापरासाठी बोअर खोदण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाच्या अंमलबजावणीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार, पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत सुरक्षित ठेवण्यासाठी नवीन बोअरवेल खोदण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. आदेशाचे उल्लंघन झाल्यास बोअरवेल मशीन व संबंधित साहित्य जप्त करून भारतीय न्याय संहिता तसेच महाराष्ट्र भूजल कायद्यानुसार कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश आहेत. आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी महसूल, ग्रामविकास आणि पोलीस प्रशासनावर सोपविण्यात आली आहे. मात्र, नगर परिसरात संबंधित बोअरवेल मशीनच्या माध्यमातून खोदकाम सुरू असल्याचे छायाचित्रांवरून दिसून येत असून, नागरिकांच्या म्हणण्यानुसार याच परिसरात एकाच दिवशी दोन ठिकाणी बोअर खोदण्यात आल्या. प्रशासनाचा आदेश लागू झाल्यानंतरही अशा प्रकारे खोदकाम होत असल्याने नियम केवळ कागदावरच राहणार का, असा सवाल उपस्थित होत आहे. सामाजिक कार्यकर्त्यांनी या प्रकाराची तातडीने चौकशी करून संबंधित बोअरवेल कंपनीवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. बोअरवेल मशीनसह साहित्य जप्त करून आदेशाचा भंग करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. कारवाई न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाण्याचा प्रत्येक थेंब जपण्याचा आदेश असताना, निर्बंधांची अंमलबजावणी प्रत्यक्षात किती कठोर आहे, हे आता प्रशासनाच्या कारवाईवरून स्पष्ट होणार आहे.

# मित्र क्रीडा मंडळाच्या ३ खेळाडूंची जिल्हा संघात निवड

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**राळेगाव च्या शिरपेचात मानाचा तुरा..**




**राळेगाव, दि. ४ :** राळेगाव येथील मित्र क्रीडा मंडळ राळेगाव साठी अभिमानाची बातमी समोर आली आहे. मंडळाच्या तीन खेळाडूंची ५३ व्या ज्युनिअर राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेसाठी यवतमाळ जिल्हा संघात निवड झाली असून मित्र क्रीडा मंडळाच्यावतीने त्यांचे जोरदार अभिनंदन करण्यात आले आहे.

दर्शन विठ्ठलराव पोहणकर - ज्युनिअर यवतमाळ जिल्हा कबड्डी मुलांच्या संघात निवड. गायत्री दत्ताजी मरसकोल्हे - ५३ वी ज्युनिअर राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी यवतमाळ जिल्हा मुलींच्या संघात निवड. वेदिका किरणराव निम्मट - ५३ वी ज्युनिअर राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी यवतमाळ जिल्हा मुलींच्या संघात निवड. या तिन्ही खेळाडूंनी आपल्या मेहनतीच्या आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर ही निवड मिळवली आहे. ग्रामीण भागातून राज्यस्तरावर आपले नाव उंचावल्याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे. निवड झाल्याबद्दल मित्र क्रीडा मंडळ राळेगाव चे सचिन हुरकुंडे गजानन नाकाडे सुयोग ठाकरे रफिक शेख तसेच मंडळाच्या सर्व पदाधिकारी व खेळाडूंनी त्यांचे हार्दिक अभिनंदन केले असून पुढील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. या यशामुळे राळेगावच्या क्रीडा क्षेत्राला नवी उभारी मिळाली असून युवा खेळाडूंमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

# पाऊस थांबला; पैशाचे चक्रही मंदावले

## पिकांचे भवितव्य अधांतरी; मजुरी, दूध व्यवसाय, कृषी सेवा आणि गावच्या बाजारपेठेवर परिणाम



**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**
पावसाने दडी मारल्याने आता त्याची झळ केवळ शेतातील पिकांनाच नव्हे, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही बसू लागली आहे. जिल्ह्यासह तालुक्यात पावसाचा खंड वाढल्याने पिकांचे भवितव्य अधांतरी आले असून,शेतकऱ्यांनी शेतीवरील खर्चाला काही प्रमाणात लगाम घातला आहे. परिणामी शेतातून गावात फिरणारा पैशाचा प्रवाह मंदावला असून,मजुरी,दूध व्यवसाय,चारा विक्री, कृषी सेवा, ट्रॅक्टरची कामे आणि किरकोळ बाजारपेठेवर त्याचा परिणाम जाणवू लागला आहे.

ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार शेती असल्याने पिकातून मिळणारा पैसा मजुरी, किराणा, दूध,चारा,शेतीची अवजारे आणि विविध सेवांमध्ये फिरत असतो. मात्र, पावसाचा खंड वाढल्याने या आर्थिक साखळीवर परिणाम झाला आहे. पिकांची वाढ आणि उत्पादनाबाबत अनिश्चितता असल्याने शेतकरी गरजेपुरताच खर्च करीत असून, अनेक कामे पुढे ढकलत आहेत.

### मजुरीच्या कामांवरही परिणाम

शेतीची कामे कमी झाल्याने शेतमजुरांना रोजगाराच्या संधी कमी होत आहेत.दुसरीकडे पावसाअभावी हिरवा चारा कमी झाल्याने पशुपालकांसमोरही अडचणी वाढल्या आहेत. विकतचा चारा घेण्याची वेळ आल्याने खर्च वाढत असून,दूध उत्पादनावरही परिणाम होण्याची चिंता आहे.ट्रॅक्टर,मशागत यंत्रे,कृषी सेवा केंद्रे तसेच बियाणे, खते व कीटकनाशक विक्रेत्यांनाही शेतकऱ्यांच्या मर्यादित खरेदीचा फटका बसत आहे.गरजेपुरतीच खरेदी करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे.

### संकटांची साखळी कायम

पावसाचा खंड आणखी वाढल्यास त्याचा परिणाम केवळ पिकांपुरता मर्यादित न राहता रोजगार, खरेदी-विक्री आणि ग्रामीण बाजारपेठेच्या उलाढालीवरही होण्याची शक्यता आहे. त्यामुळे गावकऱ्यांच्या नजरा आता केवळ पावसाकडेच नव्हे, तर शेतातून पुन्हा सुरू होणाऱ्या पैशाच्या प्रवाहाकडेही लागल्या आहेत.

> 'शेतीवरच गावातील बहुतांश व्यवहार अवलंबून आहेत. सध्या ग्राहकांची खरेदी सुरू आहे; मात्र पूर्वीच्या तुलनेत रोख व्यवहार कमी आणि उधारी वाढली आहे.शेतकऱ्यांच्या हातात पैसा आला की गावातील बाजारपेठेला पुन्हा चालना मिळेल.'
> **विक्रम कोळसकर,** किराणा व्यवसायिक आसेगाव पूर्णा
>
> 'पावसाचा खंड वाढल्याने पिकांची अवस्था चिंताजनक आहे. उत्पादनाची खात्री नसल्याने पुढील खर्च करताना विचार करावा लागत आहे. शेतीतून पैसा मिळाला नाही तर घरखर्चासह गावातील इतर व्यवहारांवरही परिणाम होतो.'
> **योगेश इंगळे,** शेतकरी टाकरखेडा पूर्णा

# सुवर्णकन्या कुमकुम मोहोडसह आंतरराष्ट्रीय खेळाडूंचे आज स्वागत

**अमरावती/का.प्र.**
जपानमधील ऐची-नागोया येथे आयोजित २०व्या आशियाई क्रीडा स्पर्धेत आंतरराष्ट्रीय स्तरावर अमरावतीसह देशाचे नाव उज्ज्वल करणाऱ्या खेळाडूंचा गौरव करण्यासाठी अमरावती शहरात भव्य स्वागत रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. ही रॅली सोमवार,५ ऑक्टोबर रोजी सकाळी ८.३० वाजता राजकमल चौकातून सुरू होणार आहे.या स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अमरावतीच्या कुमकुम मोहोड हिने धनुर्विद्या रिकर्व्ह प्रकारात दोन सुवर्ण व एक रौप्य पदक, भारती फुलमाळी हिने क्रिकेटमध्ये सुवर्णपदक, तर यशदिप भोगे याने धनुर्विद्या कंपाऊंड प्रकारात रौप्यपदक मिळवून अमरावतीचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर झळकविले आहे. या खेळाडूंच्या सन्मानार्थ मान्यवरांच्या हस्ते सत्कार कार्यक्रम तसेच शहरातून भव्य स्वागत रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. राजकमल चौक ते विभागीय क्रीडा संकुल, मोर्शी रोड, अमरावती या मार्गाने ही स्वागत रॅली काढण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती, क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे, उपसंचालक क्रीडा व युवक सेवा अमरावती विभाग, जिल्हा क्रीडा अधिकारी अमरावती, महाराष्ट्र धनुर्विद्या संघटना, अमरावती जिल्ह्यातील विविध एकविध खेळ संघटना, शाळा व महाविद्यालये यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अमरावतीतील सर्व क्रीडाप्रेमी, नागरिक, खेळाडू, विद्यार्थी आणि पुरस्कारप्राप्त खेळाडूंनी सकाळी ८.३० वाजता राजकमल चौक येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहून आंतरराष्ट्रीय खेळाडूंच्या सन्मान सोहळ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासन अमरावती तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. गणेश जाधव यांनी केले आहे.

## संक्षिप्त



### भारतीय महाविद्यालय येथे स्वच्छता मोहीम व विविध कार्यक्रम

**मोशी-**भारतीय महाविद्यालय, मोर्शी येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती, आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन तसेच भारताचे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांची जयंती अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष आगरकर होते, तर मुख्य मार्गदर्शक म्हणून राज्यशास्त्र विभागाचे प्राध्यापक सुरेंद्र पांडे उपस्थित होते. या संपूर्ण कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्र सेनेच्या स्वयंसेवकांनी व कॅडेट्सने अत्यंत सक्रिय आणि पूर्णपणे सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे आयोजन व संचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.गोपाल भलावी यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी महाविद्यालयाची विद्यार्थिनी गायत्री सरोटे हिने उपस्थितांचे आभार मानले. या प्रसंगी वरिष्ठ महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक डॉ.शिरीष टोपर, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.काळे, डॉ.संदीप राऊत, तसेच कार्यालयीन कर्मचारी रुपेश मेश्राम यांच्यासह वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### स्कॉलर पॉईंट इंग्लिश स्कूलमध्ये गांधी जयंती

**मोर्शी-**येथील स्कॉलर पॉइंट इंग्लिश स्कूलमध्ये महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांचे जयंती साजरी करण्यात आली. शाळेच्या मुख्याध्यापिका उमाळे यांनी महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या फोटोचे पूजन व हारार्पण केले, तसेच मुलांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवन कार्यावर भाषण दिले. त्यात वीरा निशांत, श्रीयान कोहळे, नैतिक माणिकपुरे, श्रीयान ठाकरे या चिमुकल्यांनी छान भाषण दिले. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती आखरे व श्रीमती ठाकरे यांनी केले. सर्व शिक्षकांनी कार्यक्रमाला सहकार्य केले.

# सामाजिक पोस्टवरून भाजप गट नेत्याचा धमकीवजा इशारा

## भाकपचे कॉ.सतीश चौधरी यांची पोलिसात तक्रार, चांदूर रेल्वेत सर्वपक्षीय नेत्यांची संयुक्त पत्रकार परिषद



**चांदूर रेल्वे/वार्ताहर**
भारतीय कमुनिष्ट पक्षाचे तालुका सचिव सतीश चौधरी यांनी मराठी तालुका पत्रकार संघाच्या एका व्हाटएप्प ग्रुप वर डॉ.प्रज्ञावंत देवळेकर यांच्या ब्लॉगवरील एक समाजिक लेख पोस्ट केला होता. ह्या पोस्टला घेऊन शहरातील वातावरण चांगलेच तापले असून शहरातील काही राजकीय व्यक्ती ह्या पोस्टवरून शहरात धमकी व दबावाचे राजकारण सुरू केल्याचा आरोप करत विविध राजकीय पक्ष व संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी स्व. प्रा. शिवदास उटाणे स्मृती सभागृह, पंचायत समिती सभागृह, चांदूर रेल्वे येथे संयुक्त पत्रकार आयोजित केली होती. धमकीचा इशारा देणाऱ्या राजकीय व्यक्तिमध्ये भाजप चे नगरसेवक तथा गटनेते निलेश उर्फ पप्पू भालेराव यांचेंकडून मोबाईल वरून धमकीचा इशारा देण्यात आल्याचे चौधरी यांचे म्हणणे आहे.भालेराव यांच्या धमकीला हरिदास चुकेकर यांनी तसेच आशु. धमकीला दुजोरा दिल्याचे सुध्दा चौधरी ह्यांचे म्हणने आहे. मोबाईलवरून धमकीवजा इशारे देण्यात आल्याप्रकरणी संबंधितांचे मोबाईल स्क्रीनशॉट घेऊन चांदूर रेल्वे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्याचे सुध्दा त्यांनी ह्यावेळी सांगितले.

'विचारांची लढाई विचारांनी लढली पाहिजे; मात्र धमकीची भाषा व दबावात्मक तंत्राचा वापर करून खालच्या पातळीवर जाऊन जातीय रंग देऊन व धार्मिक तेढ निर्माण करून शहराचे वातावरण मलिन करण्याचे काम करणे सुरू असून ही बाब चिंताजनक आहे,' शहरातील राजकीय व सामाजिक स्थिती बिघडू नये तसेच शहरात अराजकता निर्माण करणाऱ्या शक्तींवर आळा बसाव.यासंदर्भात जिल्हाधिकारी, अमरावती आणि पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण यांच्याकडे सुध्दा तक्रार दाखल करणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले आहे.

आयोजित पत्रकार परिषदेला कॅम्युनिस्ट पक्षाचे सतीश चौधरी, प्रा प्रसेनजित तेलंग,विनोद जोशी,भूषण नाचवणकर, नगरसेवक सुमेध सरदार,सागर दुर्योधन,भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अमोल होले,श्रीनिवास सूर्यवंशी,.शिवसेना (ऊबाठा) चे बंडू यादव,गजानन यादव,आम आदमी पक्षाचे नितीन गवळी,मेहमूदभाई हुसैन,जनता दल (सेक्युलर) चे प्रभाकर भगत क्रांतिकारी शेतकरी संघटना प्रशांत शिरभाते, डॉ पांडुरंगजी ढोले विचार मंच डॉ क्रांतिसागर ढोले,मार्क्स वादी कम्युनिस्ट पक्षाचो देवीदासजी राऊत,राष्ट्रवादी कॉंग्रेस (शप) अमोल दुधाट ही मंडळी उपस्थित होती.

# 'सेवा संकल्प अभियान'तून पूर्णानगर विसर्जन घाटाची स्वच्छता

## आसेगाव पूर्णा पोलिसांचा सामाजिक उपक्रम



**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**
गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पूर्णा नदीतील पूर्णानगर विसर्जन घाटावर साचलेला कचरा व अस्वच्छता दूर करण्यासाठी आसेगाव पूर्णा पोलीस ठाण्याच्या वतीने शनिवारी, ३ ऑक्टोबर रोजी सकाळी 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

गणेश विसर्जनानंतर विसर्जन घाटावर निर्माल्य, प्लास्टिक व इतर कचरा मोठ्या प्रमाणात साचला होता. त्यामुळे नदीघाट परिसरात अस्वच्छता निर्माण झाली होती. ही बाब लक्षात घेऊन पोलिसांनी सामाजिक बांधिलकी जपत स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला.

पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वतः पुढाकार घेत घाट परिसरातील कचरा गोळा करून परिसर स्वच्छ केला.

या स्वच्छता मोहिमेत एसडीपीओ कुलकर्णी, परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक वैशाली भोये, एपीआय सतीश खेडेकर यांच्यासह पोलीस कर्मचारी सुनील केवतकर,सलीम, सचिन सालफळे, विजय गायकवाड, प्रमोद इंगळे, नागराज स्वामी, भूषण चंदेल, प्रफुल सहारे, अरविंद केराम, संभाजी टिपरे, पंकज गावंडे, गुल्हाने साहेब,पेंदाम, अंकुश टाले, रुपेश घोळकर आदी सहभागी झाले. पूर्णानगर येथील गजूजी ठाकूर यांच्यासह कर्मचारी वर्गानेही सहकार्य केले. गणेशोत्सवाच्या काळात कायदा व सुव्यवस्थेसोबतच पर्यावरण आणि स्वच्छतेची जबाबदारीही जपण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. पोलिसांच्या या सामाजिक उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.

# जिल्हा व्हॉलीबॉल स्पर्धेत सीताबाई संगई कन्या शाळेचे वर्चस्व



**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**
महाराष्ट्र शासन क्रीडा युवा सेवा संचालनालय, जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा ०३ ऑक्टोंबर २०२६ रोजी जिल्हा क्रीडा कार्यालय अमरावती येथे झाल्या. त्या स्पर्धेमध्ये सीताबाई संगई कन्या शाळेच्या १९ वर्षा आतील मुलींनी दमदार कामगिरी करत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले आणि विजयी संघांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

या स्पर्धेत जिल्ह्यातील आठ संघानी सहभाग घेतला होता. अत्यंत चुरशीच्या आणि उत्साहपूर्ण वातावरणात झालेल्या सामन्यांमध्ये वरुड, अमरावती, चांदूरबाजार, चांदूर रेल्वे अशा संघांचा पराभव करत सीताबाई संगई कन्या शाळेच्या खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक खेळ, अचूक निर्णयक्षमता, चपळता आणि प्रभावी बचावाचे प्रदर्शन करीत प्रतिस्पर्धी संघांवर मात केली. १९ वर्षांखालील संघाने आपल्या उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत विजेतेपदावर मोहोर उमटवली. या संघात कु.लक्ष्मी चौरे, स्वरा भेलांडे, आस्था येऊल, सृष्टी बहिरे, मैथिली पटेल, वेदिका मलंगे, भाविका जाधव, शर्वरी धर्मे, जान्हवी गीते,अनुष्का देशमुख, स्वरा फुलंबरकर, ईश्वरी पवार या विद्यार्थिनींचा समावेश होता. संघाने जिल्हास्तरावर मिळविलेले हे यश शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील सातत्यपूर्ण कामगिरीची पावती मानली जात आहे.१९ वर्षांखालील संघाची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाल्याने शाळेच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.वरील सर्व यशस्वी खेळाडूंच्या उल्लेखनीय यशाबद्दल सीताबाई संगई एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ.उल्हास संगई, उपाध्यक्ष भरत संगई व विवेक संगई, सचिव प्रसाद संगई, सहसचिव प्रसन्न संगई व अजय संगई, कार्यकारिणी सदस्य अविनाश संगई व आशिष संगई तसेच सर्व संचालकगण, शाळेच्या मुख्याध्यापिका नीलिमा सांगोळे व पर्यवेक्षक अमोल डहाळे यांनी विजेत्या खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन केले.वरील यशस्वी खेळाडूंना शारीरिक शिक्षण शिक्षक समाधान शेटफळकर यांचे मार्गदर्शन लाभले.तसेच वरील सर्वांनी विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# पावसाळा संपला; नदी-नाले कोरडेच विहिरींची पाणीपातळीही 'जैसे थे'

**कुऱ्हा/वार्ताहर**
यंदाचा पावसाळा संपला असतानाही परिसरातील नदी-नाले अद्याप कोरडेच असल्याचे चित्र दिसून येत आहे. अपेक्षित पाऊस न झाल्याने जलसाठ्यांमध्ये पुरेशी वाढ झालेली नाही. विशेष म्हणजे, या वर्षी पावसाळ्यात अल्प प्रमाणात पाऊस आल्याने अनेक विहिरींच्या पाणीपातळीत अपेक्षित वाढ झालेली नसल्याने आगामी उन्हाळ्यात पाणीटंचाईचे संकट निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

पावसाळ्याच्या सुरुवातीला शेतकऱ्यांना दिलासा मिळाला होता. मात्र त्यानंतर पावसाने सातत्य राखले नाही. परिणामी नदी, नाले, ओढे तसेच लहान-मोठे जलसाठे कोरडेच असून काही ठिकाणी नदीपात्रात पाणी साचलेले असले, तरी त्याचा प्रवाह अल्पकाळच राहिला. त्यामुळे भूजलपातळीतही अपेक्षित वाढ झालेली नाही. परिसरातील अनेक विहिरींमध्ये सध्या तळाला पाणी असल्याचे दिसून येत आहे. पावसाळ्यानंतर विहिरींची पाणीपातळी वाढेल आणि उन्हाळ्यातील पाण्याची गरज भागविण्यास मदत होईल, अशी अपेक्षा होती.

पिण्याच्या पाण्यासोबतच शेतीच्या सिंचनाचा प्रश्नही आगामी काळात गंभीर होण्याची शक्यता आहे. रब्बी हंगामातील पिकांना तसेच उन्हाळी पिकांना पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांना विहिरी, बोअरवेल आणि उपलब्ध जलसाठ्यांवर अवलंबून राहावे लागणार आहे.

# देविदास रेवसे यांचे निधन



**अंजनगाव सुर्जी-**तालुक्यातील टाकरखेडा मोरे येथील रहिवासी तथा राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे अंजनगाव सुर्जी तालुकाध्यक्ष डॉ. प्रमोद रेवसे यांचे वडील स्व. देविदास किसन रेवसे (वय ७७) यांचे शनिवार,३ ऑक्टोबर रोजी दुपारी १.३० वाजता वृद्धापकाळाने निधन झाले.त्यांच्या पश्चात दोन मुले डॉ. प्रमोद रेवसे व विनोद रेवसे, सुना, नातवंडे असा परिवार आहे.त्यांच्यावर रविवार,४ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता टाकरखेडा मोरे येथील त्यांच्या राहत्या घरून हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.स्व. देविदास रेवसे यांच्या निधनाबद्दल राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी दुःख व्यक्त करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

# संघटन मजबूत करण्यासाठी कार्यकर्त्यांनी सज्ज व्हावे-विजय कोंबे

## विभागातील पदाधिकारी व सभासदांचा उत्स्फूर्त सहभाग



**अमरावती/का.प्र.**
शिक्षकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष करताना संघटनेची वैचारिक आणि संघटनात्मक ताकद अधिक भक्कम करण्याची गरज आहे. बदलत्या शैक्षणिक परिस्थितीत शिक्षकांसमोरील आव्हाने वाढत असून, या आव्हानांना प्रभावीपणे सामोरे जाण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने संघटनेची ध्येयधोरणे समजून घेऊन सक्रियपणे कार्य करावे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे यांनी केले. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती ४४८/६४, पुणे यांच्या वतीने आयोजित अमरावती विभागीय कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर सहकार भवन, यवतमाळ येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. यावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.यवतमाळ, अमरावती, अकोला, बुलढाणा आणि वाशिम या पाच जिल्ह्यांतील जिल्हा व विभागीय पदाधिकारी, तालुका पदाधिकारी आणि शिक्षक समितीच्या सभासदांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

शिबिरात राज्य नेते उदय शिंदे यांनी 'संघटना बांधणी व शिक्षकांसमोरील आव्हाने' या विषयावर अत्यंत प्रभावी व सखोल मार्गदर्शन केले. डॉ. प्रशांत गावंडे यांनी 'शिक्षण : काल, आज आणि उद्या' या विषयावर मार्गदर्शन करताना शिक्षण क्षेत्रात झपाट्याने होत असलेले बदल, त्यांचा शिक्षक व विद्यार्थ्यांवर होणारा परिणाम आणि भविष्यातील शैक्षणिक आव्हाने यावर सविस्तर भाष्य केले.राजन कोरगावकर यांनी 'अशी घडली शिक्षक समिती' या विषयातून शिक्षक समितीच्या आजवरच्या वाटचालीचा इतिहास आणि संघर्षमय प्रवास उलगडून सांगितला. शिबिराला माजी राज्य सरचिटणीस बाबासाहेब कपिले, राज्य कार्याध्यक्ष सयाजी पाटील, राज्य उपाध्यक्ष आनंदा कांदळकर, राजन सावंत, विशाल कुंटेकुरे, नंदकुमार होळकर, महिला राज्य आघाडी प्रमुख वर्षाताई केनवडे, नानासाहेब नाकाडे, गोकुळदास राऊत (अध्यक्ष, अमरावती शिक्षक बँक), राजेश सावरकर (राज्य प्रसिद्धी प्रमुख), विशाल कणसे (अध्यक्ष, शिक्षक बँक सातारा) आणि प्रफुल्ल पुंडकर (राज्य प्रमुख, जुनी पेन्शन आघाडी)कवाळे शिवाजी - विभागीय सिरचिटणीस - छत्रपती संभाजीनगर बदोलें महेश - कार्याध्यक्ष -समिती उमरगा मुळे नागनाथ -संचालक शिक्षक पतसंस्था उमरगा कोळी विजयकुमार -संचालक शिक्षक पतसंस्था उमरगा यांच्यासह महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यांतील शिक्षक समितीचे राज्य पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमरावती विभागीय अध्यक्ष गोपाल सुरे यांनी केले. कुमुद डाखोळे यांनी प्रभावी सूत्रसंचालन केले, तर यवतमाळ जिल्हा सरचिटणीस संजय काळे यांनी आभार मानले.

कार्यक्रम यशस्वी सतिश सागळे, करण्याकरीता यवतमाळचे संदीप मोहाडे,महेश सोनेकर,अर्चना भरकाडे,प्रविणा कोल्हे, मुकेश भोयर,संजय काळे, अजयानंद पवार,शैलेश दहातोंडे,राजेश देशमुख, प्रशांत आकोत, विनोद घुगे, राजु महाले, प्रविण बाहेकर,सुनिल मगर पाचही जिल्ह्यांतील शिक्षक समितीच्या पदाधिकारी व सभासदांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे प्रशिक्षण शिबिराला व्यापक प्रतिसाद मिळाला. कार्यकर्त्यांना संघटनात्मक कार्याची दिशा, शिक्षकांच्या सेवाविषयक प्रश्नांची माहिती,शैक्षणिक क्षेत्रातील बदलांचे आकलन आणि परस्पर विचारविनिमयाची संधी या शिबिरातून मिळाली.शिक्षकांच्या प्रश्नांसाठी संघटनात्मक एकजूट अधिक मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त करत हे प्रशिक्षण शिबीर उत्साहात झाले.

# शिक्षणाचे खासगीकरण कंपनीकरणाच्या दिशेने

**भा**रतात जागतिकीकरण, खासगीकरण आणि उदारीकरण धोरण येण्यापूर्वीच शिक्षणाच्या खासगीकरणाची सुरुवात झाली होती. त्यानंतर तिचा वेग वाढविण्यात आला. शिवाय बिर्ला-अंबानी रिपोर्टनंतर तर हा वेग शंभर पटीने वाढला. कोरोनोत्तर काळात शिक्षणाची सूत्रे डिजिटल माध्यमांच्या हवाली करण्यात आल्याचे आपण पाहत आहोत. कोरोनाच्या मार्च २०२० नंतरच्या काळात डिजिटल सेवा देणाऱ्या गुगल, यूट्यूब, झूम यांसारख्या शेकडो ॲप्स कंपन्यांच्या नफ्यात किती वाढ झाली हे पाहिले, तरी शिक्षणाचे कंपनीकरण कशाप्रकारे करण्यात आले, हे ध्यानात येईल.

एकेकाळच्या सधन शेतकऱ्याची जमीन कवडीमोल भावात विकायला बाध्य करून शेतीशिवाय शेतकरी हे धोरण राबवून शेतकऱ्याला मजुरामध्ये रूपांतरित केले जात आहे, त्याचप्रकारे शिक्षकांशिवाय शाळा आणि शिक्षकांशिवाय शिक्षण ही कल्पना भविष्यात आणली जात आहे. जमीन, पाणी या नैसर्गिक साधनसंपत्तीचे खासगीकरण करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे आरोग्य आणि शिक्षणाचे कंपनीकरण करण्यात येत आहे. त्यामधून 'शिक्षक' पूर्णत: बाद होऊन तो उच्चशिक्षित बेरोजगार



ठरणार आहे, नव्हे ठरला आहे. अनेक कंत्राटी प्राध्यापक जे पीएच.डी. आहेत, ते मजुरी किंवा इतर लहान कामे करीत आहेत. म्हणजे ही शिक्षकाला हमाल बनविणारी व्यवस्था आहे. पीएच.डी.पर्यंतचे सर्वोच्च शिक्षण होऊनही बेरोजगार राहण्याचा प्रसंग जर येत असेल तर ही समाजव्यवस्था शिक्षीत व्यक्तीकडे कशाप्रकारे पाहते, हे लक्षात येईल.

कोरोनोत्तर काळात शाळा-महाविद्यालय बंद झाल्याने लॅपटॉप आणि मोबाईलच्या विक्रीत प्रचंड वाढ झाली. आता विद्यार्थी 'मोनोफोबिया'च्या आहारी गेल्याने महाविद्यालयातील उपस्थिती फार कमी झाली आहे. बलाढ्य बहुराष्ट्रीय कंपन्यांनी यानिमित्ताने आपली सर्व उत्पादने विकून प्रचंड कमाई केली. विविध ॲप्लिकेशन विद्यार्थ्यांचे गुरू तर गुगल महागुरू बनले आहे. या सर्व प्रक्रियेतून आपल्या इथला विनाअनुदानित, कंत्राटी, तासिकातत्त्वावरील अर्धवेळ शिक्षक उदध्वस्त झाला आहे, त्याकडे अजूनही ना सरकारचे लक्ष आहे ना समाजाचे. भविष्यात शिक्षकांशिवाय आणि शाळेशिवाय शिक्षण ही कल्पना प्रत्यक्षात उतरल्यास नवल वाटायला नको. आताची कर्मचारी कंत्राटीकरण आणि शाळा दत्तक योजना या धोरणाचा एक भाग आहे. खासगीकरण आणि कंत्राटीकरण केल्याने आपोआपच आरक्षणाचे तत्त्व बाद केले जाते. याबाबतची एक आकडेवारी अतिशय महत्त्वाची आहे. केंद्रीय विद्यापीठ एकूण ९,६७५ जागा रिक्त असून त्यामध्ये अनुसूचित जातीच्या २८४७, अनुसूचित जमातीच्या १६८६, तर इतर मागासर्गीयाच्या ५१४२ जागा रिक्त आहेत.

**ज्ञानाकडे जाण्यासाठी आवश्यक असणारी शिक्षण व्यवस्था जोपर्यंत निर्माण होत नाही तोपर्यंत समाजसुधारकांचे स्वप्न वास्तवात येण्याची शक्यता दिसत नाही, पण त्यासाठी समाजाने मोफत आणि दर्जेदार शिक्षणाचा आग्रह धरला पाहिजे...**

यामध्ये राज्य सरकारद्वारे स्थापित विद्यापीठांची आकडेवारी नाही, त्यामध्येही हजारो प्राध्यापकांची पदे रिक्त आहेत. एकीकडे हजारो पदे रिक्त असूनही भरली जात नाहीत, तर दुसरीकडे उच्चशिक्षित तरुण अर्धवेळ नोकरी तर अर्धवेळ हमाली करीत आहेत.याला खासगीकरण आणि कंत्राटीकरणाचे धोरण कारणीभूत आहे. शिक्षण हे केवळ लिहिणे-वाचणे नसून शिक्षक आपल्या अनुभवांच्या द्वारे पुस्तकातील उदाहरणे समजावून सांगत असतो. विद्यार्थी-शिक्षक परस्पर संवादातून शिक्षणाची प्रक्रिया घडत असते, परंतु बहुधा शासनाला शिक्षकांशिवाय शिक्षण प्रक्रिया पूर्ण करून महासत्ता होता येते, असे वाटत असावे.

**खासगीकरणाचे समर्थक - प्रत्यक्षात सरकारी लाभधारक**

ज्या-ज्या व्यक्ती किंवा संघटना खासगीकरणाचे समर्थन करून सरकारी संस्थांना दूषणे देत असतात; परंतु प्रत्यक्षात त्यांचीच मुले शासकीय अनुदानावर चालणाऱ्या IIT, IIM व इतर उत्कृष्ट शिक्षण संस्थांमधून शिकत असतात. खासगीकरणाचे समर्थन करीत असताना प्रत्यक्षात सर्व सरकारी लाभ आपल्या पदरात पाडून घेत असतात. IIT, IIM यांसारख्या शिक्षण संस्थांमधून आतापर्यंत शिकून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांची जात, धर्म आणि आर्थिक स्थिती तपासली तरी आपल्या सहज ध्यानात येईल की आपल्या देशातील प्रमुख आठ शहरातून हे विद्यार्थी या संस्थांमध्ये येतात, ते बहुधा उच्च जातीय आणि उच्चभ्रू कुटुंबातील असतात आणि यातले बहुतेक शासकीय संस्थांना दूषणे देणारे असतात. यामध्ये आपल्या लहान शहरातील, खेड्यापाड्यातील विद्यार्थी कुठे आहे? तो तर अजूनही शाळांमधील खिचडीत व्यस्त आहे.

जगात तंत्रज्ञानाने परिपूर्ण असलेले जपान, दक्षिण कोरिया यांसारखे देश विज्ञान व तंत्रज्ञानाच्या शिक्षणाबरोबरच भाषा, कला, साहित्य, संस्कृती याच्या शिक्षणावर भर देतात. दक्षिण कोरियाने तर 'मानवतावादी शिक्षण' हे आपले उद्दिष्ट ठेवले आहे. चीनने २००६ पासून शिक्षण संपूर्णपणे मोफत करतानाच सर्व विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके देण्याची सुरुवात केली.

मानव विकास निर्देशांकात (२०२०) १८९ देशांमध्ये भारताचा क्रमांक १३१ वा आहे. या यादीत नार्वे क्रमांक एकचा देश ठरला आहे. शिवाय जगातील ४७ देशांतील १०० सर्वोत्कृष्ट विद्यापीठांच्या यादीत चीनची सर्वाधिक ३० विद्यापीठे समाविष्ट आहेत. या यादीत भारतातील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, आयआयटीचा समावेश आहे. या संस्था सार्वजनिक संस्था आहेत.

आपण आपला गौरव करताना भारताला कृषिप्रधान देश असे म्हणतो, परंतु कृषी शिक्षणाबाबतची अनास्था प्रचंड उद्विग्न करणारी आहे. कृषी शिक्षणाबाबतच्या जागतिक सर्वोत्कृष्ट विद्यापीठ व शिक्षण संस्थांमध्ये भारतातील एकही शिक्षण संस्था नाही. नेदरलँडमधील वेगनजेन युनिव्हर्सिटी ज्याची स्थापना १९१८ मध्ये झाली, ते जगातील सर्वोत्कृष्ट कृषी विद्यापीठ आहे. २०२१ सालाच्या जगातील सर्वोत्कृष्ट आर्किटेक्चर शिक्षण देणाऱ्या विद्यापीठामध्ये युनिव्हर्सिटी कॉलेज लंडन (यूसीएल) हे जगातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठ असून हे सार्वजनिक संशोधन विद्यापीठ आहे. या विद्यापीठातील शिक्षणांसाठी अतिशय कमी शुल्क आकारले जाते. जर्मनीमध्ये तर पीएच.डी.पर्यंतचे सर्व शिक्षण मोफत आहे. म्हणजेच जगातील आणि भारतातील सुद्धा सर्वोत्कृष्ट शिक्षण संस्थांमध्ये सरकारी सार्वजनिक संस्थाच सर्वोत्कृष्ट ठरल्या आहेत. तरीसुद्धा खासगीकरणाचे गोडवे गायले जात असतात आणि सरकारी संस्थांना दूषणे दिली जात असतात.

उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात भारताचे सकल नोंदणीचे प्रमाण केवळ १७ टक्के एवढेच आहे. जपानमध्ये हे प्रमाण ५५ टक्के आहे. आज जपानची लोकसंख्या १५ कोटी आहे आणि तिथे सात हजारांपेक्षा अधिक विद्यापीठे आहेत. अमेरिकेची लोकसंख्या ३० कोटींच्या आसपास आहे आणि तिथे १५ हजारांपेक्षा अधिक विद्यापीठे आहेत. भारतात १२० कोटी लोकसंख्या असून आपल्याकडील विद्यापीठांची संख्या एक हजाराच्यावर नाही. त्यापैकी ज्या संख्या किंवा विद्यापीठे उत्कृष्ट श्रेणीमध्ये येतात ती एकतर सार्वजनिक स्वरूपाची आहेत किंवा शासकीय अनुदानपात्र आहेत. याउलट खासगी संस्था केवळ संचालकांच्या आर्थिक उत्पन्नाचा स्रोत बनल्या आहेत.

आपल्या सर्व विचारवंत, समाजचिंतकांनी ज्ञानाधारित समाजाची उभारणी करण्यासाठी अथक प्रयत्न केले. शिक्षण म्हणजे केवळ पोपटपंची किंवा कागदाची भेंडोळी नव्हे, तर वैज्ञानिक दृष्टिकोन आणि तर्कबुद्धी निर्माण होण्यासाठीची पहिली पायरी होय. ज्ञानाकडे जाण्यासाठी आवश्यक असणारी शिक्षण व्यवस्था जोपर्यंत निर्माण होत नाही तोपर्यंत समाजसुधारकांचे स्वप्न वास्तवात येण्याची शक्यता दिसत नाही, पण त्यासाठी समाजाने मोफत आणि दर्जेदार शिक्षणाचा आग्रह धरला पाहिजे, हे नक्कीच!

**-डॉ. प्रवीण बनसोड**

# सुवर्ण विजेत्यांची संघर्ष गाथा

**क्री**डा स्पर्धेत सुवर्णपदक मिळवताना क्षणभर सगळे सोपे वाटते; पण त्या एका क्षणामागे अनेक वर्षांचा घाम, अश्रू आणि त्याग दडलेला असतो. नीरू धांडासाठी टिनचे डबे लक्ष्य होते, तर साताऱ्याच्या साहिल जाधवसाठी आईने आपले दागिने विकून घेतलेले धनुष्य स्वप्नाचे साधन ठरले.पदकांची नव्हे, तर परिस्थितीला हरवून स्वप्न प्रत्यक्षात साकारणाऱ्या या जिगरबाज खेळाडूंची!

आयची-नागोया आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने ३० सप्टेंबरअखेर १० सुवर्ण, २१ रौप्य आणि २९ कांस्य अशी ६० पदकांची कमाई केली आहे. विशेष म्हणजे या १० सुवर्णपदकांमध्ये क्रिकेट, कबड्डी, नेमबाजी, ॲथलेटिक्स आणि तिरंदाजी अशा वेगवेगळ्या खेळांचा समावेश आहे.

**टिनच्या डब्यांपासून आशियाई सुवर्णापर्यंत...**

हरियाणाच्या जींदमधील नीरू धांडा हिची कहाणी एखाद्या चित्रपटाच्या पटकथेलाही मागे टाकणारी आहे. शूटिंगसारख्या महागड्या खेळासाठी ना महागडी बंदूक, ना आधुनिक शूटिंग रेंज. सुरुवातीला कुटुंबाच्या डबल बॅरल बंदुकीने ती टिनच्या डब्यांवर निशाणा साधायची. नंतर चुलत भाऊ लक्ष्य श्योराणची बंदूक तिला मिळाली. याच साध्या सुरुवातीने पुढे तिला आशियाई क्रीडा स्पर्धेच्या इतिहासात नेले.

महिलांच्या ट्रॅपच्या अंतिम फेरीत ३० पैकी २८ अचूक निशाणे साधत नीरूने सुवर्ण जिंकले आणि आशियाई विक्रमही मोडला. त्यानंतर काइनान चेनाईसोबत मिश्र ट्रॅपमध्येही तिने आणखी एक सुवर्ण मिळवले. म्हणजेच टिनच्या डब्यांवर साधलेला तो पहिला निशाणा आता आशियाई सुवर्णावर पोहोचला आहे.

साताऱ्याचा साहिल जाधव हा भारताच्या तिरंदाजीतील सुवर्णकथेचा आणखी एक भावनिक अध्याय. कोरोना काळात वडिलांची नोकरी गेल्यानंतर कुटुंबासमोर आर्थिक अडचणी उभ्या राहिल्या. साहिलच्या स्वप्नासाठी त्याच्या आईने स्वतःचे दागिने विकून कंपाऊंड बो घेतले. त्या धनुष्याने आज भारतासाठी आशियाई सुवर्ण जिंकले आहे.

चिकिथा तानिपार्थीची कहाणीही तितकीच प्रेरणादायी. तिच्या वडिलांनी मुलीच्या तिरंदाजीच्या स्वप्नासाठी कुटुंबाचे भाताचे शेत गहाण ठेवले आणि कर्ज घेतले. या त्यागातून उभ्या राहिलेल्या चिकिथाने ज्योती सुरेखा वेन्नम आणि पृथिका प्रदीपसोबत महिला कंपाऊंड सांघिक सुवर्ण जिंकले. त्यानंतर साहिलसोबत मिश्र सांघिक सुवर्णही मिळवले. पुरुषांच्या सांघिक स्पर्धेत साहिल, गणेश मणी रत्नम थिरुमुरू आणि कुशल दलाल यांनीही सुवर्णावर नाव कोरले.

**चार मुली, चार संघष...एकच सुवर्ण!**

महिलांच्या ४ बाय ४०० मीटर रिलेतील किरण पहल, एम. आर. पूवम्मा, प्राची चौधरी आणि विथ्या रामराज यांच्या सुवर्णकथेचे रंगही वेगळे आहेत. किरणला धावण्यापासून



रोखणाऱ्या गावकऱ्यांशी तिच्या वडिलांना संघर्ष करावा लागला. एकेकाळी तिच्याकडे सरावासाठी योग्य बूटही नव्हते. आजीच्या पेन्शनच्या पैशातून तिला स्पाईक्स मिळाले. वडिलांच्या निधनानंतरही तिने ट्रॅक सोडला नाही.

पूवम्माने डोपिंग बंदीनंतर पुन्हा उभे राहत सुवर्णापर्यंत मजल मारली. या कठीण काळात पतीने तिच्या प्रशिक्षणाची जबाबदारी घेतली, तर आईने सरावासाठी मदत केली. प्राची शेतकरी कुटुंबातून आली आणि पोलीस सेवेत जाण्याचे स्वप्न घेऊन धावत राहिली. विथ्यानेही वैयक्तिक स्पर्धेतील संघर्षातून मार्ग काढत रिलेच्या अखेरच्या टप्प्यात भारताला सुवर्णरेषा ओलांडून दिली.

**अपघाताने शरीर मोडले; जिद्दीने करिअर उभे केले**

१० मीटर एअर पिस्तूल मिश्र सांघिक सुवर्ण विजेते सुरुची सिंह आणि कमलजीत यांची गोष्ट अपयशातून पुनरागमन शिकवते. सुरुचीने सुरुवातीला कुस्तीचा सराव केला. कॉलरबोन फ्रॅक्चर झाल्यानंतर तिने नेमबाजी स्वीकारली. तिच्या वडिलांनी बचत खर्च केली, कर्ज घेतले आणि अगदी लाकडी तुकड्यांपासून सरावासाठी लक्ष्य तयार केले.

कमलजितचा २०२३ मधील अपघात जीवघेणा ठरू शकला असता. दोन सहप्रवाशांचा मृत्यू झाला, तर त्याच्या पायाचे हाड मोडले. उपचारासाठी कुटुंबाला कर्ज घ्यावे लागले. खाटेवर असतानाही त्याने खोलीच्या भिंतीवर लक्ष्य लावून सराव केला. पुढे आशियाई स्पर्धेच्या वैयक्तिक पात्रता फेरीत तो एका गुणाने अंतिम फेरीपासून दूर राहिला; पण अखेरच्या क्षणी मिश्र सांघिक संघात संधी मिळाली आणि त्याने ती सुवर्णसंधीत बदलली.

**कबड्डीच्या मातीतील जिद्द**

कबड्डीत भारताने महिला आणि पुरुष अशा दोन्ही गटांत सुवर्ण मिळवले. पुष्पा राणा, सोनाली शिंगाटे आणि सहकाऱ्यांनी इराणला ३७-३४ असे हरवून महिला सुवर्ण कायम ठेवले. पुरुष संघाने सुनील कुमार, पवन सेहरावत, अर्जुन देशवाल, देवांक दलाल, आशू मलिक, अयान लोहचब, जयदीप दहिया, सुमीत, अस्लम इनामदार आणि सहकाऱ्यांच्या जोरावर इराणला ४०-३४ असे नमवले. दोन्ही संघ संपूर्ण स्पर्धेत अपराजित राहिले.

**क्रिकेटच्या सुवर्णातही संघर्षाचीच चमक**

भारताच्या सुवर्णयात्रेची सुरुवात हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील महिला क्रिकेट संघाने केली. स्मृती मानधना, शेफाली वर्मा, ऋचा घोष, दीप्ती शर्मा, भाटी फुलमाली, जेमिमा रॉड्रिग्ज, श्रेयंका पाटील, रेणुका ठाकूर, राधा यादव, अरुंधती रेड्डी, कॅप्टन हरमनप्रीत आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी श्रीलंकेचा १४७ धावांनी धुव्वा उडवत सलग दुसरे आशियाई सुवर्ण मिळवले. अंतिम सामन्यात स्मृतीने ७९, शेफालीने ४८ आणि ऋचाने नाबाद ४९ धावा केल्य

ही १० सुवर्णपदके म्हणूनच केवळ पदकतालिकेतील आकडे नाहीत. कुणाच्या हातात सुरुवातीला टिनचा डबा होता, कुणाच्या घरात आईचे दागिने विकले गेले, कुणासाठी शेत गहाण पडले, कुणाला आजीच्या पेन्शनने बूट मिळाले, कुणी अपघातानंतर पुन्हा लक्ष्यावर नजर रोखली, तर कुणी गावाच्या विरोधाला धावण्याच्या वेगाने उत्तर दिले.

सुवर्णपदक गळ्यात पडते तेव्हा देशाला चमक दिसते; पण त्या चमकेमागे कुटुंबाचा त्याग, खेळाडूचा घाम आणि वर्षानुवर्षांची न दिसणारी धडपड असते. आयची-नागोयातील भारताची सुवर्णपदके ही याच संघर्षाची सुवर्णाक्षरे आहेत.

**-विवेक कुलकर्णी**

# 'गुरू बिना ज्ञान अधुरा';गुरू-शिष्याचे नाते अतूट असावे

**ज**गातील शिक्षकांसाठी ५ आक्टोंबर सन्मानजनक दिन आहे. शिक्षकांच्या प्रती सहयोग व आत्मविश्वास वाढावा आणि भविष्यातील पिढीची आवश्यकता पुर्ण व्हावी याकरिता शिक्षकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने या विशिष्ट दिवसाला आगळेवेगळे महत्व आहे.जगातील शिक्षकांना योग्य मार्गदर्शन मिळावे व शिक्षणामध्ये नविनीकरण व आधुनिकीकरण करण्याच्या उद्देशाने जागतिक पातळीवर शिक्षक दिवस साजरा करण्यात येतो. ५ आक्टोंबर १९६६ रोजी पॅरिसमध्ये अंतर सरकारी सम्मेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यात 'टिचिंग इन फ्रीडम' संधीवर हस्ताक्षर करण्यात आले.यानंतर १९९४ ला युनेस्कोमध्ये एक सम्मेलन आयोजित करण्यात आले होते व यात ५ आक्टोंबर जागतिक शिक्षक दिवस साजरा करण्याची घोषणा करण्यात आली आणि तेव्हापासून ५ आक्टोंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय शिक्षक दिवस म्हणुन साजरा करण्यात येतो.

परंतु विद्यार्थीवर्ग ऑनलाईन शिक्षण प्रणालीला जवळ करायला तयार नव्हते.त्यामुळे शिक्षक व विद्यार्थी यांचे नाते ऑनलाईन राहुच शकत नाही.कारण करोना काळातील दोन वर्षांच्या काळात संपूर्ण जगातील विद्यार्थी शिक्षकांपासुन व शाळा-कॉलेजपासुन दुरावले होते त्यामुळे संपूर्ण शिक्षणाचा खोळंबा झाला व आज विद्यार्थांना त्यांचे प्रायश्चित्त भोगावे लागत आहे आणि ऑफलाईन(प्रत्यक्ष) शिक्षण जड होतांना दिसत आहे.ऑफलाईन शिक्षणामुळे जेवढी ज्ञाणामध्ये



भर पडते,तेवढी ऑनलाईन(अप्रत्यक्ष)शिक्षण प्रणालीत पडत नाही हे आपल्याला कोरोनाने दाखवून दिले.यामुळे प्रत्यक्षात शिक्षणाने जवळीक वाढुन ज्ञाणात मोठी भर पडते.प्रत्येक देश आप-आपल्या पध्दतीने शिक्षक दिवस साजरा करीत असतो. यामध्ये भारतात माजी राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्म दिवशी म्हणजे ५ सप्टेंबरला शिक्षक दिवस साजरा करण्यात येतो,चीन २७ ऑगस्ट,रूस ५ आक्टोंबर अशाप्रकारे जगातील अनेक देश आप-आपल्या पध्दतीने शिक्षक दिवस साजरा करतात.कारण यामुळे शिक्षक व विद्यार्थी यांचे अतूट संबंध निर्माण होवून गुरू-शिष्याचे नाते निर्माण होतात. यामुळे शिक्षणाचे आगळावेगळे महत्व दिसून येते.परंतु ५ आक्टोंबर आंतरराष्ट्रीय शिक्षक दिनाचे वेगळेच महत्व आहे कारण संपूर्ण जग एकाच दिवशी शिक्षकांच्या गुणवत्तेची पावती जगाला देत असते व उत्सहाचे वातावरण निर्माण करतो.

जगात बदलते हवामान पहाता आंतराष्ट्रीय शिक्षक दिनाच्या निमित्ताने जगातील संपूर्ण शिक्षकांनी पृथ्वीवरील जीवसृष्टी वाचविण्यासाठी ५ आक्टोंबरला प्रत्येक शिक्षकांनी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्याचा संकल्प करावा व यात संपूर्ण विद्यार्थांना (शिष्यांना) सहभागी करून भारतासह संपूर्ण जगात हिरवागार गालिचा निर्माण होईल यापध्दतीने जगातील संपूर्ण शिक्षकांनी पाऊले उचलावीत.यामुळे निसर्ग प्रफुल्लित रहाण्यास मोठी मदत होईल.कारण गुरू-शिष्याच्या पुढील वाटचाली करीता मन प्रसन्न असने गरजेचे आहे.कारण पुर्वी शिक्षण हे वृक्षांच्याच सानिध्यात दिले जात असे त्यामुळेच आज प्रत्येकांच्या आयुष्यासाठी गुरू-शिष्याप्रमाणेच वृक्षांशीही नाते घनिष्ठ करणे गरजेचे आहे.कारण ज्या प्रमाणे शिक्षकांविना ज्ञाण नाही त्याच प्रमाणे वृक्ष विना सृष्टी नाही म्हणजेच संपूर्ण जीवन अधुरेच. त्यामुळे प्रत्येक सणाला, महत्त्वपूर्ण दिवसाला वृक्षारोपण व्हायलाच पाहिजे.५ आक्टोंबरला जागतिक शिक्षक दिवसाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला हवी. आंतराष्ट्रीय शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!जय हिंद.

**- रमेश लांजेवार**

## त-ड-का

### आमदानी अठन्नी ...?

आमदानी अठन्नी अन
खर्च कराल रूपया तर
कर्ज होणारच ना भैया ?

कुटूंब असो की देश
सर्वांना अर्थशास्त्राचा
हा बहुमोल संदेश...

उत्पादक खर्चातून असते
समृद्धीची आशा, फुकट
सवलती करती निराशा...



**प्रा.अशोक सारडा,**
मेहकर
९४२१३९४३३९

# 'रिअल हीरो' कॅप्टन मच्छार!

**जा**गतिक मंचावर दहशतवादाविरुद्ध ठराव आणि भाषणे झोडली जात असली तरी दहशतवाद विविध रूपांत समोर येत असतो. दुबईहून इस्रायलकडे जाणारे 'फ्लाय दुबई'चे विमान इस्रायलमध्येच आदळवून 'आत्मघातकी' पद्धतीने हल्ला करण्याचा कट भारतीय वैमानिक स्मित मच्छार यांच्यामुळे उधळला गेला. कॅ. मच्छार यांच्या धाडसामुळे १७४ प्रवाशांचे प्राण वाचले यावर पंतप्रधान मोदी, प्रे.ट्रम्प, इस्रायलचे पंतप्रधान नेतान्याहू वगैरेंनी कॅ. मच्छार यांचे अभिनंदन केले. त्यांना 'रिअल हीरो' म्हणून गौरवले. शुक्रवारी मोदी यांनी इस्पितळात असलेल्या कॅ. मच्छार यांच्याशी व्हिडीओ कॉलद्वारे बातचीत केली व सर्व वाहिन्यांवर त्याचे 'लाईव्ह' चित्रण प्रसारित केले. ते अपेक्षितच होते. कॅ. मच्छार हे नक्कीच आता संपूर्ण भारतीयांचे 'नायक' ठरले आहेत. त्यांनी शौर्य आणि प्रसंगावधान दाखवले नसते तर 'तेल अवीव' येथे फार मोठा घातपात घडवून जगाला हादरा देण्याचा डाव यशस्वी झाला असता. आता काय होईल? आता भाजपच्या परंपरेप्रमाणे या वीर पुरुषाला ताब्यात घेऊन भाजपचा 'ब्रॅण्ड ॲम्बेसेडर' बनवण्याचा प्रयोग होईल व मोदी यांच्यापासून प्रेरणा घेऊन कॅ. मच्छार यांनी विमानात शौर्य दाखवले असा प्रचार सुरू होईल. कॅ. मच्छार यांनी जिवाची बाजी लावून दहशतवादी हल्ला परतवून लावला नसता तर आणखी एक '९/११' हवेत घडू शकले असते.

निघालेल्या 'फ्लाय दुबई'च्या 'एफझेड – १०७३' या बोईंग ७३७ मॅक्स विमानात सुमारे ३५ हजार फूट उंचीवर ओमानी वंशाच्या सहवैमानिकाने कॅ. मच्छारवर चाकूने वार केले व



विमान कोसळवण्याचा प्रयत्न केला. या झटापटीत विमान काही सेकंदांत १४ हजार फूट खाली आले, पण कॉकपिटमध्ये रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या कॅ. मच्छार यांनी त्याही स्थितीत कॉकपिटचे दार उघडून आणीबाणीचे संकेत दिले. प्रवासी व इतर कर्मचारी आत येईपर्यंत त्यांनी विमानावरचे नियंत्रण सोडले नाही. शेवटी सौदी अरेबियातील तबुक येथे कॅ. मच्छार यांनी विमान सुरक्षित उतरवून १७४ प्रवाशांचे प्राण वाचवले. यात लहान मुलेही होती. विमानातील बहुसंख्य प्रवासी हे इस्रायलचे असावेत व या प्रकारामागे इस्रायलच्या युद्धखोरीचा राग असावा. इस्रायलने गाझा पट्टीत लाखो बॉम्ब टाकून हजारो माता व अर्भकांना, लहान मुलांना ठार केले. हे कृत्य अमानुष आहे. मात्र त्याच इस्रायली वंशाच्या लहान मुलांचे प्राण भारतीय वैमानिकाने वाचवले. जखमी अवस्थेतही कॅप्टनने कॉकपिटचे दार उघडून प्रवाशांना सावध करण्याचे प्रसंगावधान दाखवले. हे सर्व प्रदीर्घ अनुभवातून सुचत असते. कॅ. मच्छार यांच्या या साहसी निर्णयामुळे काय लक्षात येते तर विज्ञान, तंत्रज्ञान, संशोधन कितीही प्रगत झाले असले तरी हवेतील सुरक्षा ही अजूनही माणसाच्या निर्णयावरच अवलंबून आहे. अत्याधुनिक विमानात स्वयंचलित यंत्रणा, सुरक्षेची साधने व असूनही विमानात धारदार चाकू पेहोचला व त्या चाकूच्या बळावर सहवैमानिकाने ३५ हजार फुटांवर कॉकपिटचा ताबा घेण्याचा प्रयत्न केला. ज्या विमानतळावरून हा सहवैमानिक चढला, तेथील सुरक्षा तपासणीतून 'चाकू' त्याच्याबरोबर विमानात गेला.

इस्रायलबरोबरच्या युद्धात ओमान इराणला मदत करत आहे. त्यामुळे इस्रायलच्या मार्गावरील उड्डाणांसाठी ओमानी वैमानिकाला परवानगी कशी मिळाली? हा प्रश्न आहेच. अर्थात कॅ. मच्छार यांच्या साहसी कृतीमुळे 'फ्लाय दुबई'च्या विमानाचा होणारा अनर्थ टळला व त्याचा 'इव्हेन्ट' मोदी यांना करता आला. कॅ. मच्छार यांचे मुंबईतील नातेवाईक शोधून त्यांना मुख्यमंत्र्यांच्या दालनापर्यंत पोहोचवण्यात आले. जणू काही ३५ हजार फुटांवरील १७४ लोकांचे प्राण वाचवण्याचे श्रेय 'भाजप'चेच आहे. कॅ. स्मित मच्छार हे याक्षणी फक्त भारतीय आहेत. त्यांनी भारतीय शौर्याचा झेंडा फडकवला आहे. '९/११', '२६/११' सारखे दहशतवादी हल्ले, कंदहारसारखी विमान अपहरणे यामुळे जग त्रस्त आहे व जगातला दहशतवाद संपावा असे प्रत्येकाला वाटते. मात्र तरीही वेगवेगळ्या पद्धतीने जगभरात दहशतवादी हल्ले सुरूच आहेत. एका दहशतवादी हल्ल्याचा कट ३५ हजार फुटांवरून खाली कोसळवण्यात आला. कॅ. मच्छार यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच. एका भारतीयाने जगाला दाखवून दिले की, दहशतवादाशी जमिनीवर आणि हवेतही लढता येते. कॅ. मच्छार यांच्या हिमतीस जगाने दाद दिली आहे!



paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सखच

अकोला
जिल्हा विशेष

# शहर पोलिसांची हॉटेल व्यावसायिकांवर कारवाई; २८० किलो गोमांस जप्त

■ प्रतिनिधी | अकोट ■

हिवरखेड रोड, आठवडी बाजार परिसरातील हॉटेलमध्ये गोवंश जातीच्या मांसाची विक्री व त्यापासून भाजी तयार करून व्यवसाय करणाऱ्या तीन जणांवर अकोट शहर पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी २८० किलो गोवंश जातीचे मांस आणि इतर साहित्य असा एकूण ६१ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.




४ ऑक्टोबर रोजी अकोट शहर पोलीस ठाण्याच्या डी.बी. पथकातील पोहेकॉ. गणेश सोळंके यांना शहरातील हॉटेल अलनूर (हिवरखेड रोड), हॉटेल के.जी.एन. तसेच नगरपरिषदेसमोरील हॉटेल अजमेरी येथे गोवंश मांसापासून भाजी तयार करून विक्री केली जात असल्याची गुप्त माहिती मिळाली. माहिती पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे यांना देण्यात आल्यानंतर त्यांच्या आदेशाने पोलिसांनी पंचांसह संबंधित ठिकाणी कारवाई केली.

या कारवाईत इलीयास खान समंदर खान (६३, रा. अमिनपुरा), शेख जमीर शेख उमर (५४, रा. रामटेकपुरा) आणि शहबाज खान वाजीद खान (२९, रा. अमिनपुरा, अकोट) हे त्यांच्या हॉटेलमध्ये गोवंश जातीच्या मांसाचे तुकडे करून त्यापासून भाजी तयार करीत असल्याचे पोलिसांना आढळून आले.

पोलिसांनी तिन्ही ठिकाणांहून ५६ हजार रुपये किमतीचे २८० किलो गोवंश मांस आणि ५ हजार ५०० रुपयांचे इतर साहित्य, असा एकूण ६१ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल पंचांसमक्ष जप्त केला. संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी व उपविभागीय पोलीस अधिकारी निखील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे यांच्या नेतृत्वात डी.बी. पथकातील पोहेकॉ. गणेश सोळंके, नापोकॉ. विपुल सोळंके, पोलीस कॉन्स्टेबल मोहन दुर्गे व अश्विन चौव्हाण यांनी केली.

# ‘दोन तासांच्या आंदोलना’च्या काळात अकरा दिवसांचा एल्गार!

## अशोक अमानकर यांचा नागरिकांकडून सत्कार

■ प्रतिनिधी | अकोला ■

दुष्काळ जाहीर करण्याच्या मागणीसाठी अकरा दिवस बेमुदत उपोषण करून सरकारचे लक्ष वेधणारे काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष अशोक अमानकर यांच्या आंदोलनाची दखल घेत नागरिकांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. जठारपेठ येथील अरुण दिवेकर सार्वजनिक वाचनालयात झालेल्या या सत्कार सोहळ्याला विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी आणि सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

‘आजच्या काळात राजकीय पक्षांचे आंदोलन म्हटले की, दोन-चार तासांचे निदर्शने किंवा धरणे एवढेच चित्र दिसते. मात्र, अशोक अमानकर यांनी सरकारने दुष्काळ जाहीर करेपर्यंत तब्बल अकरा दिवस उपोषण करून आंदोलनाची ताकद दाखवून दिली,’ असे मत सत्कार सोहळ्याचे आयोजक निखीलेश दिवेकर यांनी व्यक्त केले.



दुष्काळाच्या प्रश्नावर अमानकर यांनी उपोषणाच्या माध्यमातून आपली मागणी सातत्याने लावून धरली. उपोषणाच्या काळात विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि नागरिकांनी त्यांची भेट घेत आंदोलनाला पाठिंबा दिला होता. याच पार्श्वभूमीवर नागरिकांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सत्कार सोहळ्यात उपस्थित मान्यवरांनी अमानकर यांच्या आंदोलनाबाबत आपली भूमिका मांडली. या कार्यक्रमाला प्रकाश पोहरे, महादेव भुईबार, प्रशांत पाचडे, देवराव पाटील, धनंजय मिश्रा, कपिल रावदेव, राजेश मते, तश्वर पटेल, मिलिंद पवार, सरदार सर, मब्बा पैलवान, अब्दुल जब्बार, सुरेश ढाकोळकर, मनीष मिश्रा, सुनील चंदनबटवे, दिलीप खात्री, पंकज किर्तक, विनोद नालट, यशोदा गायकवाड, गणेश कळसकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपोषणादरम्यान प्रत्यक्ष भेट देऊन पाठिंबा देणाऱ्या तसेच आंदोलनाच्या पाठीशी उभे राहिलेल्या सर्वांचे अशोक अमानकर यांनी सत्कार सोहळ्याच्या शेवटी आभार मानले.

# मॅक्सिमो-ऑटोच्या धडकेत महिलेचा मृत्यू

## वाडी गावावर शोककळा; सुख-दुःखात धावणाऱ्या कुटुंबावर काळाचा घाला

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

बेलखेड-आकोली मार्गावर रविवारी मॅक्सिमो आणि ऑटो रिक्षाची समोरासमोर जोरदार धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात वाडी येथील मधुताई संजय छानगाणी यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेने वाडी गावावर शोककळा पसरली असून, सामाजिक कार्यात सदैव पुढे असलेल्या छानगाणी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

रविवार, ४ ऑक्टोबर रोजी हिवरखेड पोलिस ठाण्याच्या हद्दीत बेलखेड-आकोली मार्गावर हा अपघात झाला. प्राथमिक माहितीनुसार, एमएच ३०-१८६७ क्रमांकाच्या मॅक्सिमो वाहनाची ऑटो रिक्षाला जोरदार धडक झाली. अपघातातील धडकेची तीव्रता मोठी असल्याने मधुताई छानगाणी यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. मधुताई या वाडी गावात सर्वांच्या परिचयाच्या होत्या. सामाजिक व आध्यात्मिक उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असायचा. गावातील नागरिकांच्या सुख-दुःखात त्या नेहमी सहभागी होत. त्यामुळे त्यांच्या अचानक जाण्याने गावकऱ्यांना मोठा धक्का बसला आहे.

### रुग्णांना मदतीचा हात देणाऱ्या कुटुंबावर दुःखाचा आघात

मधुताईंचे पती संजय छानगाणी हेही गरजूंच्या मदतीसाठी सदैव तत्पर असतात. ऑटो रिक्षाच्या माध्यमातून आजारी रुग्णांना दवाखान्यात पोहोचविणे, अडचणीच्या वेळी मदतीला धावून जाणे, अशी त्यांची ओळख आहे. अनेकांच्या संकटसमयी आधार बनलेल्या या कुटुंबावरच आता काळाने मोठा आघात केला आहे. मधुताई यांच्या पश्चात दोन मुली आणि एक मुलगा असा परिवार आहे. मुला-मुलींचे विवाह अद्याप बाकी असल्याची माहिती आहे. त्यांच्या निधनामुळे कुटुंबीयांवर मोठे संकट कोसळले असून, गावकऱ्यांकडून शोक व्यक्त करण्यात येत आहे.

### पोलिसांकडून तपास सुरू

अपघाताची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, हिवरखेड पोलिसांकडून या प्रकरणाचा पुढील तपास करण्यात येत आहे.

# गुजराती समाज महामंडळाची प्रांतीय बैठक

**अकोला :** राज्यातील गुजराती समाजाच्या सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक उत्थानसाठी कार्यरत असणाऱ्या महाराष्ट्र गुजराती समाज महामंडळाच्या प्रदेश कार्यकारिणीची प्रदेश बैठक स्थानीय विनस सभागृहात रविवारी मोठ्या उत्साहात संपन्न होऊन अनेक विषयावर सांगोपांग चर्चा करण्यात आली. श्री अकोला गुजराती समाजाच्या आतिथ्यात, महामंडळाचे अध्यक्ष जयप्रकाश पारेख यांच्या अध्यक्षतेत संपन्न या बैठकीत महाराष्ट्र उपाध्यक्ष मुकेशभाई मेहता, सचिव संजीव वाणी, श्री अकोला गुजराती समाज अध्यक्ष दीपेनभाई शाह आदी उपस्थित होते. दीप प्रजवलन ने या कार्यक्रमाची सुरुवात झाली.

# बोरगाव मंजू येथे भव्य रोगनिदान शिबिर; ५८० रुग्णांची तपासणी

**बोरगाव मंजू :** एम. एस. गावंडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ बोरगाव मंजू येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य रोगनिदान व मोफत औषधोपचार शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात तब्बल ५८० रुग्णांची विविध तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करून त्यांना मोफत औषधोपचार करण्यात आले.

शिबिरात अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. प्रकाश मेटांगे, हृदयरोग व मधुमेह तज्ज्ञ डॉ. अंकुश तोष्णीवाल, दमा व टीबी तज्ज्ञ डॉ. राम देवळे, फिजिओथेरपिस्ट डॉ. पौर्णिमा ओळंबे, दंतविकार तज्ज्ञ डॉ. शुभम मोरे यांच्यासह डॉ. अशोक ओळंबे, डॉ. केशव काळे, डॉ. शुभम चऱ्हाटे, डॉ. मनोहर घुगे, डॉ. सुमित मोरखडे, डॉ. धनंजय पाथ्रीकर तसेच सत्य सेवा संघटनेचे अकोला जिल्हाध्यक्ष सुनील सरोदे यांनी रुग्णांची तपासणी केली.



शिबिराचे आयोजन डॉ. नरेंद्र गावंडे यांनी केले होते. यावेळी जिल्हा शिवसेनाप्रमुख चंद्रशेखर पांडे गुरुजी, चर्मकार नेते गजानन भटकर, ॲड. मधुकर तायडे, अशोकराव गावंडे, संजय चौधरी, राजेश विल्हेकर, ओम गोमासे, किशोर मानकर, प्रथमेश गावंडे, ईशान गावंडे, अंशुमन देशमुख, सागर तायडे, रवींद्र पागृत, प्रदीप तायडे, पत्रकार प्रशांत तायडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

बोरगाव मंजू तसेच परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिबिराचा लाभ घेतला. विविध आजारांवरील तज्ज्ञ डॉक्टरांची तपासणी आणि त्यासोबत मोफत औषधोपचाराची सुविधा मिळाल्याने नागरिकांनी आयोजकांचे आभार मानले.

# सत्संग प्रभुप्राप्तीचा परिचायक-आचार्य पु. शिवदत्त महाराज

**अकोला :** जगात प्रभूच्या पश्चात संतांचे अवतरण भक्तांच्या कल्याणासाठी झाले आहे. संत आपल्याला प्रभूच्या द्वारी नेऊन अनुग्रह प्रदान करतात. संत प्रथम भक्तांना आपल्या सत्संगामधून विवेक व सद्गतीचे निर्माण करून देतात. म्हणूनच माणसाने प्रभुप्राप्ती साठी सत्संगाच्या मार्गाने चालत कथाश्रवण करून जीवनात परोपकार, नीतिमत्ता, विवेक व सद्बुद्धी यांसारखे गुण निर्माण करावेत, असे हितोपदेश पु. आचार्य शिवदत्त महाराज यांनी केले. पितृसेवा भागवत कथा आयोजन समिति तथा पूज्य सद्गुरू सुधांशुजी महाराज प्रणित विश्व जागृति मिशन यांच्या संयुक्त तत्वावधानाने पितृपक्षाच्या पावन पर्वानिमित्त स्थानिक गोरक्षण रोडवरील जानोरकर मंगल कार्यालयात सुरू असलेल्या पु. आचार्य शिवदत्तजी महाराज यांच्या संगीतमय श्रीमद् भागवत कथेच्या द्वितीय सत्रात त्यांनी परीक्षित आणि सुखदेव संवादाचे सुंदर विवेचन केले. या सत्रात त्यांनी प्रभुप्राप्तीचे उपाय प्रतिपादित केले. प्रभूच्या कृपेपेक्षा भक्तांनी दस्तुरखुद्द प्रभूला मागणे आवश्यक आहे.

**Change In Name**

I have changed my name from
**KAUSAR JAHA SHEKH AMIR**
(Passport No. W7673843) -to-
**KAUSAR JAHA SHAIKH AMIR**
Address: C/O Shaikh Harun Nalsahab Pura, Juni Basti
Murtizapur PO- Murtizapur DIST-Akola,
Maharashtra -444107

**Change In Name**

I have changed my name from
**SHEKH AMEER SHEKH HARUN**
(Passport No. S2875311) -to-
**SHAIKH AMEER SHAIKH HARUN**
Address: C/O Shaikh Harun Nalsahab Pura, Juni Basti
Murtizapur PO- Murtizapur DIST-Akola,
Maharashtra -444107

**Change In Name**

I have changed my name from
**MOHAMMAD ARIF SHEKH HARUN**
(Passport No. W7673845) -to-
**MOHAMMAD ARIF SHAIKH HARUN**
Address: C/O Shaikh Harun Nalsahab Pura, Juni Basti
Murtizapur PO- Murtizapur DIST-Akola,
Maharashtra -444107

**Change In Name**

I have changed my name from
**MO. SHAKIR SHEKH HARUN**
(Passport No. W7673844) -to-
**MO.SHAKIR SHAIKH HARUN**
Address: C/O Shaikh Harun Nalsahab Pura, Juni Basti
Murtizapur PO- Murtizapur DIST-Akola,
Maharashtra -444107

# मोकाट कुत्र्यांचा हैदोस; अकोटकरांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर!

## एकाच दिवशी २७ जणांना चावा; रस्त्यांवर कुत्र्यांचे टोळके

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट शहरात मोकाट कुत्र्यांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असतानाच ३ सप्टेंबर रोजी तब्बल २७ जणांना कुत्र्यांनी चावा घेतल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. यातील काही जण गंभीर जखमी झाल्याने शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. प्रमुख रस्ते, चौक, बाजारपेठा आणि रहदारीच्या ठिकाणी मोकाट कुत्र्यांची टोळकी फिरत असून, नागरिकांनी नेमके रस्त्यावरून चालायचे तरी कसे, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

विशेषतः अकोला रोडवरील पोलीस स्टेशन परिसरात ३ सप्टेंबर रोजी भटक्या कुत्र्यांनी नागरिकांवर हल्ला केल्याचे सांगण्यात येत आहे. अचानक कुत्र्यांचा पाठलाग सुरू झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच दुचाकीस्वारांसाठी हा प्रश्न अधिक धोकादायक ठरत आहे.







मोकाट कुत्र्यांचा त्रास केवळ चावण्यापुरता मर्यादित राहिलेला नाही. वाहनांसमोर अचानक कुत्रे आडवे येत असल्याने दुचाकीस्वारांचे नियंत्रण सुटून अपघात होण्याच्या घटना घडत आहेत. रात्रीच्या वेळी तर रस्त्यांवर टोळक्याने फिरणाऱ्या कुत्र्यांमुळे वाहनचालकांना अक्षरशः जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. कुत्र्यांपासून बचाव करण्याच्या प्रयत्नात अपघात झाल्यास त्याची जबाबदारी कोणाची, असा सवालही नागरिकांकडून उपस्थित होत आहे. २७ जणांना कुत्र्यांचा चावा लागल्याची घटना ही केवळ आकडेवारी नसून शहराच्या सार्वजनिक सुरक्षेचा गंभीर इशारा आहे. प्रशासनाने आता कागदी कारवाईचा सोपस्कार न करता प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून मोकाट कुत्र्यांचा प्रश्न निकाली काढावा, अशी मागणी जोर धरत आहे.

### प्रशासनाच्या उपाययोजना कागदावरच?

शहरातील मोकाट कुत्र्यांची संख्या वाढत असताना त्यांच्या निर्बीजीकरणासह पकडण्याची व सुरक्षित ठिकाणी व्यवस्थापन करण्याची प्रभावी मोहीम राबविण्याची गरज आहे. मात्र, नागरिकांच्या तक्रारी वाढूनही हा प्रश्न कायम राहिल्याने स्थानिक प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाल्यानंतरही प्रशासन आणखी किती घटना घडण्याची वाट पाहणार, असा संतप्त सवाल अकोटकर विचारत आहेत.

### नागरिकांच्या संयमाचा अंत; तातडीच्या कारवाईची मागणी

मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी नगरपरिषदेने तातडीने ठोस कृती आराखडा तयार करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. शहरातील संवेदनशील भागांची पाहणी करून मोकाट कुत्र्यांची संख्या नियंत्रित करणे, निर्बीजीकरणाची प्रभावी अंमलबजावणी करणे आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना करणे गरजेचे आहे. अन्यथा एखादी मोठी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का, असा सवाल संतप्त नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# समृद्धीस विभागीय बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक

**अकोला :** अमरावती विभागीय शालेय बॉक्सिंग क्रीडा स्पर्धेत डवले कॉलेजची विद्यार्थीनी समृद्धी संजय अढाऊ हिने दमदार कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. गांधीग्राम येथील समृद्धी अढाऊने या स्पर्धेत ५७ ते ६० किलो वजन गटात वाशिमच्या प्रियंका गिरी हिच्यावर विजय मिळवत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. विशेष म्हणजे, सलग दुसऱ्यांदा डवले कॉलेजचे प्रतिनिधित्व करत समृद्धीने राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. समृद्धीच्या यशामागे तिचे प्रशिक्षक व मार्गदर्शक विक्रम सिंग चंदेल, सतीशचंद्र भट, विजय डोबाळे सर तसेच डवले सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तिच्या वडिलांचा भक्कम पाठिंबा तिच्या यशासाठी प्रेरणादायी ठरला. समृद्धीच्या या यशाबद्दल प्रा. प्रकाश डवले, मृणालिनी डवले, डॉ. अभिजीत डवले यांनी अभिनंदन केले.

# दहा दिवसांनी डीपी सुरू; तरीही शिवपुरातील शेतकरी अंधारात!

## पाऊस दडी मारून बसला, आता वीजपुरवठ्याचीही कोंडी
## अतिरिक्त क्षमतेच्या ट्रान्सफॉर्मरची मागणी

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट तालुक्यातील उमरा सर्कलअंतर्गत शिवपुर परिसरातील ‘मुन्ना महल्ले’ कृषी वीज वितरण डीपी तब्बल दहा दिवस बंद राहिल्यानंतर सुरू करण्यात आली. मात्र, डीपीवर वाढलेला भार आणि कमी क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर यामुळे वीजपुरवठ्याची समस्या कायम आहे. परिणामी काही शेतकऱ्यांना एक दिवसाआड वीजपुरवठा करण्याची वेळ आली असून, सुमारे १०० एकर क्षेत्रावरील फळबागा, कापूस, सोयाबीनसह अन्य पिके संकटात सापडली आहेत.

यंदा पावसाने मोठी दडी मारल्याने अकोट तालुक्यातील शेतकरी आधीच दुष्काळसदृश परिस्थितीचा सामना करीत आहेत. विहिरी व उपलब्ध जलस्त्रोतांच्या आधारे पिके वाचविण्याची धडपड सुरू असतानाच कृषी वीजपुरवठ्याची समस्या निर्माण झाल्याने शेतकऱ्यांची दुहेरी कोंडी झाली आहे. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, ‘मुन्ना महल्ले’ डीपी बंद झाल्यानंतर महावितरणकडे तातडीने तक्रार करण्यात आली होती. संबंधित वायरमन यांनी २१ सप्टेंबर रोजी ऑनलाइन प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर डीपीची दुरुस्ती करून वीजपुरवठा सुरू करण्यात आला. मात्र, आवश्यक भार पेलण्यास सक्षम असलेला नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्याऐवजी कमी क्षमतेचा जुना ट्रान्सफॉर्मरच बसविण्यात आल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.



डीपीवर कृषी पंपांचा भार वाढताच वारंवार वीज खंडित होत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे काही शेतकऱ्यांना एक दिवसाआड वीज वापरण्याच्या सूचना देण्यात आल्याचा दावा करण्यात येत आहे. परिणामी सिंचनाचे नियोजन पूर्णपणे कोलमडले असून, पाण्याअभावी पिके कोमेजण्याच्या मार्गावर असताना वीजपुरवठ्याच्या अनियमिततेमुळे शेतकऱ्यांची चिंता आणखी वाढली आहे.

फळबागांसह कापूस, सोयाबीन आणि अन्य पिकांना वेळेवर पाणी देणे आवश्यक असताना एक दिवसाआड वीज मिळत असल्याने पिकांचे नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे. अतिरिक्त क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर बसविण्याची मागणी शेतकऱ्यांनी वारंवार करूनही त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप आहे. दरम्यान, काही शेतकऱ्यांनी सहाय्यक अभियंता आवळे यांच्याशी संपर्क साधला असता, प्रकरणाची माहिती घेऊन आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन देण्यात आल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. मात्र, त्यानंतरही परिस्थितीत अपेक्षित सुधारणा न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढली आहे.

### पिके वाचवायची की वीजेची वाट पाहायची?

दहा दिवस बंद राहिलेली डीपी सुरू झाली असली तरी वाढत्या भारामुळे पुन्हा वीजपुरवठ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. आधीच पावसाअभावी संकटात असलेल्या शेतकऱ्यांना आता एक दिवसाआड वीजपुरवठ्याचा सामना करावा लागत आहे. ‘पिके वाचविण्यासाठी आम्ही दिवस-रात्र मेहनत घेत आहोत. मात्र, वाढीव क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर देण्याऐवजी एक दिवसाआड वीजपुरवठा केला जात असेल, तर पिकांचे नुकसान कोण भरून काढणार?’ असा संतप्त सवाल शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे.

पावसाचा तुटवडा, दुष्काळसदृश परिस्थिती आणि त्यातच अनियमित वीजपुरवठा, अशा तिहेरी संकटात शिवपुर परिसरातील शेतकरी सापडले आहेत. महावितरणने तातडीने वाढीव क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर बसवून कृषी वीजपुरवठा सुरळीत करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २९३**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# प्रत्येक क्षण आनंदाने जगा; जीवन सुंदर करण्याची जबाबदारी आपलीच - गणेश शिंदे

## ‘अमृत मंथन’च्या अंतिम सत्रात प्रेरणादायी विचारांची मेजवानी

**अमरावती/प्रतिनिधीः-** तुषार भारतीय मित्रपरिवाराच्या वतीने गेल्या १४ वर्षांपासून आयोजित करण्यात येणाऱ्या तीन दिवसीय ‘अमृत मंथन व्याख्यानमाले’च्या अंतिम सत्राला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्राचे प्रसिद्ध वक्ते व गीतकार गणेश शिंदे यांनी ‘जीवन सुंदर आहे’ या विषयावर प्रभावी, ओघवत्या आणि मनाला भिडणाऱ्या शैलीत विचार मांडत उपस्थितांना जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहण्याचा संदेश दिला.

‘जीवन सुंदर आहे की नाही, हे परिस्थिती ठरवत नाही; तर आपण परिस्थितीकडे कोणत्या दृष्टीने पाहतो, यावर जीवनाचे सौंदर्य अवलंबून असते,’ असा संदेश देत गणेश शिंदे यांनी जीवनातील विविध पैलूंवर प्रकाश टाकला. सुख-दुःख, यश-अपयश, संघर्ष, नाती, अपेक्षा आणि बदलत्या परिस्थितीचा स्वीकार करत प्रत्येक क्षण आनंदाने जगण्याचे आवाहन त्यांनी केले.

आजच्या धावपळीच्या जीवनात माणूस पैसा, प्रतिष्ठा आणि यशाच्या मागे धावत असताना जगण्याचा आनंद मात्र हरवत चालला आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. आयुष्यात किती मिळवले यापेक्षा मिळालेल्या प्रत्येक क्षणाचा आनंद किती मनापासून घेतला, हे अधिक महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. आपल्या आजूबाजूच्या माणसांना वेळ देणे, कुटुंबातील नाती जपणे, छोट्या-छोट्या आनंदाच्या क्षणांचा उत्सव साजरा करणे आणि संकटातही सकारात्मक राहणे, हेच खऱ्या अर्थाने सुंदर जीवनाचे सूत्र असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

‘अपेक्षा कमी करा, कृतज्ञता वाढवा; तक्रारी कमी करा आणि आनंद शोधण्याची दृष्टी निर्माण





करा,’ असा जीवनमंत्र देताना शिंदे यांनी प्रेक्षकांना आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडले. परिस्थिती बदलण्याची वाट पाहण्यापेक्षा आपला दृष्टिकोन बदलला तर परिस्थितीतही सकारात्मकता निर्माण करता येते, असे त्यांनी सांगितले.

पालक, कुटुंबीय, मित्र आणि आपल्या आयुष्यातील माणसांचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी नाती हीच जीवनाची खरी संपत्ती असल्याचे सांगितले. मोबाईल आणि सोशल मीडियाच्या आभासी जगात रमण्यापेक्षा प्रत्यक्षातील माणसांशी संवाद साधा, त्यांच्या भावना समजून घ्या आणि नात्यांना वेळ द्या, असा संदेशही त्यांनी दिला.

जीवनात संघर्ष येणारच; मात्र संघर्षाला घाबरून न जाता त्यातून शिकत पुढे जाणे आवश्यक आहे. अपयश म्हणजे शेवट नसून नव्या सुरुवातीची संधी आहे, असे सांगत त्यांनी अनेक उदाहरणांमधून श्रोत्यांना प्रेरित केले. आयुष्यातील अडचणी या आपल्याला अधिक मजबूत आणि समृद्ध बनवण्यासाठी येतात, त्यामुळे प्रत्येक संकटाकडे शिकण्याची संधी म्हणून पाहण्याचे आवाहन त्यांनी केले.

गणेश शिंदे यांच्या खास शैलीतील विनोद, किस्से, भावनिक प्रसंग आणि जीवनातील वास्तवाचे दर्शन घडविणाऱ्या उदाहरणांमुळे संपूर्ण सभागृह मंत्रमुग्ध झाले. त्यांच्या विचारांबरोबरच त्यांनी सादर केलेले प्रसिद्ध ‘काय सांगू राणी तुला’ हे गीत विशेष आकर्षण ठरले. या गीताला श्रोत्यांनी उत्स्फूर्त दाद देत अक्षरशः डोक्यावर घेतले. टाळ्यांचा कडकडाट आणि उत्साहपूर्ण प्रतिसादाने कार्यक्रमस्थळ दुमदुमून गेले.

उल्हास बापूरीकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या अंतिम सत्राला प्रमुख अतिथी म्हणून आयोजक तुषार भारतीय, चेतन गावंडे, लता देशमुख, भारती गुहे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. अंतिम सत्राला एवढी मोठी गर्दी झाली की सभागृहातील सर्व खुर्च्या अपुऱ्या पडल्या. अनेक श्रोत्यांनी चटईवर बसून संपूर्ण व्याख्यानाचा आस्वाद घेतला. त्यामुळे ‘अमृत मंथन’च्या अंतिम सत्राने गर्दीचा उच्चांक गाठल्याचे चित्र पाहायला मिळाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राधा मोहोळ यांनी केले. प्रास्ताविक तुषार भारतीय यांनी केले, तर पाहुण्यांचा परिचय मंदार नानोटी यांनी करून दिला. आभार प्रदर्शन चेतन गावंडे यांनी केले. कार्यक्रमाचा शुभारंभ ‘महाराष्ट्र गीताने’ तर सांगता ‘वंदे मातरम्’ने करण्यात आली.

गेल्या १४ वर्षांपासून सुरू असलेल्या ‘अमृत मंथन’च्या माध्यमातून अमरावतीकरांना सातत्याने विविध क्षेत्रातील नामवंत वक्त्यांचे विचार ऐकण्याची संधी मिळत आहे.

# ढाकणा रोडवर पाच गोवंशीय जनावरांची सुटका

## ५.३५ लाखांचा मुद्देमाल जप्त; दोघे ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** मालवाहू वाहनातून गोवंशीय जनावरांची संशयास्पद पद्धतीने वाहतूक होत असल्याची माहिती मिळताच धारणी पोलिसांनी ढाकणा रोडवर कारवाई केली. या कारवाईत पाच गोवंशीय जनावरांची सुटका करण्यात आली असून, वाहनासह ५ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले.

पोलीस निरीक्षक अवतारसिंग चव्हाण यांना २ ऑक्टोबर रोजी जनावरे अकोटकडे नेली जात असल्याची माहिती मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी ढाकणा रोडवर संशयित वाहनाची तपासणी करण्यासाठी पथक तैनात केले. रात्री सुमारे आठ वाजता एमएच २७ बीएक्स ६३९० क्रमांकाचे टाटा इंट्रा मालवाहू वाहन पोलिसांनी अडविले. वाहनाची झडती घेतली असता त्यामध्ये पाच गोवंशीय जनावरे आढळून आली. ही जनावरे दोरीने बांधलेल्या अवस्थेत असल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिसांनी वाहनचालकाकडे जनावरांच्या मालकीसंबंधी कागदपत्रे तसेच वाहन चालविण्याचा परवाना मागितला. मात्र, संबंधित कागदपत्रे सादर करता आली नसल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. त्यामुळे पोलिसांनी जनावरे आणि वाहन ताब्यात घेतले. या कारवाईत सुमारे चार लाख रुपये किमतीचे टाटा इंट्रा वाहन आणि अंदाजे एक लाख ३५ हजार रुपये किमतीची पाच गोवंशीय जनावरे असा एकूण ५ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. शेख मुजाहीद अब्दुल मजीद (वय २२) आणि विक्रम रवींद्र इंगळे (वय २०), दोघेही रा. अंजनगाव सुर्जी, यांना ताब्यात घेण्यात आले. याप्रकरणी धारणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेख मुजाहीद याच्याविरुद्ध यापूर्वीही याच स्वरूपाचा गुन्हा दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली. ही कारवाई वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अवतारसिंग चव्हाण यांच्या पथकाने केली. पुढील तपास सुरू आहे.

# कुमकुमच्या सुवर्णविजय, यशदीपच्या रौप्यविजयाचा पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपतर्फे सन्मान

**अमरावती/प्रतिनिधीः-** जपानमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये अमरावतीच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत शहराच्या क्रीडा क्षेत्राचा गौरव वाढविला आहे. महिला रिकर्व्ह सांघिक तिरंदाजीमध्ये अमरावतीची १७ वर्षीय कुमकुम अनिल मोहोड हिने ऐतिहासिक सुवर्णपदक पटकावून अमरावतीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. तिच्या या अभिमानास्पद कामगिरीबद्दल पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपच्या वतीने कुमकुमचे वडील अनिल मोहोड यांचा सन्मान व सत्कार करण्यात आला.

कुमकुमच्या या ऐतिहासिक यशामुळे अमरावतीसह संपूर्ण महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्राचा गौरव वाढला असून, तिच्या पुढील क्रीडा कारकिर्दीस संस्थेच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या. याच स्पर्धेत अमरावतीचा आघाडीचा भारतीय तिरंदाज यशदीप भोगे यानेही दमदार कामगिरी करत रौप्यपदक पटकावले. त्याच्या या



उल्लेखनीय यशाबद्दल पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपच्या वतीने यशदीपच्या पालकांचा सन्मान व सत्कार करण्यात आला. यशदीपने भविष्यातही देशाचे आणि अमरावतीचे नाव उज्ज्वल करावे, यासाठी त्याला शुभेच्छा देण्यात आल्या. विशेष म्हणजे, सुवर्ण कामगिरी करणाऱ्या कुमकुम मोहोडला घडविण्यात प्रशिक्षक प्रफुल्ल डांगे यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. त्यांच्या मार्गदर्शनातून कुमकुम मोहोड ने आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांच्या या योगदानाची दखल घेत पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपच्या वतीने कोच प्रफुल्ल डांगे यांचाही यथोचित सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष आ. प्रविण पोटे पाटील, उपाध्यक्ष श्रेयश पोटे पाटील, तसेच संस्थेचे संचालक डॉ. पी. एम. खोडके, सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य आणि प्राध्यापकांनी कुमकुम मोहोड, यशदीप भोगे, त्यांचे पालक व प्रशिक्षक प्रफुल्ल डांगे यांचे अभिनंदन केले.

# १८ हजार भरा, रोज ६३८ रुपये मिळवाचे आमिष, सहा जणांची फसवणूक

## एफबीटी ॲपच्या नावाने ऑनलाइन व्यवहार; दोघांविरुद्ध गुन्हा

**अमरावती/प्रतिनिधीः-** कमी गुंतवणुकीत मोठा परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवून ऑनलाइन फसवणूक केल्याचा प्रकार हिवरा येथे उघडकीस आला आहे. ‘एफबीटी ॲप’मध्ये १८ हजार ५०२ रुपये गुंतवल्यास दोन वर्षांपर्यंत दररोज ६३८ रुपये मिळतील, असे सांगून सहा जणांकडून एकूण १ लाख ११ हजार १२ रुपये ऑनलाइन स्वीकारण्यात आल्याचा आरोप आहे. याप्रकरणी लोणी पोलिसांनी दोन महिलांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

हिवरा येथील २० वर्षीय महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार ऑनलाइन ग्रुपच्या माध्यमातून गुंतवणुकीची माहिती देण्यात आली. या ग्रुपच्या ॲडमिन सरोज नाईक आणि Emily Annie यांनी एफबीटी ॲपमध्ये पैसे भरल्यास नियमितपणे मोठा आर्थिक परतावा मिळेल, असे सांगितल्याचा आरोप तक्रारीत आहे. या आश्वासनावर विश्वास ठेवून फिर्यादीसह सपना रोशन मोकळे, हर्षा विजय सवई, अर्चना दिनेश वानखडे आणि स्वाती संतोष नन्नावरे अशा सहा जणांनी प्रत्येकी १८ हजार ५०२ रुपये ऑनलाइन भरले. त्यानुसार सहा जणांकडून एकूण १ लाख ११ हजार १२ रुपये स्वीकारण्यात आले. मात्र, आश्वासनाप्रमाणे परतावा न मिळाल्याने संबंधितांना संशय आला. यानंतर महिलेने पोलिसांत धाव घेतली. तिच्या तक्रारीवरून दोन ग्रुप ॲडमिन यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१६(२), ३१८(४) तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियमाच्या कलम ६६(सी), ६६(डी) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ऑनलाइन व्यवहार आणि संबंधित ग्रुपची माहिती तपासण्यात येत आहे.

# जिल्ह्यातील महिलांनी शेतकरी प्रमाणपत्र योजनेचा लाभ घ्यावा

## शेतीमित्र पुरस्कारप्राप्त सविता निखाडे यांचे आवाहन

**तिवसा/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या वतीने महिला शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी महिला शेतकरी प्रमाणपत्र देण्याची विशेष मोहीम राबवत आहे. जिल्ह्यातील महिला भगिनींनी या योजनेचा अधिकाधिक लाभ घ्यावा असे आवाहन वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कारप्राप्त महिला शेतकरी सविता हेमंत निखाडे यांनी केले आहे.

जमीन स्वतःच्या मालकीची नसली तरी प्रत्यक्ष शेती करणाऱ्या महिला शेतमजूर तसेच शेतीपूरक व्यवसाय करणाऱ्या महिलांनाही या प्रमाणपत्राचा लाभ मिळणार असल्याचे सांगण्यात आले आहे. दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, फळबाग शेती, फुलशेती, बचतगट महिला या सर्व विविध शेती पूरक व्यवसाय करणाऱ्या महिलांचाही यामध्ये समावेश करण्यात आला आहे.

महिलांना कृषी क्षेत्रातील अधिकृत शासकीय ओळखपत्र मिळण्यास हे प्रमाणपत्र उपयुक्त ठरणार असून पीक कर्ज, कृषी कर्ज, पिक विमा, आधुनिक कृषी तंत्रज्ञान, विविध शासकीय योजना व कृषी विभागाच्या प्रशिक्षणामध्ये सहभाग घेण्यासाठी त्याचा उपयोग होणार आहे. या योजनेसाठी अठरा वर्षावरील प्रत्यक्ष शेती करणाऱ्या महिला, शेतमजूर महिला तसेच शेतीपूरक व्यवसाय करणाऱ्या महिला पात्र राहणार आहे. कर्जाची पडताळणी ग्रामसभा, ग्रामपंचायत किंवा नगरपंचायतीमार्फत करण्यात येणार असून पात्र अर्जदारांना पंधरा दिवसात प्रमाणपत्र वितरित करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.



नोंदणीसाठी आधार कार्ड आणि आधार कार्डशी संलग्न मोबाईल क्रमांक आवश्यक आहे. कृषी विभागाच्या अधिकृत वेब पोर्टलवरून नोंदणी करण्याबरोबरच गावागावात आयोजित करण्यात येणाऱ्या विशेष शिबिरामध्ये महिलांना नोंदणी करता येणार आहे. कृषी क्षेत्रात महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात असूनही अनेक महिलांकडे शासकीय स्तरावरील अधिकृत शेतकरी ओळख उपलब्ध नसतील. त्यामुळे पात्र महिलांनी पुढाकार घेऊन महिला शेतकरी प्रमाणपत्र साठी नोंदणी करावी आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन सविता हेमंत निखाडे यांनी केले आहे.

# संतांच्या कृपाउपकारांची परतफेड अशक्य; समर्पण हीच खरी कृतज्ञता!

## हभप पंकज महाराज महल्ले

**कुऱ्हा/प्रतिनिधीः-** संतांच्या सहवासातून जीवनाला भक्तीचा मार्ग मिळतो, त्यांच्या कृपावचनातून माया-मोहाच्या अंधकारातून बाहेर पडण्याची प्रेरणा मिळते. संतांनी केलेल्या उपकारांची परतफेड करणे कोणालाही शक्य नाही. त्यांच्या चरणी आपले संपूर्ण जीवन समर्पित केले, तरी त्यांच्या ऋणातून मुक्त होता येणार नाही, अशी भावस्पर्शी संतकृतज्ञता ह.भ.प. पंकज महाराज महल्ले (कौंडण्यपूर) यांनी आपल्या अमृततुल्य कीर्तनातून व्यक्त केली.

श्री संत अच्युत महाराज संस्थान, गुरुग्राम, श्रीक्षेत्र शेंदूरजना (बाजार) येथे ब्रह्मलीन वंदनीय श्री संत अच्युत महाराज यांच्या १४ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त २ ऑक्टोबर २०२६ पासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवांतर्गत आयोजित कीर्तन सोहळ्यात ह.भ.प. पंकज महाराज महल्ले यांनी आपल्या ओघवत्या



वाणीतून उपस्थित भाविकांना भक्तिरसात चिंब केले.

कार्यक्रमाची सुरुवात सायंकाळी ६ ते ७ या वेळेत सामुदायिक प्रार्थनेने झाली. त्यानंतर ज्ञानेश्वरी जयंतीनिमित्त ह.भ.प. सचिन देव महाराज यांचे ज्ञानेश्वरी प्रवचन संपन्न झाले. रात्री ८.३० वाजता ह.भ.प. पंकज महाराज महल्ले यांच्या कीर्तनाला प्रारंभ झाला.

कीर्तनातून संत महात्म्यांच्या कृपेचे महत्त्व विशद करताना महाराज म्हणाले की, संतांनी केलेले कृपाकार आणि त्यांच्या उपकारांचे स्मरण मनाला नेहमीच माया-मोहाच्या बंधनातून जागृत करते. जीवनाच्या क्षणभंगुरतेची जाणीव करून देत परमार्थाचा खरा मार्ग दाखविण्याचे कार्य संत करतात. त्यांच्या कृपेमुळेच जीवनाला योग्य दिशा आणि आध्यात्मिक जाणिवेची प्राप्ती होते.

संतांनी आपल्यावर केलेल्या उपकारांची परतफेड कशी करावी, असा भावपूर्ण प्रश्न उपस्थित करत, त्यांच्या चरणी आपला प्राण अर्पण केला तरी त्यांच्या ऋणातून मुक्त होता येणार नाही, अशी कृतज्ञतेची भावना त्यांनी व्यक्त केली. संतांविषयीची निष्ठा, श्रद्धा, समर्पण आणि भक्ती यांचे महत्त्व त्यांनी विविध संतवचनांच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडले. त्यांच्या भावपूर्ण निरूपणाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले.

कीर्तनाला मृदंगवादक निखिल ठाकरे, हार्मोनियमवादक वानखडे, गायक अतुल दि. ठाकरे, सुधाकर मानकर, वानखडे तसेच विणेकरी अशोक पवार यांनी सुरेल साथसंगत केली. टाळ-मृदंगाच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात संपूर्ण परिसर हरिनामाच्या जयघोषाने दुमदुमून गेला. या धार्मिक सोहळ्याला ह.भ.प. सचिन देव महाराज, संस्थानचे अध्यक्ष डॉ. अनिल सावरकर, सचिव मनोहर निमकर, कोषाध्यक्ष सतीश सावरकर, सहसचिव नारायण बोडखे, भास्करराव बोडखे, राजुभाऊ सावरकर, जगदीश काळे, ॲड. विवेक सावरकर, प्रमोद निमकर, राजेंद्र देवळे, पवन भोजने यांच्यासह समस्त गावकरी मंडळी व मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

# उधारीच्या वादानंतर चाकूच्या मुठीने डोक्यात वार

## नवसारीत महात्मा फुलेनगरातील घटना, दोघांविरुद्ध गुन्हा

**अमरावती/प्रतिनिधीः-** उधारीचे पैसे परत करण्याची मागणी केल्याने सुरू झालेला वाद चांगलाच पेटला. गहाण ठेवलेला मोबाईल परत मागणाऱ्या तरुणाला आधी पैसे परत करण्यास सांगितल्याने झालेल्या वादात चाकूच्या मुठीने डोक्यात मारहाण करण्यात आल्याची घटना महात्मा फुलेनगर, नवसारी परिसरात घडली. याप्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मंगेश अशोक जाधव (वय ३०) यांच्या तक्रारीनुसार, मुकुल देविदास होदिते (वय २८) आणि सुशिल बोदिके (वय २६) हे त्यांच्या परिचयातील आहेत. मुकुल याने मंगेशकडून पैसे उधार घेतले होते. त्याबदल्यात त्याने आपला मोबाइल गहाण ठेवला होता.

२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सुमारे सात वाजता मंगेश आणि दोन्ही आरोपी समोरासमोर आले. यावेळी मुकुलने गहाण ठेवलेला मोबाइल परत मागितला. त्यावर मंगेश यांनी आधी घेतलेले उधार पैसे परत करण्यास सांगितले. पैशांवरून दोघांमध्ये शाब्दिक वाद सुरू झाला. काही वेळातच वादाचे रूपांतर झटापटीत झाले. तक्रारीनुसार, याचदरम्यान मुकुलने चाकू काढला आणि त्याच्या मुठीने मंगेश यांच्या डोक्यावर प्रहार केला. या मारहाणीत मंगेश जखमी झाले. घटनेनंतर मंगेश यांनी गाडगेनगर पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. त्यानंतर वैद्यकीय प्रमाणपत्र आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार पोलिसांनी मुकुल होदिते आणि सुशिल बोदिके यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३५२ आणि ११८(१) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलिसांकडून सुरू आह

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ३१**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# सेवानिवृत्त पोलीस पांडुरंग गुरव यांचा कविठा येथे सत्कार

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर तालुक्यातील कविठा येथे पोलीस सेवेतून सेवानिवृत्त झालेले पांडुरंग गुरव यांचा कुटुंबासह भव्य सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. गावकऱ्यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात गुरव यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या सेवाभावाला सलाम करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नामदेव तनपुरे होते. प्रमुख अतिथी म्हणून पंडितराव राऊतकर महाराज, चक्रधरराव पवार, आशिष पटारे, मिलिंद लकडे, नानाभाऊ पातोंड, पंजाबराव पांडे, सुरेशराव नागे, नितीन पातोंड, सचिन पातोड, गजाननराव पवार आदी मान्यवर उपस्थित होते.



प्रास्ताविक करताना पंडितराव राऊतकर महाराज यांनी पांडुरंग गुरव यांच्या पोलीस सेवेतल्या प्रदीर्घ कारकिर्दीचा आढावा घेत त्यांच्या प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा व लोकाभिमुख कामकाजावर प्रकाश टाकला. त्यानंतर अध्यक्षीय भाषणात नामदेव तनपुरे यांनी गुरव यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात गुरव दांपत्याचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. संचालन मिलिंद लकडे यांनी केले. कार्यक्रमाला गावातील असंख्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘खात्यात २ लाख जमा झाले’ म्हणत १.०९ लाखाने फसवणूक

## स्कॅनर पाठवून ऑनलाइन पैसे उकळले; धारणी पोलिसांत गुन्हा

**अमरावती/प्रतिनिधीः-** बँक खात्यात दोन लाख रुपये जमा झाल्याचा बनाव करून त्यावर कर भरण्याच्या नावाखाली एका २८ वर्षीय महिलेकडून तब्बल १ लाख ९ हजार रुपये ऑनलाइन उकळल्याचा प्रकार समोर आला आहे. तारूबांदा येथील या महिलेची फसवणूक झाल्यानंतर धारणी पोलिसांनी दोन संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.




तक्रारीनुसार, संबंधित महिलेला आरोपींनी मोबाइलवरून संपर्क साधला. तिच्या खात्यात दोन लाख रुपये जमा झाल्याचे सांगण्यात आले. मात्र, ही रक्कम मिळविण्यासाठी दोन हजार रुपये टॅक्स भरावा लागेल, असे सांगून महिलेला ऑनलाइन व्यवहार करण्यास प्रवृत्त करण्यात आले.

आरोपींनी वेगवेगळ्या तारखांना महिलेच्या मोबाइलवर स्कॅनर पाठविले. त्यावर पैसे पाठविण्याच्या सूचना देण्यात आल्या. आरोपींच्या सांगण्यावर विश्वास ठेवून महिलेने एकापाठोपाठ ऑनलाइन व्यवहार केले. अशा विविध व्यवहारांमधून तिच्याकडून एकूण १ लाख ९ हजार रुपये पाठविण्यात आले. पैसे दिल्यानंतरही आरोपींची मागणी थांबली नाही. उलट आणखी पैशांची मागणी करून महिलेला धमकावण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. त्यानंतर आपली आर्थिक फसवणूक झाल्याचे लक्षात येताच महिलेने धारणी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून सलमान आणि आकाश वर्मा यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८(४) तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियमाच्या कलम ६६(ड) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ऑनलाइन व्यवहारांची माहिती आणि आरोपींच्या संपर्काचा तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

# सात घरांवर दुःखाचा डोंगर; खा.अमर काळेंनी दिला धीर

## समृद्धी महामार्गावरील अपघातातील मृतांच्या कुटुंबीयांची घरी जाऊन घेतली भेट

**वर्धा /जनमाध्यम**

समृद्धी महामार्गावरील भीषण अपघातात सात जणांचा मृत्यू झाल्यानंतर खासदार अमर काळे यांनी मृतांच्या घरी जाऊन कुटुंबीयांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले. अचानक झालेल्या या दुर्घटनेने सात कुटुंबांचा आधार हिरावला असून, कुटुंबीयांचा आक्रोश पाहून उपस्थितांचेही मन हेलावून गेले.



खासदार काळे यांनी दत्ता कुरसंगे, प्रवीण बकाने, घनश्याम पाटील, सचिन बादलमवार, ओम गावंडे, मुनेश्वर ढोले आणि रोशन राऊत यांच्या घरी भेट दिली. त्यांनी कुटुंबीयांशी संवाद साधत दुःखात सहभागी असल्याचे सांगितले.

दत्ता कुरसंगे आणि प्रवीण बकाने हे भाजी विक्रीचा व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. त्यांच्या निधनाने कुटुंबांवर आर्थिक संकटही ओढवले आहे. तर ओम गावंडे आणि रोशन राऊत यांच्यासारख्या तरुणांचा अपघातात झालेला मृत्यू परिसराला चटका लावून गेला आहे.या सातही कुटुंबांची परिस्थिती जाणून घेत खासदार काळे यांनी कुटुंबीयांना धीर दिला. अपघातामुळे निर्माण झालेल्या संकटाच्या काळात कुटुंबीयांच्या पाठीशी उभे राहण्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, अपघातात जखमी झालेल्या सतीश खाडे, नयन खानझोडे आणि अमित आडे यांच्या घरीही खासदार काळे यांनी भेट देऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. यावेळी शेखर शेंडे, संदीप किटे, प्रणय कदम, महेश तेलरांधे, उपस्थित होते.

### महामंडळ कागदावर नको, प्रत्यक्षात आणा

# वृत्तपत्र विक्रेत्यांचा ९ ऑक्टोबरला वर्धेत एल्गार

**वर्धा /जनमाध्यम**

ऊन असो वा पाऊस, पहाटेची वेळ असो वा कडाक्याची थंडी, जनतेच्या हातात दररोज वृत्तपत्र पोहोचविणाऱ्या वृत्तपत्र विक्रेत्यांच्या प्रश्नांनी आता आंदोलनाचे रूप घेतले आहे. स्वतंत्र वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी महामंडळ तातडीने कार्यान्वित करावे, या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या वतीने ९ ऑक्टोबर रोजी वर्ध्यात कुटुंबासह भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे.

राज्यातील वृत्तपत्र विक्रेते वर्षानुवर्षे कोणत्याही हवामानाची पर्वा न करता नागरिकांपर्यंत माहिती आणि ज्ञान पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण काम करीत आहेत. मात्र हा कष्टकरी असंघटित कामगार घटक सामाजिक आणि आर्थिक सुरक्षेपासून वंचित असल्याची भूमिका संघटनेने निवेदनातून मांडली आहे. शासनाने वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्यास मंजुरी दिल्याचे सांगण्यात आले असले तरी प्रत्यक्षात महामंडळ कार्यान्वित झालेले नाही. त्यामुळे मंजुरीनंतरही विक्रेत्यांच्या पदरी प्रतीक्षाच असल्याचा संताप व्यक्त होत आहे.

कल्याणकारी महामंडळाच्या माध्यमातून वृत्तपत्र विक्रेत्यांना सामाजिक आणि आर्थिक सुरक्षेच्या योजनांचा लाभ मिळावा, अशी मागणी आहे. शासनाने महामंडळाच्या स्थापनेला मान्यता दिल्यानंतरही त्याच्या प्रत्यक्ष कार्यवाहीला विलंब होत असल्याने विक्रेत्यांमध्ये नाराजी वाढली आहे. आता आश्वासनांवर समाधान न मानता महामंडळ प्रत्यक्ष कार्यान्वित करण्यासाठी रस्त्यावर उतरण्याचा निर्णय संघटनेने घेतला आहे.

म्हाडा कॉलनी ते जिल्हाधिकारी कार्यालय

९ ऑक्टोबर रोजी सकाळी वृत्तपत्र विक्रेता कार्यालय, म्हाडा कॉलनी येथून मोर्चाला सुरुवात होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे. यावेळी जिल्हा प्रशासनाला मागण्यांचे निवेदन देण्यात येणार आहे.या आंदोलनात केवळ विक्रेतेच नव्हे तर त्यांचे कुटुंबीयही सहभागी होणार आहेत. त्यामुळे हा मोर्चा वृत्तपत्र विक्रेत्यांच्या हक्कांसाठीचा व्यापक आवाज ठरणार आहे. राज्यभरातील वृत्तपत्र विक्रेत्यांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.संघटनेचे अध्यक्ष सुनील पाटणकर, सचिव गजानन मसने तसेच वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी संघाच्या पदाधिकाऱ्यांनी विक्रेते आणि त्यांच्या कुटुंबीयांनी मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

# कारंजात दुष्काळाचे पंचनामे सुरु

**वर्धा /जनमाध्यम**

पावसाने ओढ दिल्याने खरीप हंगाम संकटात सापडलेल्या कारंजा घाडगे तालुक्यात अखेर दुष्काळग्रस्त शेतजमिनींच्या नुकसानीचे पंचनामे आणि सर्वेक्षण सुरू झाले आहे. कारंजा तालुक्याचा दुष्काळग्रस्त यादीत उशिरा समावेश झाल्यामुळे या तालुक्यातील पंचनाम्यांचे काम उशिराने सुरू झाले. मात्र आता प्रशासनाने सर्वेक्षणाला सुरुवात केली असून येत्या काही दिवसांत उर्वरित सर्व पंचनामे पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती आर्वीचे आमदार सुमित वानखेडे यांनी दैनिक जनमाध्यमशी बोलताना दिली.

वर्धा जिल्ह्यातील सात तालुक्यांमध्ये यापूर्वीच दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने पंचनाम्यांना सुरुवात झाली होती. कारंजा तालुका सुरुवातीच्या यादीत नसल्याने येथील शेतकऱ्यांमध्ये मदती बाबत चिंता निर्माण झाली होती. त्यानंतर कारंज्याच्या प्रत्यक्ष परिस्थितीचा विचार करून तालुक्याचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करण्यात आला. राज्य शासनाच्या निर्णयानंतर आता कारंज्यातील शेतकऱ्यांच्या शेतातील नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करून नोंद घेण्याचे काम सुरू झाले आहे.

यंदाच्या खरीप हंगामात पावसाचा खंड, पिकांना आवश्यक असलेल्या कालावधीत पावसाची कमतरता आणि त्यानंतर निर्माण झालेल्या प्रतिकूल परिस्थितीचा फटका शेतकऱ्यांना बसला आहे.

कापूस, सोयाबीनसह अन्य खरीप पिकांच्या उत्पादनावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. त्यामुळे पंचनामे केवळ कागदोपत्री न होता प्रत्यक्ष शेताच्या बांधावर जाऊन करण्यात यावेत, अशी शेतकऱ्यांची अपेक्षा आहे.

कारंजा तालुक्याचा समावेश उशिरा झाल्याने पंचनाम्यांचे काम सुरू होण्यास विलंब झाला. मात्र आता सर्वेक्षण सुरू झाले असून कोणताही पात्र शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये यासाठी उर्वरित सर्वेक्षण लवकरात लवकर पूर्ण केले जाईल, असे आमदार सुमित वानखेडे यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, वर्धा जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त सात तालुक्यांमध्ये आतापर्यंत १९ हजार ६१ शेतकऱ्यांचे पंचनामे पूर्ण झाल्याची माहिती आमदार वानखेडे यांनी दिली. उर्वरित शेतकऱ्यांचे पंचनामेही नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यात येणार आहेत.

# चार दशकांची ज्ञानपरंपरा पुन्हा उजळणार

## श्यामसुंदर अग्रवाल स्मृती व्याख्यानमाला ७ व ८ ऑक्टोबरला, हास्यकविता, सकारात्मक जीवनाचा संदेश आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**देवळी/ जनमाध्यम**

देवळी शहरातील बौद्धिक आणि सांस्कृतिक परंपरेला समृद्ध करणारी श्यामसुंदर अग्रवाल स्मृती व्याख्यानमाला यंदाही ७ व ८ ऑक्टोबरला आयोजित करण्यात आली आहे.

साबाजी स्पोर्ट्स असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष स्व. श्यामसुंदरजी अग्रवाल यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मागील ४१ वर्षांपासून ही व्याख्यानमाला सातत्याने आयोजित केली जात आहे. यंदाचे कार्यक्रम सायंकाळी ८.३० वाजता श्यामसुंदर मनालाल धर्मशाळेत होणार आहेत.

बुधवारी ७ ऑक्टोबरला पुसदचे प्रसिद्ध हास्यकवी कपिल जैन 'घडीभर बसा व पोटभर हसा' या विषयावर हास्यकवितांचे सादरीकरण करतील.

माजी खासदार रामदास तडस अध्यक्षस्थानी राहणार असून वर्ध्याचे गीतकार व गझलकार इमरान भाई राही प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील.



गुरुवारी ८ ऑक्टोबरला अमरावतीचे वक्ते व साहित्यिक डॉ. सतीश तराळ 'सकारात्मक जगा, आयुष्य सुंदर आहे' या विषयावर मार्गदर्शन करतील. आमदार राजेश बकाने अध्यक्षस्थानी राहणार असून विदर्भ साहित्य संघाचे माजी अध्यक्ष प्रदीप दाते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील.

या कार्यक्रमात देवळीतील शाळांमधून दहावी व बारावी परीक्षेत प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांना स्व. गायत्री देवी अग्रवाल स्मृती पारितोषिक, तर विज्ञान, कला व वाणिज्य पदवी परीक्षेत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना स्व. अशोक श्यामसुंदर अग्रवाल स्मृती पारितोषिक देऊन गौरविण्यात येणार आहे.

या ज्ञान आणि साहित्याच्या पर्वाचा नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन साबाजी स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष मोहन अग्रवाल व सदस्यांनी केले आहे.

## लोकशक्ती पार्टीची भंडारा जिल्हा कार्यकारिणी बरखास्त

**भंडारा -** लोकशक्ती पार्टीची भंडारा जिल्हा व तालुका कार्यकारिणी बरखास्त करून नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यावेळी वंचित बहुजन आघाडी आणि काँग्रेसमधील अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सतीश लोनारे यांच्या नेतृत्वात लोकशक्ती पार्टीत प्रवेश केला. आगामी पंचायत समिती आणि नगर परिषद निवडणुका स्वबळावर लढण्याची तयारी पक्षाने दर्शविली. रामविलास पासवान यांच्या विचारांचा झेंडा विदर्भात फडकविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. तसेच शिक्षकांसह विविध क्षेत्रातील नागरिकांनी पक्षात प्रवेश केला. भंडारा जिल्हाध्यक्षपदी श्रीकांत नागदेवे यांची नियुक्ती करण्यात आली. याशिवाय सर्व तालुका अध्यक्ष, महिला आघाडी, युवा, क्रीडा व सांस्कृतिक, कायदा आणि किसान सेलच्या अध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली.

## सत्य, अहिंसा आणि राष्ट्रसेवेच्या विचारांना अभिवादन

**हिंगणघाट-** स्थानिक आमदार समीर



कुणावार यांच्या जनसंपर्क कार्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारतरत्न माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम झाला. उपस्थित मान्यवरांनी दोन्ही महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.

महात्मा गांधींचा सत्य, अहिंसा आणि मानवतेचा संदेश, तसेच लालबहादूर शास्त्री यांचे साधेपण, प्रामाणिकपणा आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा आजच्या पिढीसाठीही महत्त्वाची असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले. कार्यक्रमाला आमदार समीर कुणावार यांच्यासह ज्येष्ठ कार्यकर्ते व पत्रकार प्रा. किरण वैद्य, ग्रामीण तालुकाध्यक्ष विनोद विटाळे, नगरपालिकेचे उपाध्यक्ष निलेश ठोंबरे, गटनेते भूषण पिसे, अशोक देवाडे, विश्व हिंदू परिषदेचे शरद कोणप्रतिवार, देवा वाघमारे, इखार काकाजी यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## सक्षम महिला पतसंस्थेत गांधी-शास्त्री जयंती कार्यक्रम

**हिंगणघाट :** नागपूर रोडवरील अब्दुल्ला हाइट येथील सक्षम महिला नागरीक सहकारी पतसंस्थेत राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष अनिलराव बुरांडे होते. प्रमुख पाहुणे प्रफुल कांबळे, राजेश वाघमारे आणि देवेंद्र शेगोकार यांच्या हस्ते महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री तसेच थोर पुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन



करण्यात आले.

देवेंद्र शेगोकार यांनी प्रास्ताविक केले. अनिल बुरांडे यांनी गांधी आणि शास्त्री यांच्या कार्याचा गौरव करत देशाला अशा महान व्यक्तिमत्त्वांच्या विचारांची आजही गरज असल्याचे सांगितले. प्रमुख वक्त्यांनी त्यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. संचालन राजेश वाघमारे यांनी केले. आभार प्रफुल कांबळे यांनी मानले. कर्मचारीवृंदाच्या सहकार्याने कार्यक्रम उत्साहात पार पडला.

## इंडियन मिलिटरी स्कूल

**पुलगाव :** इंडियन मिलिटरी स्कूलमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती देशभक्तीच्या वातावरणात साजरी करण्यात आली. कमांडंट कर्नल के. एच. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाची सुरुवात गांधी आणि शास्त्री यांच्या प्रतिमांचे पूजन व माल्यार्पणाने झाली. प्राचार्य नितीन कोठे, उमेश खंडार आणि मनोज लोटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी कॅडेट्सनी दोन्ही महापुरुषांच्या जीवनकार्यावर मनोगत व्यक्त केले. गांधीजींचा सत्य आणि अहिंसेचा मार्ग तसेच शास्त्रीजींचा 'जय जवान, जय किसान'चा संदेश विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे मांडला. कर्नल पाटील यांच्यासह मान्यवरांनी कॅडेट्सना देशसेवा, शिस्त आणि प्रामाणिकपणाचे संस्कार आत्मसात करण्याचे आवाहन केले. विजय हागे



यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला.

## ग्राहक पंचायतच्या शाखेची नवी कार्यकारिणी जाहीर



**हिंगणघाट/ जनमाध्यम**

अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या हिंगणघाट शाखेची नवी कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली. यशवंतनगर येथील ग्राहक पंचायत कार्यालयात किशोर मुटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सर्वानुमते अरुण पंडित गुरुजी यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली.इंजि. राजाभाऊ गौळकार यांची उपाध्यक्षपदी, महेशबाबू खडसे यांची सचिवपदी, तर एल. एस. डहाके यांची कोषाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. श्याम घोडवैद्य यांच्याकडे सहसचिवपद, किशोर सिंगरू यांच्याकडे संपर्कप्रमुख, त्र्यंबकजी ऐटीवार यांच्याकडे आयटी प्रमुख आणि पत्रकार केशव तितरे यांच्याकडे प्रसिद्धीप्रमुखपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. बंडूजी घिये रोजगार सृजन, तर माजी प्राचार्य वासुदेवजी त्रिवेदी यांची पर्यावरण प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली.

सभासद म्हणून अरुण वाघमारे, पुंडलीकराव काटकर, रामदासजी खडगी, चंद्रकांत कामडी, शंकरराव वाकडे, कमलाकर बोकडे, दामोधर चंदनखेडे, भाऊराव कोटकर आणि प्रफुल्ल क्षीरसागर यांची निवड झाली. महेशजी दीक्षित यांची मार्गदर्शक म्हणून नियुक्ती करण्यात आली.नवीन कार्यकारिणीच्या माध्यमातून ग्राहक पंचायतचे कार्य अधिक व्यापक करण्याचा निर्धार पदाधिकारी व सभासदांनी व्यक्त केला. यावेळी सर्वांनी माजी प्राचार्य तथा ग्राहक पंचायत प्रमुख स्व. पांडुरंगजी मुडे गुरुजी यांच्या कार्याच्या आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमाचे संचालन पत्रकार केशव तितरे यांनी केले.

# गांधी जयंतीत जागल्या बापूंच्या आठवणी ; सोलर चरखा ठरला आकर्षण

## दुर्मिळ छायाचित्रांतून बापूंच्या आठवणी जाग्या; सोलर चरखा अन् कुंभार चाकाने वेधले वर्धेकरांचे लक्ष

**वर्धा /जनमाध्यम**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५७ व्या जयंतीनिमित्त वर्धा जिल्हा सर्वोदय मंडळाच्या वतीने गांधी पुतळा परिसरात आयोजित कार्यक्रमात गांधीविचारांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत स्वावलंबनाचा संदेश देण्यात आला. दुर्मिळ छायाचित्रे आणि गांधीजींच्या विचारांचे प्रदर्शन, तसेच सौरऊर्जेवर चालणाऱ्या चरख्याचे आणि कुंभार चाकाचे प्रात्यक्षिक हे कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले.

महात्मा गांधींच्या जीवनातील विविध प्रसंग, त्यांचा संघर्ष, सत्य आणि अहिंसेचा मार्ग तसेच ग्रामस्वराज्य आणि स्वावलंबनाची संकल्पना दुर्मिळ छायाचित्रांच्या माध्यमातून नागरिकांसमोर उलगडण्यात आली. प्रदर्शन पाहताना विद्यार्थी, युवक आणि नागरिकांनी गांधीजींच्या विचारांचा इतिहास जवळून अनुभवला. बापूंचे विचार केवळ पुस्तकांच्या पानांमध्ये न राहता आजच्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या



उपक्रमातून करण्यात आला.

महात्मा गांधी ग्रामीण औद्योगिकीकरण संस्थेसोबत संयुक्तपणे आयोजित उपक्रमात सोलर चरखा आणि सोलर कुंभार चाकाचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. सौरऊर्जेच्या माध्यमातून पारंपरिक चरखा चालविणे आणि त्याच ऊर्जेवर कुंभार चाक फिरवून मातीच्या वस्तू तयार करण्याची प्रक्रिया नागरिकांनी उत्सुकतेने पाहिली. गांधीजींनी मांडलेल्या स्वावलंबनाच्या विचारांना आधुनिक विज्ञान आणि पर्यावरणपूरक ऊर्जेची जोड देण्याचा हा प्रयोग लक्षवेधी ठरला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशवंत संस्थेचे अध्यक्ष समीर देशमुख होते. सेवानिवृत्त वाणिज्य निरीक्षक त्र्यंबक पुष्पलवार आणि चार्टर्ड अकाउंटंट नितीन मूंदडा यांची प्रमुख उपस्थिती होती. रूपाली सचिन उगले यांच्या भावपूर्ण गीत सादरीकरणाने कार्यक्रमस्थळी गांधीमय वातावरण निर्माण झाले.

प्रदर्शनाला राज्यमंत्री पंकज भोयर, जिल्हाधिकारी वानमती सी., नगरपरिषदेचे मुख्याधिकारी देशमुख, नगराध्यक्ष सुधीर पांगुळ आणि माजी नगराध्यक्ष नीरज गुजर यांनी भेट देत प्रदर्शनाची पाहणी केली.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी नीरज गुजर, सिद्धू मून, राजू लोहवे, सुनील मानकर, मांगेश कांबळे, राजू भाऊ, योगेश महंतारे, राजेश बाळसराफ, महेंद्र बमनोटे, बलराज लोहवे, राजीव वानखेडे, भाग्यश्री वानखेडे, अर्चित निघडे, प्रफुल्ल कुकडे, नितीन कठाने आणि सचिन उगले यांनी सहकार्य केले.वर्धा जिल्हा सर्वोदय मंडळाचे अध्यक्ष मंगेश भोंसले आणि मंत्री कन्हैया छांगाणी यांच्या मार्गदर्शनातून कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले.

**विचारांचे स्मरण नव्हे, आचरणाचा संदेश**

गांधी जयंती म्हणजे केवळ महात्मा गांधींच्या प्रतिमेला अभिवादन करण्याचा दिवस न राहता त्यांच्या विचारांना वर्तमान जीवनाशी जोडण्याचा संकल्प व्हावा, या उद्देशाने उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. सत्य, अहिंसा, स्वावलंबन, ग्रामविकास आणि पर्यावरणपूरक जीवनपद्धतीचा संदेश देणारे प्रदर्शन आणि सौरऊर्जेची प्रात्यक्षिके यामुळे गांधीविचारांना आधुनिक संदर्भ मिळाला. बापूंच्या आठवणींना उजाळा देतानाच नव्या पिढीसमोर स्वावलंबनाची नवी दिशा ठेवणारा हा उपक्रम ठरला.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक,प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती -४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा ४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक -प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त)-अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष -१४ अंक -३०८**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/ २०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालयः-** अंबापेठ, राजकमल चौक,
अमरावती-४४४६०१
फोन -९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### कुऱ्हा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात म.गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती

**कुऱ्हा-** स्थानिक अशोक शिक्षण संस्था, अशोकनगरद्वारा संचलित कुऱ्हा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, कुऱ्हा येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहपूर्ण व भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या प्राचार्या आर.जी.कुमरे होत्या. प्रमुख अतिथी म्हणून सेवानिवृत्त शिक्षक सी.बी.चौधरी, या.ग.जगताप, सोमेश्वर पत्रे, ए. बी. चांबटकर तसेच प्रा.एस.पी.ढोले उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांचे पूजन आणि दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सुंदर भजने सादर केली. यामध्ये सोम्या बघेल, आनंदी मुरायते, चेहक मुरायते, प्रणाली वानरे, महिमा साखी, श्रावणी ठवकर, तनिष्का इखार, वेदिका सपाटे, सान्वी धर्माळे, ऋतिका जारी, श्रावस्ती ढोणे, अनुष्का बोरकर आदी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यानंतर प्रमुख अतिथी सी.बी.चौधरी,जगताप दादा व सोमेश्वर पत्रे यांनी सुमधुर भजने सादर करून उपस्थितांची मने जिंकली.कार्यक्रमाचे संचालन पी. एम. राऊत यांनी प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन कु. जे. पी. निमकर मॅडम यांनी केले.या कार्यक्रमाला विद्यालयातील सर्व विद्यार्थी व शिक्षकवृंद उपस्थित होते. यामध्ये व्ही.आर.इंगोले, एन.डी. राठोड, एस.व्ही.चौधरी, के.एन.ढगे, एच.बी.जाधव, एस.ए.पारवे, एस.एस.चव्हाण, एस.एस.इरपाते, प्रा.एन.एस.घुणारे, प्रा.एम.एच.वाळके, प्रा.एस.आर.जिरापुरे, प्रा.एस.पी.रवाळे आदींची उपस्थिती होती.



### टायटन्स पब्लिक स्कूलमध्ये गांधी-शास्त्री जयंती उत्साहात

**अंजनगाव बारी-** विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीद्वारा संचालित टायटन्स पब्लिक स्कूलमध्ये महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य अजय चौबे यांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. विद्यार्थिनी श्रेया लांडोरे हिने कार्यक्रमाचे संचालन केले. शिक्षिका रोशनी चोकडे यांनी दोन्ही नेत्यांच्या जीवनकार्यावर व विचारांवर प्रकाश टाकला. यावेळी कृष्णाली व रुचा होले यांनी प्रेरणादायी भाषणे सादर केली. इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी समूहगीत देशभक्तीपर गीतावर नृत्य सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.



### सावरखेड पिंगळाई साफल्य विद्यालयात मराठी अभिजात भाषा साजरा

**लेहेगाव-** साफल्य विद्यालय सावरखेड पिंगळाई येथे मराठी अभिजात भाषा दिन साजरा करण्यात आला. सर्वप्रथम साफल्य विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनींनी मराठी भाषिक ग्रंथांचे पूजन केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक नरेंद्र भि. सुळे यांनी मराठी मायबोली तसेच मराठी अभिजात भाषा दिनाचे महत्व सविस्तरपणे विशद केले. मराठी अभिजात भाषा दिन सप्ताह यामध्ये कोण कोणते उपक्रम घ्यायचे आहे, याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. विद्यालयातील विद्यार्थिनी प्रणिता नरेंद्र आठवले,अदिती प्रवीण वानखडे,सावरी महेंद्र वानखडे,आनंदी विजय गवळी,सिमरन शेख नसीर,आरुषी वसंत मीना,उन्नती चंद्रशेखर काळबांडे,कोमल उमेश आठवले,भविष्य फरकाडे,सार्थक वानखडे इत्यादींनी मराठी अभिजात भाषा दिनाचे महत्त्व या विषयावर वक्तृत्व स्पर्धेत सहभाग नोंदविला. विद्यालयातील शिक्षक एस.व्ही.गुंजीटे, डी.पी.कातलाम,योगिता पुं. हिरुळकर इत्यादींनी परिसंवादामध्ये सहभाग घेतला. या मराठी अभिजात भाषा दिनाच्या कार्यक्रमामध्ये विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता प्रयोगशाळा परिचय आर.बी.मालपे,शिपाई बी. ओ. ठाकूर यांनी प्रयत्न केले.

# अवैध दारू विक्रीला कोणाचा वरदहस्त?

## पोलिस कारवाईनंतर राज्य उत्पादन शुल्क विभाग चर्चेत

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

अंजनगाव सुर्जी तालुक्यात गावोगावी फोफावलेल्या अवैध दारू विक्रीला मुबलक दारूचा पुरवठा नेमका कुठून होतो, हा गेल्या अनेक महिन्यांपासूनचा प्रश्न अखेर रहिमापूर-चिंचोली पोलिसांच्या धडक कारवाईमुळे उघडकीस आला आहे. तालुक्यातील अधिकृत देशी दारू परवानाधारक विक्रेतेच अवैध पद्धतीने दारूच्या पेट्या अवैध व्यावसायिकांना पुरवत असल्याचे धक्कादायक वास्तव या कारवाईत समोर आले आहे.गेल्या काही महिन्यांपासून अंजनगाव सुर्जी तालुक्यातील जवळपास प्रत्येक गावात अवैध दारू विक्रीचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात वाढला होता. देशी-विदेशी दारूची खुलेआम विक्री सुरू असल्याने सामान्य नागरिक आणि विशेषतः महिला वर्गात तीव्र संताप व्यक्त केला जात होता. इतक्या मोठ्या प्रमाणात दारूचा साठा येतो कुठून, याबाबत अनेक तर्कवितर्क लावले जात होते.




अखेर रहिमापूर-चिंचोली पोलिसांनी केलेल्या कारवाईने या अवैध धंद्याच्या मुळापर्यंत पोहोचण्यात यश मिळवले आहे.रहिमापूर-चिंचोली पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे तालुक्यातील अवैध दारू विक्रीच्या रॅकेटची एक साखळी उघड झाली असली तरी, यामागे आणखी किती देशी दारू परवानाधारक सहभागी आहेत याबाबतची चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

**उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह**

या संपूर्ण प्रकरणामुळे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यप्रणालीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. परवानाधारक देशी दारू दुकानांची नियमित तपासणी केली जात नाही का? की या अवैध धंद्याला मूक संमती दिली जात आहे, असा सवाल उपस्थित होत आहे.

अंजनगाव सुर्जी तालुका हा अचलपूर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अंतर्गत येतो. विशेष म्हणजे या विभागातील एका अधिकाऱ्यावर काही दिवसांपूर्वीच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केली होती. त्यामुळे हा विभाग आधीच चर्चेत होता. आता पुन्हा परवानाधारक दुकानदारच अवैध पद्धतीने दारूच्या पेट्या विकत असल्याचे समोर आल्याने हा विभाग पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे.

## 'स्वच्छ, सुंदर, रोगमुक्त ग्रामस्थ घडवूया; गांधीजींचे विचार जनसामान्यात रुजवूया'- राणी माळवे

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त सेवा संकल्प अभियानांतर्गत मालखेड येथे ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात आले. ग्रामस्वच्छतेतून महात्मा गांधींना आगळीवेगळी आदरांजली वाहत ग्रामस्थ, शालेय विद्यार्थी तसेच विविध विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी स्वच्छता मोहिमेत उत्स्फूर्त सहभाग घेतला.



'स्वच्छ, सुंदर आणि रोगमुक्त ग्रामस्थ घडवायचे असतील तर स्वच्छतेची सुरुवात स्वतःपासून केली पाहिजे. महात्मा गांधीजींचे स्वच्छतेचे विचार प्रत्येक नागरिकाने आचरणात आणून ते जनसामान्यांपर्यंत पोहोचवले पाहिजेत,' असे प्रतिपादन गट विकास अधिकारी राणी माळवे यांनी यावेळी केले. राज्य शासनाच्या 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत विविध लोकोपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहेत. सेवा, जनतेची आणि विकास सर्वांचा या संकल्पनेतून रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, आरोग्य तपासणी यांसह विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

गट विकास अधिकारी राणी माळवे यांच्या नेतृत्वाखाली पंचायत समितीची संपूर्ण चमू मालखेड येथे दाखल झाली. अधिकारी-कर्मचारी, ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांनी गावातील विविध भागात स्वच्छता करून नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले.ग्रामस्वच्छता अभियानादरम्यान जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यालयातील विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करून स्वच्छतेचे महत्त्व जनसामान्यांना पटवून दिले. कचरा व्यवस्थापन, वैयक्तिक स्वच्छता, सार्वजनिक ठिकाणची स्वच्छता आणि आरोग्य याबाबत विद्यार्थ्यांनी प्रभावी संदेश दिला.

यावेळी सहाय्यक गट विकास अधिकारी संजय खारकर, विस्तार अधिकारी तथा प्रशासक सुरेश चव्हाण, विस्तार अधिकारी मेश्राम यांच्यासह ग्रामपंचायत अधिकारी साधना सोनोने, माजी सरपंच लता पाटील, कल्पना निचत, लता डोक, माजी ग्रामपंचायत सदस्य मृणालिनी देशमुख, प्रणिता डकरे, अनिल सोनटक्के, विनोद निचत, पोलीस पाटील एम. व्ही. माहुरे, कृषी सहाय्यक पवनसिंह राठोड यांच्यासह मालखेड गावात कार्यरत अधिकारी-कर्मचारी, ग्रामपंचायत कर्मचारी, शालेय शिक्षक, विद्यार्थी, माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

## कृषीविषयक ॲपचे कृषिदूतांकडून प्रात्यक्षिक

**नांदगाव खंडेश्वर -** ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय, अमरावती येथील कृषिदूत विद्यार्थ्यांकडून अंजनगाव बारी येथे शेतकऱ्यांसाठी कृषीविषयक मोबाईल अप्सच्या वापराबाबत प्रात्यक्षिक व मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यामध्ये शेतकऱ्यांना मोबाईलच्या माध्यमातून शेतीविषयक आधुनिक माहिती सहज उपलब्ध करून देणाऱ्या विविध कृषी ॲप्सचा उपयोग कसा करावा, याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक देण्यात आले. कृषी तंत्रज्ञान, पीक व्यवस्थापन तसेच शासकीय कृषी योजना याबाबत माहिती मिळवण्यासाठी मोबाईल ॲप्सचा प्रभावी वापर करण्याचे मार्गदर्शन करण्यात आले. कृषिदूत विद्यार्थ्यांनी ॲप डाउनलोड करणे, नोंदणी करणे, आवश्यक माहिती शोधणे तसेच उपलब्ध सुविधांचा वापर कसा करावा याचे शेतकऱ्यांना प्रत्यक्ष दाखवून दिले. डिजिटल तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास शेतकऱ्यांना वेळेवर व उपयुक्त कृषी माहिती मिळण्यास मदत होऊ शकते, असे यावेळी सांगण्यात आले. या उपक्रमामागील उद्देश शेतकऱ्यांना डिजिटल कृषी तंत्रज्ञानाशी जोडणे आणि आधुनिक शेतीमध्ये मोबाईल ॲप्सचा प्रभावी वापर करण्यासाठी प्रोत्साहित करणे हा होता. कार्यक्रमास शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमासाठी प्राचार्य डॉ. अनिल ठाकरे, उपप्राचार्य नितेश चौधरी, कार्यक्रम अधिकारी श्वेता देशमुख व अदिती रजाने यांचे मार्गदर्शन लाभले.



## भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालयात संत गाडगेबाबा, म.ज्योतिराव फुले यांच्या जीवनकार्यावर प्रबोधनात्मक कार्यक्रम



**परतवाडा-** भारतीय विद्यामंदिर अमरावतीद्वारा संचालित भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा, बाबासाहेब सोमवंशी कनिष्ठ महाविद्यालय, एच.एस.सी. व्होकेशनल, अचलपूर कॅम्प, परतवाडा यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथील संत गाडगेबाबा अध्यासन केंद्र आणि महात्मा ज्योतिराव फुले द्विशताब्दी जयंतीवर्ष आयोजन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने 'संत गाडगेबाबा दुर्मिळ छायाचित्र प्रदर्शन व प्रबोधन' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचा प्रमुख विषय 'महात्मा ज्योतिराव फुले व संत गाडगेबाबा यांचे जीवनकार्य' हा असून, या माध्यमातून विद्यार्थ्यांना तसेच उपस्थितांना या दोन महान समाजसुधारकांच्या विचारांची, कार्याची आणि सामाजिक योगदानाची सखोल ओळख करून देण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे संत गाडगेबाबा यांच्या जीवनाशी संबंधित दुर्मिळ छायाचित्रांचे प्रदर्शन. या कार्यक्रमाचे मुख्य वक्ते प्रसिद्ध साहित्यिक डॉ. सतीश तराळ असून त्यांनी महात्मा ज्योतिराव फुले आणि संत गाडगेबाबा यांच्या जीवनकार्यावर प्रबोधनपर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर हे होते. कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून रा. भा. महाजन, माजी प्राचार्य तर प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. भैय्यासाहेब मेटकर, डॉ. काशिनाथ बऱ्हाटे, रविंद्र हरणे (पथ्रोट) तसेच डॉ. दिलीप काळे, अरविंद हरणे, गजानन येवले, बाजीराव गवई यांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. दयाश्री कोकाटे, राष्ट्रीय सेवा योजना महिला कार्यक्रम अधिकारी व त्यांच्या सहकारी प्रा. प्रीती नवरे, डॉ. प्रिया सगणे यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षकेतर, कर्मचारी आणि विद्यार्थी वर्ग यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम पार पडला.

## प्रा. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, येथे विद्यार्थी इंडक्शन कार्यक्रम

**अमरावती/का.प्र.**

प्रा. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, बडनेरा-अमरावती (स्वायत्त संस्था, नॅक 'ए प्लस' मानांकनप्राप्त) येथील सायन्स अँड ह्युमॅनिटीज विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी बहुआयामी विद्यार्थी इंडक्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष ॲड.उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी, व्यवस्थापनातील नितीन हिवसे, डॉ. पूनम चौधरी, पंकज देशमुख, प्रा. विनय गोहाड, प्रा. गजानन काळे आणि प्राचार्य डॉ.ए.पी. ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.




प्राचार्य डॉ. ए. पी. ठाकरे यांच्या स्वागतपर भाषणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. ग्रंथपाल डॉ. एस. ए. बेजलवार यांनी ग्रंथालय व ज्ञानसंसाधनांची माहिती दिली. अधिष्ठाता (शैक्षणिक) डॉ.पी.एस.चौधरी व परीक्षा नियंत्रक डॉ.एस.बी. मोहोड यांनी परीक्षा पद्धती व अभ्यासक्रमाबाबत मार्गदर्शन केले. विभागप्रमुख डॉ.ए.व्ही. कडू यांनी विभागाची माहिती दिली. कार्यक्रमात योग, ध्यानधारणा, क्रीडा, मानसिक आरोग्य, ताण व्यवस्थापन, व्यक्तिमत्त्व विकास,नेत्रदान,विद्यार्थी क्लब,पॉश कायदा, रॅगिंगविरोधी नियम, भारतीय ज्ञान प्रणाली, सार्वत्रिक मानवी मूल्ये, सायबर सुरक्षा, विकासात्मक मानसिकता आणि उद्योजकता विकास अशा विविध विषयांवर मा गदर्शन करण्यात आले. डॉ. सूरज हिरे, रूपेश रेंगे, स्वप्निल अरुण गावंडे,अमर काटोरे, डॉ. ज्ञानेश्वर गडकर, प्रा.पी.व्ही. खांडवे, डॉ.लव्हली सिंग, प्रा.ए.एस.खान आणि प्रा.जी.एम. आवारे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. राष्ट्रीय वादविवाद विजेती समृद्धी रोडे हिच्यासोबत संवाद तसेच विविध विभागांना भेटींचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रम सत्र समन्वयक डॉ.एम.आय. बेग, विभागप्रमूख डॉ.ए. व्ही.कडू आणि प्राचार्य डॉ.ए.पी. ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीरीत्या पार पडला.

# कमी पावसामुळे धारणी तालुक्यात जलसाठ्याची चिंता

## पाणी अडविण्याचे नियोजन तातडीने करण्याची गरज

**धारणी/वार्ताहर**

यावर्षी पर्जन्यमान कमी झाल्याने धारणी तालुक्यात अपेक्षित प्रमाणात पाऊस झालेला नाही. डोंगराळ आणि उंच-सखल भौगोलिक परिस्थिती असलेल्या या तालुक्यात पावसाच्या प्रमाणाचा परिणाम थेट जलसाठ्यांवर झाला आहे. तालुक्यातील विविध ठिकाणी असलेल्या सिंचन तलावांमध्ये काही प्रमाणात पाणीसाठा झाला असला तरी सध्या प्रत्येक तलावातील पाण्याची पातळी कमी-जास्त प्रमाणात दिसून येत आहे. त्यातच उष्ण आणि कोरड्या हवामानामुळे आगामी पावसाळ्यापर्यंत उपलब्ध पाणी पुरेल की नाही, याबाबत आतापासूनच चिंता व्यक्त केली जात आहे.

तालुक्यातील कावरा प्रकल्प, गंभेरी, दुनी, मोगरदा आणि नांदुरी तलाव हे महत्त्वाचे सिंचन जलसाठे आहेत. सध्या या तलावांमध्ये उपलब्ध असलेल्या पाण्याचे प्रमाण ठिकठिकाणी वेगवेगळे असले तरी पाण्याचा वापर योग्य पद्धतीने आणि काटकसरीने केला, तर पावसाळ्यापर्यंत पाणी उपलब्ध राहू शकते. मात्र त्यासाठी आतापासूनच पाणी वापराचे नियोजन करणे आवश्यक आहे. पाण्याचा अनावश्यक वापर टाळण्याबरोबरच उपलब्ध जलसाठ्याचे संरक्षण करण्याकडे प्रशासनाने विशेष लक्ष देणे गरजेचे आहे.

या प्रत्येक सिंचन तलावाच्या आजूबाजूला अनेक गावे वसलेली आहेत. या गावांतील नागरिकांसोबतच मोठ्या प्रमाणावर जनावरेही याच जलसाठ्यांवर अवलंबून असतात. उन्हाळ्याच्या कालावधीत पाण्याची मागणी वाढत असल्याने उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक ठरणार आहे. पिण्याचे पाणी, जनावरांचे पाणी आणि दैनंदिन गरजा यांना प्राधान्य देत पाण्याचा वापर करण्याची गरज आहे. आवश्यक बाबी वगळता इतर कामांसाठी या जलसाठ्यातील पाण्याचा वापर होऊ नये, यासाठी संबंधित यंत्रणांनी दक्ष राहणे गरजेचे आहे.



यावर्षी पाऊस कमी झाल्याने तालुक्यात अनेक भागांत पाण्याची टंचाई जाणवण्याची शक्यता आहे. त्यामुळे उपलब्ध जलसाठ्याचा वापर बांधकामासारख्या कामांसाठी कोणत्याही परिस्थितीत होणार नाही, याची दक्षता तालुका प्रशासनाने घेणे आवश्यक आहे. पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांवर अतिरिक्त भार पडणार नाही आणि नागरिकांना उन्हाळ्यात पाण्यासाठी त्रास सहन करावा लागणार नाही, यासाठी प्रशासनाने आतापासूनच नियोजन करण्याची गरज आहे.

धारणी तालुक्यातील सिपना नदी, गडगा नदी आणि डवाल नदी तसेच गावागावातून वाहणाऱ्या लहान-मोठ्या नद्यांवर विविध ठिकाणी कोल्हापुरी बंधारे बांधण्यात आले आहेत. या बंधाऱ्यांमध्ये पाणी अडवून त्याचा योग्य प्रकारे उपयोग केल्यास परिसरातील पाण्याची उपलब्धता काही प्रमाणात वाढू शकते. त्यामुळे नदी-नाल्यांमधून वाहून जाणारे पाणी अडविण्यासाठी असलेल्या बंधाऱ्यांची पाहणी करून आवश्यक त्या ठिकाणी तातडीने पाणी अडविण्याचे नियोजन करणे गरजेचे आहे.

तालुका प्रशासनाने आजपासूनच संबंधित पाणीपुरवठा विभागाला आवश्यक सूचना देऊन उपलब्ध जलस्त्रोतांचे संरक्षण, कोल्हापुरी बंधाऱ्यांमध्ये पाणी अडविणे, पाण्याचा अनावश्यक वापर रोखणे आणि गावनिहाय पाणी नियोजन करण्याच्या दृष्टीने ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. कमी पावसाच्या पार्श्वभूमीवर उन्हाळ्यापूर्वीच योग्य नियोजन झाले, तर पुढील काळात निर्माण होणाऱ्या पाणीटंचाईची तीव्रता कमी करता येऊ शकते.ङङ

धारणी तालुका डोंगराळ आणि दुर्गम भागात असल्याने येथील अनेक गावांसाठी उपलब्ध स्थानिक जलस्त्रोत अत्यंत महत्त्वाचे आहेत.

त्यामुळे जलसाठे संपण्याची वाट न पाहता त्यांचे योग्य व्यवस्थापन आणि पाणी अडविण्याची कामे वेळेत करणे आवश्यक आहे. पावसाळा सुरू होईपर्यंत उपलब्ध पाण्याचे नियोजन योग्य प्रकारे झाले, तर नागरिकांसह जनावरांसाठीही पाण्याची उपलब्धता कायम ठेवता येईल. मात्र त्यासाठी प्रशासन, संबंधित विभाग आणि स्थानिक नागरिक यांच्यात समन्वय असणे तितकेच महत्त्वाचे आहे.

कमी पर्जन्यमानाच्या पार्श्वभूमीवर धारणी तालुक्यातील जलसाठ्यांकडे आतापासूनच गांभीर्याने पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. पाणी अडवा, पाणी जपून वापरा आणि उपलब्ध जलस्त्रोतांचे संरक्षण करा, या दृष्टिकोनातून प्रशासनाने तातडीने कार्यवाही करण्याची गरज आहे. आता तालुका प्रशासन याबाबत कोणती ठोस पावले उचलते आणि उन्हाळ्यातील संभाव्य पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी कोणते नियोजन केले जाते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# बनावट कागदपत्रे तयार करून परस्पर प्लॉटची विक्री

## १२ लाखांची फसवणूक; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** मालकी हक्काचे मूळ दस्तऐवज मालकाकडे असतानाही बनावट कागदपत्रे तयार करून दुसऱ्याच्या नावावरील प्लॉटची परस्पर विक्री केल्याचा धक्कादायक प्रकार नांदगावपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आला आहे. या व्यवहारातून तब्बल १२ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचा आरोप असून, रेल्वे कर्मचारी संतोष रमेश पुसतकर (वय ४९, रा. जळगाव) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संतोष पुसतकर यांच्या वडिलांच्या नावावर वडगाव माहुरे परिसरात प्लॉट क्रमांक ६१ असून, तो सर्व्हे क्रमांक २६/२/८२ मध्ये आहे. या प्लॉटशी संबंधित मूळ कागदपत्रे पुसतकर यांच्या ताब्यातच असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

मात्र, असे असतानाही आरोपींनी संगनमत करून पुसतकर यांच्या वडिलांच्या नावाने एका बनावट व्यक्तीला उभे केले. त्यानंतर संबंधित व्यक्तीच्या नावाचा वापर करून बनावट दस्तऐवज तयार करण्यात आले. या कागदपत्रांच्या आधारे उपनिबंधक कार्यालयात व्यवहार करण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. यानंतर पुसतकर यांच्या वडिलांच्या मालकीचा प्लॉट परस्पर दुसऱ्या ☞(पान २ वर)

अमरावती शिक्षक मतदारसंघ निवडणूक

## महायुतीचे उमेदवार किरण सरनाईक सोमवारी नामांकन अर्ज सादर करणार

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती विभागीय शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी महायुतीचे उमेदवार तथा शिवसेना (शिंदे गट)चे उमेदवार किरण सरनाईक हे सोमवार, दि. ५ ऑक्टोबर २०२६ रोजी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे आपला नामांकन अर्ज सादर करणार आहेत.



नामांकन अर्ज दाखल करण्यापूर्वी बडनेरा-अमरावती जुना बायपास रोडवरील मनोर मांगल्य मंगल कार्यालय, अमरावती येथे सकाळी ११ वाजता नामांकन सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेस शिवसेना (शिंदे गट), भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तसेच महायुतीतील घटक पक्षांचे अमरावती विभागातील खासदार, आमदार, जिल्हाध्यक्ष, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

अमरावती विभागातील शिक्षक बंधू-भगिनींनी या नामांकन सभेस मोठ्या संख्येने ☞(पान २ वर)

## योगीराज नगरात धक्कादायक प्रकार; बागेत आढळले अर्भकाचे अवशेष

### -गाडगेनगर पोलिसांकडून तपास सुरू

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील शिव कॉलनी परिसरात बागेतील झाडांना पाणी देण्यासाठी गेलेल्या महिलेच्या निदर्शनास अर्भकाचा मृतदेह आल्याने परिसरात खळबळ उडाली. योगीराज नगरातील मोकळ्या भूखंडावरील बागेत रविवारी (दि.४) सकाळी हा प्रकार उघडकीस आला. अर्भकाचे वय अंदाजे चार ते साडेचार महिने असल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित महिला सकाळच्या सुमारास बागेतील झाडांना पाणी देत होती. त्यावेळी तेथे खेळत असलेल्या कुत्र्याच्या पिलांच्या तोंडात पॉलिथिनसदृश वस्तू



असल्याचे तिला दिसले. कुत्र्याने ती वस्तू केळीच्या झाडाखाली टाकल्यानंतर ती चावत असल्याचे महिलेच्या लक्षात आले. सुरुवातीला लाल रंगाचे रबरी खेळणे असावे, असा तिचा समज झाला. मात्र, जवळ जाऊन पाहणी केली असता वस्तुस्थिती वेगळी असल्याचे स्पष्ट झाले. ती वस्तू मानवी अवयव असल्याचे दिसून आल्यानंतर महिलेने अधिक बारकाईने पाहिले. त्यावेळी ते डोके नसलेल्या अर्भकाचे शरीर असल्याचे तिच्या निदर्शनास आले. या घटनेची माहिती गाडगेनगर पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी पाहणी करून आवश्यक प्रक्रिया सुरू केली. अर्भकाच्या शरीराचे हात-पाय विस्कळीत अवस्थेत असल्याचे पोलिसांच्या नोंदीत नमूद आहे. संबंधित महिलेच्या जबानीवरून गाडगेनगर पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा क्रमांक १०६३/२०२६ नुसार भारतीय न्याय संहितेच्या कलम ८८ व ९४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. अर्भकाची ओळख पटविणे, मृतदेह बागेत कोणी आणून ठेवला, तसेच या घटनेमागील नेमके कारण काय, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

## सातबारा बदलाच्या प्रकरणात आदेशावरून संभ्रम

### एसडीओ व अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांच्या भूमिकेमुळे प्रश्न

**खल्लार/प्रतिनिधीः-** येवदा येथील शेतकरी दिपक मुगुटराव देशमुख यांच्या शेतजमिनीचा सातबारा उतारा व फेरफार नोंद एकाच दिवशी बदलल्याच्या प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे. गट क्रमांक १४०० भाग ३ या जमिनीवर गेल्या सुमारे ३० वर्षांपासून आपला ताबा व प्रत्यक्ष वहिवाट असून आपणच शेती करीत असल्याचा दावा देशमुख यांनी केला आहे.

### -३० वर्षांपासून ताबा व वहिवाट असल्याचा शेतकऱ्याचा दावा

### -नोंदबदलाची चौकशी करण्याची मागणी

२३ जून २०२६ रोजी रात्रीच्या सुमारास सातबारा व फेरफार नोंदी ऑनलाइन बदलण्यात आल्या. या कार्यवाहीपूर्वी योग्य पूर्वसूचना देण्यात आली नसल्याचा आरोप संबंधित शेतकऱ्यांने केला आहे.



तहसिलदार कार्यालयाकडून देण्यात आलेल्या स्पष्टीकरणात सदर कार्यवाही शासनाच्या नियमांनुसार व कलम ८८ अंतर्गत करण्यात आल्याचे सांगण्यात आले. दर्यापूर एसडीओ यांनी ३ ऑगस्ट २६ रोजीच्या आदेशाने ती कायम ठेवल्याचा दावा करण्यात आला आहे.

देशमुख यांच्या म्हणण्यानुसार, त्यांनी एसडीओ यांच्याकडे याबाबत विचारणा केली असता 'आपण असा कोणताही आदेश दिलेला नाही,' अशी भूमिका घेतली. तसेच अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांनीही संबंधित आदेश आपण दिलेला नसल्याचे सांगितल्याचा दावा शेतकऱ्याने केला आहे. त्यामुळे तहसिलदार कार्यालयाने ज्या आदेशाचा ☞(पान २ वर)

## शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा भार कमी करून न्याय मिळवून देणार - अदिती पोहरे

### -मोर्शीत शिक्षक मेळावा उत्साहात

**मोर्शी/प्रतिनिधीः-** आपण स्वतः शिक्षिका असून शिक्षकांच्या अडचणी व समस्या जवळून बघत आहोत. शिक्षकांवर शैक्षणिक कामापेक्षा अशैक्षणिक कामाचा बोझा मोठ्या प्रमाणात लादल्या जात आहे.त्यामुळे अशैक्षणिक कामाचा भार कमी करण्यासाठी;अमरावती शिक्षक मतदार संघातील शिक्षकांच्या प्रश्नांसाठी विधान परिषदेत




आवाज उठवण्यासाठी मला भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने तिकीट दिली.

तरी आपण सर्व शिक्षकांनी माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून मला एक नंबर पसंतीचे मत देऊन संधी प्राप्त करून दिली तर संधीचे सोने केल्याशिवाय राहणार नाही.अशी ग्वाही अमरावती विभाग शिक्षक मतदार संघाच्या उमेदवार अदिती ऋषिकेश पोहरे यांनी आज दि.४ ऑक्टोबर रोजी शिवाजी हायस्कूल मोर्शी येथे पार पडलेल्या शिक्षक मेळाव्याप्रसंगी आपले विचार व्यक्त करतांना दिली.

या मेळाव्याचे अध्यक्षस्थान शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सदस्य नरहरी गावंडे यांनी भूषविले.यावेळी प्रमुख अतिथी म्हणून व्यासपीठावर माजी कृषीमंत्री तथा विद्यमान शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, ☞(पान २ वर)

## शिक्षकांच्या प्रलंबित समस्या सोडवण्यासाठी माझी उमेदवारी- गाजी जाहेरोश

### वंचित बहुजन आघाडीची पत्रपरिषद

**अमरावती/प्रतिनिधीः-** शिक्षक हा देशाची नवी पिढी घडवणारा अत्यंत महत्वाचा घटक असून त्यांचे सामाजिक प्रक्रियेत महत्वाचे योगदान आहे. परंतु गेल्या अनेक वर्षापासून शिक्षकांच्या अनेक समस्या प्रलंबित असून त्या समस्या सोडविण्यासाठी आज पर्यंतचे शिक्षक आमदार अपयशी ठरले आहे, त्यामुळे या सर्व प्रलंबित समस्या सोडवण्यासाठी माझी




उमेदवारी आहे, अशी माहिती शिक्षक मतदार संघ निवडणूकीतील वंचित वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार गाजी जाहोरेश यांनी रविवारी (दि.४) आयोजित पत्रपरिषदेत दिली.

शिक्षकांना जुनी पेन्शन योजना मिळवून देणे, विना अनुदानित व अंशतः अनुदानित शाळांना १००% अनुदान मिळवून देणे, शिक्षणसेवक योजना रद्द करण्यासाठी काम करणे, शिक्षकांना अशैक्षणिक कामातून मुक्त करण्यासाठी महत्वपूर्ण ☞(पान २ वर)

## वर्कशॉप फोडून लोखंडी साहित्य लंपास करणारा ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** दुकान बंद असल्याची संधी साधत चोरट्याने वर्कशॉपचे शटर तोडून आत प्रवेश केला आणि लोखंडी साहित्य व लेथ मशीनचे गिअर असा ३६ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. बेलपुरा परिसरातील या घरफोडीचा तपास करत राजापेठ पोलिसांनी एका संशयिताला अटक करून चोरीचा संपूर्ण मुद्देमाल हस्तगत केला.



फिरोज खान सईन खान (वय ४२, रा. असीर कॉलनी, अमरावती) यांचे बेलपुरा येथे 'बेरार मॅकेनिकल वर्कशॉप' आहे. २ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास त्यांनी नेहमीप्रमाणे ☞(पान २ वर)

## दुचाकींच्या धडकेत तरुणाचा बळी

### कुटांगा-हरदा मार्गावरील अपघात

**धारणी/प्रतिनिधीः-** कुटांगा-हरदा फाटा मार्गावर दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन ३२ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. २२ सप्टेंबरच्या रात्री घडलेल्या या अपघातप्रकरणी धारणी पोलिसांनी ३ ऑक्टोबर रोजी दुसऱ्या दुचाकीस्वाराविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. चंपालाल मौजीलाल धुर्वे (रा. हरदा, ता. धारणी) असे मृताचे नाव आहे. चंपालाल धुर्वे हे २२




सप्टेंबर रोजी रात्री आपल्या दुचाकीने हरदा येथे घरी परतत होते. त्यांच्या दुचाकीचा क्रमांक एमएच ☞(पान २ वर)

## काँग्रेसनगर चौकात कारची दुचाकीला धडक

### गर्भवती महिलेसह पती जखमी

**अमरावती/प्रतिनिधीः-** काँग्रेसनगर चौकातील होमगार्ड कार्यालयासमोर भरधाव कारने दुचाकीला धडक दिल्याने गर्भवती महिलेसह तिचा पती जखमी झाला. अपघातानंतरही कारचालकाचे वाहनावरील नियंत्रण न राहिल्याने त्याने अन्य दोन युवकांनाही धडक दिल्याची माहिती आहे. अखेर कार पोलवर आदळल्यानंतर संतप्त नागरिकांनी चालकाला वाहनाबाहेर काढून मारहाण केली. प्रफुल्ल हरिश्चंद्र भोवते हे प्रयोगशाळा परिचर असून ते पत्नी स्वाती यांच्यासह दुचाकीने घरी परतत होते. दोघे जेवण करून एसटी बसस्थानक परिसरातून निघाले होते. काँग्रेसनगर चौकातील होमगार्ड कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ पोहोचताच भरधाव कारने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेमुळे प्रफुल्ल आणि त्यांची गर्भवती पत्नी रस्त्यावर पडून जखमी झाले. अपघाताची तीव्रता पाहून परिसरातील नागरिकांनी तातडीने मदतीसाठी ☞(पान २ वर)

## लिफ्ट देण्याच्या बहाण्याने दुचाकीस्वाराला लुटणारे दोघे अटकेत

### निर्जन रस्त्यावर नेऊन दगडाने डोक्यात वार

**अमरावती/प्रतिनिधीः-** पहाटेच्या सुमारास रस्त्यावर मदतीसाठी हात दाखविणाऱ्या दोघांना दुचाकीवर लिफ्ट देणे एका तरुणाला चांगलेच महागात पडले. लिफ्ट घेणाऱ्या दोघांनी दुचाकीस्वाराला निर्जन रस्त्यावर नेऊन दगडाने डोक्यात वार केला आणि त्याच्याकडील रोख रक्कम, मोबाइलसह दुचाकी घेऊन पोबारा केला. या घटनेचा तपास करत राजापेठ पोलिसांनी अवघ्या चार तासांत दोघांना अटक केली.



अंकुश मनोहर राठोड (वय ३२, रा. शिरवाडी, ता. तिवसा) हे ४ ऑक्टोबर रोजी पहाटे साडेतीनच्या सुमारास दुचाकीने गोपालनगर अंडरपास परिसरातून जात होते. त्यावेळी दोन अनोळखी ☞(पान २ वर)

## स्वच्छता मोहिमेत नगराध्यक्षासह नगरसेवकांचा सहभाग

**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** सेवा संकल्प अभियाना अंतर्गत नांदगाव नगरपंचायतच्या स्वच्छता विभागामार्फत शहरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी नगराध्यक्षा व नगरसेवकांनी स्वतः हातात झाडू घेऊन स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला. स्वच्छता ही सेवा असून शहराची स्वच्छता ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन नगराध्यक्ष प्राप्ती मारोटकर यांनी केले. राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त सेवा



संकल्प अभियानातंर्गत नगरपंचायतच्या आरोग्य व स्वच्छता विभागा मार्फत चित्रकला व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत शेकडो विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून पर्यावरण स्वच्छता व सामाजिक संदेश देणारी सुंदर चित्रे साकारली. स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळाला तसेच स्वच्छता, पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करण्यात आली. तसेच विनायक विज्ञान महाविद्यालय, नगर पंचायत सफाई कामगार यांचे संयुक्त विद्यमाने शहरात स्वच्छता रॅली काढून स्वतः नगराध्यक्षा प्राप्ती ☞(पान २ वर)

## लग्नाचे आमिष दाखवून महिलांचे लैंगिक शोषण

### -दत्तापूर व दर्यापूर हद्दीत दोन स्वतंत्र प्रकरणे

### -दोघांविरुद्ध बलात्काराचे गुन्हे दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** लग्नाचे आश्वासन देऊन महिलांचे लैंगिक शोषण केल्याच्या दोन स्वतंत्र घटना जिल्ह्यातील दत्तापूर आणि दर्यापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आल्या आहेत. एका प्रकरणात पीडिता गर्भवती झाल्याचे तक्रारीत नमूद असून, दुसऱ्या



घटनेत सोशल मीडियाच्या माध्यमातून ओळख वाढवून लग्नाचे आमिष दाखविल्याचा आरोप आहे. दोन्ही प्रकरणांत पोलिसांनी आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत.

दत्तापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत सतीश घुमे (वय २६, रा. कोल्हा, ता. बाभुळगाव, जि. यवतमाळ) याच्याविरुद्ध गुन्हा ☞(पान २ वर)

## तरूणाने झाडाला घेतला गळफास

अचलपूर/प्रतिनिधीः- हरम येथील रहिवासी कैलाश रामदास सातपुते (वय ३२ ) या तरुणाने हरम-शहापूर रस्त्यावर एका शेतात संत्र्याचा झाडाला दोरी बांधून गळाफास घेतल्याची घटना समोर आली आहे. मृतक कैलाश सातपुते हा मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होता. कैलाश सातपुते याने आत्महत्या का केली ? याचे कारण समोर आलेले नाही .पुढील तपास सरमसपुरा पोलिस स्टेशन चे अधिकारी करत आहे .

## निजामपूर-बोपापूर शिवारात बिबट्याचा वावर

### -शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर तालुक्यातील निजामपूर - बोपापूर शिवारात बिबट्याचा वावर असल्याची चर्चा मोठ्या प्रमाणात सुरू आहे.यामुळे शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.काही शेतकऱ्यांना बिबट्याचा हालचाली दिसल्याने याबाबत वनपरिक्षेत्र विभाग परतवाडाकडे



तक्रारी देण्यात आल्या .त्यानंतर वनपरिक्षेत्र विभाग परतवाडा तर्फे १२ कर्मचाऱ्याचे पथक गस्तीवर असून त्या बिबट्याचा शोध घेत आहे.यासाठी वनपरिक्षेत्र विभाग परतवाडा कडून बोपापूर भागात काल पिंजरा सुद्धा लावण्यात आला आहे. बिबट्याचा ☞(पान २ वर)

## सुवर्णकन्या कुमकुम मोहोड, फुलमाळी, यशदिप भोगे यांची स्वागत रॅली आज

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावतीची सुवर्णकन्या कुमकुम मोहोड (धनुर्विद्या रिकर्व्ह २ सुवर्ण व १ रौप्य पदक प्राप्त), भारती फुलमाळी (क्रीकेट सुवर्ण पदक प्राप्त) व यशदिप भोगे (धनुर्विद्या कंपाऊंड रौप्य) या खेळाडूंच्या सन्मानार्थ मान्यवरांचे हस्ते सत्कार कार्यक्रम व अमरावती शहरात भव्य स्वागत रॅलीचे आयोजन दि. ०५ ऑक्टोंबर २०२६ रोजी सकाळी ८.३० वा. राजकमल चौक येथे करण्यात येत आहे.



राजकमल चौक ते विभागीय क्रीडा संकुल मोर्शी रोड अमरावती या मार्गाने भव्य स्वागत आयोजनाकरीता येथे सकाळी ८.३० वा. सर्व क्रीडा प्रेमी, नागरीक, खेळाडू, पुरस्कारार्थी यांनी आंतरराष्ट्रीय खेळाडूंच्या सत्कार कार्यक्रमाकरीता राजकमल चौक येथे उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा प्रशासन अमरावती तसेच गणेश जाधव, जिल्हा क्रीडा अधिकारी अमरावती यांनी केले आहे.

२० वी आशियायी क्रीडा स्पर्धा जपान (ऐची व नागोया) सन २०२६-२७ येथे आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या देशाचे व शहराचे ☞(पान २ वर)